१६२८

श्री

# सचित्र पंढरीवर्णन

म. ग्रं. सं. ठाणे
विषय श्री-प्रवास
सं. नं. ७०




REFBK-0002642

लेखक—नारायण रामचंद्र गोखले.

किमत १० आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
वा. क्र. २२६२

श्रीः



# पंढरीवर्णन.

लेखक व प्रकाशक—

## नारायण रामचंद्र गोखले.

मत्त्वशील ... ात, शहा-
जहान, ... इत्यादि

REFBK-0002642

शके १८५६

किंमत दहा आणे.

( ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या अक्टाप्रमाणें
नोंदून सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

---

मुद्रक
गोपाळ बळवंत जोशी, 'आनंद' छापखाना,
३३० सदाशिव पेठ, पुणें शहर.
प्रकाशक
नारायण रामचंद्र गोखले हेडमास्तर मंद्रूप
जि. सोलापूर यांनीं मंद्रूप येथें
प्रसिद्ध केलें.

# अर्पणपत्रिका.

ज्यांचें जनन वांई क्षेत्रांत होऊन बाल्य तेथेंच गेलें व पुढें ज्यांचा आंग्ल भाषेचा अभ्यास इंदूर येथें होऊन नोकरीही तेथेंच त्यांनीं केली, ज्यांना तेथें 'वांईकर मास्तर' ह्या नांवानें संबोधीत व ज्यांची मराठी भाषा उत्तम रीतीनें शिकविण्याविषयीं ख्याति होती; तसेंच ज्यांना बहुतेक कलांचें ज्ञान थोडेंबहुत असून वक्तृत्वकला व मल्लविद्या या बाबतींत ज्यांना सशास्त्र माहिती होती; 'भारतवर्षीय युवतिरत्नमाले' चे कर्ते

व

'कादंबरी कल्पद्रुमा' चे जनक

अशी महाराष्ट्र वाचकांस ज्यांच्याविषयीं माहिती आहे; ज्यांनीं मजला प्रेमानें वागवून माझ्या मनांत सदभिरुचि उत्पन्न करून दिली; मराठी भाषा लिहिण्याचा कित्ता ज्यांनीं मजला घालून दिला; व जे माझे परमप्रिय मातुल आज माझी नवीन कृति पाहण्यास नाहींत म्हणून वाईट वाटतें, त्या

## अनंत केशव चितळे, वांईकर

नांवाच्या माझ्या गुरूंस हें पुस्तक मोठ्या प्रेमानें व नम्रतेनें अर्पण केलें असे.

पुस्तककर्ता.

श्री.

# मंगलाचरण.

समचरणसरोजं सांद्रनीलांबुदाभं
जघननिहितपाणिं मंडनं मंडनानाम्।
तरुणतुलसिमालाकंधरं कंजनेत्रं
सदयधवलहासं विठ्ठलं चिन्तयामि ॥ १ ॥

# पांडुरंगाष्टकम्

महायोगपीठे तटे भीमरथ्यां वरं पुंडरीकाय दातुं मुनींद्रैः।
समागत्य तिष्ठंतमानंदकंदं परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम् ॥ १ ॥
तडिद्वाससं नीलमेघावभासं रमामंदिरं सुंदरं चित्प्रकाशम्।
वरंत्विष्टिकायां समंन्यस्तपादं परब्रह्मलिंगं भजे० ॥ २ ॥
प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां नितंबः कराभ्यां धृतो येन तस्मात्
विधातुर्वसत्यै धृतो नाभिकोशः परब्रह्मलिंगं० ॥ ३ ॥
स्फुरत्कौस्तुभालंकृत कंठदेशे श्रिया जुष्टकेयूरकं श्रीनिवासम्।
शिवं शांतमीड्यं वरं लोकपालं परब्रह्मलिंगं० ॥ ४ ॥
शरच्चंद्रबिंबाननं चारुहासं लसत्कुलंडलाक्रांत् गंडस्थलांगम्।
अपारागबिंबाधरं कंजनेत्रं परब्रह्मलिंगं० ॥ ५ ॥
किरीटोज्ज्वलत्सर्वदिक्प्रांतभागं सुरैरर्चितं दिव्यरत्नैरनर्घ्यैः।
त्रिभंगाकृतिं बर्हमाल्यावसंतं परब्रह्मलिंगं० ॥ ६ ॥
विभुं वेणुनादं चरंतं दुरंतं स्वयं लीलया गोपवेषं दधानम्।
गवां वृंदकानंददं चारुहासं परब्रह्मलिंगं० ॥ ७ ॥
अजं रुक्मिणीप्राणसंजीवनं तं परं धामकैवल्यमेकं तुरीयम्।
प्रसन्नं प्रपन्नार्तिहं देवदेवं परब्रह्म० ॥ ८ ॥
स्तवं पांडुरंगस्य वै पुण्यदं य पठंत्येकचित्तेन भक्त्याच नित्यम्।
भवांभोनिधिं तेऽपि तीर्त्वांतकाले हरेरालयं शाश्वतं प्राप्नुवंति ॥ ९ ॥

इति श्रीमच्छंकराचार्यविरचितं श्रीपांडुरंगाष्टकं संपूर्णम् ॥

# उपोद्घात.

संसार महानदी अति विस्तृत आहे. आकाशाला जशी व्याप्ति नाहीं त्याप्रमाणें ह्या नदीला परिमिति नाहीं. हिचा प्रवृत्ति हा एक तट असून निवृत्ति हा दुसरा तट आहे. प्रवृत्ति तटावरून हिचें रूप मनोहर दिसत असल्यामुळें नेथून ह्या नदीचें अवगाहन करण्याची इच्छा होऊन असंख्य लोक ह्या भव-नदींत शिरतात. प्रथम प्रथम पाणी खोल नसल्यामुळें हिच्या मध्यांत प्रवेश करण्याचा मोह प्रत्येकाला होतो. लांबून भवमहानदी जशी संथ दिसते, तशी ती नसल्यामुळें मध्यांत शिरतांच तिचें खरें स्वरूप भासूं लागतें. जिकडे तिकडे कुटुंबपोषण, उदरभरण, राजसेवा, व्यापार, उद्योगधंदा हे मोठे आवर्त तिच्यांत आढळतात व त्यांतील पाणी तोडून मनुष्याच्यानें दूर जाववत नाहीं. कोणच्याना कोणच्या तरी आवर्तांत तो सांपडतो. त्याला आशा, निराशा, माया, भ्रांति, इत्यादि सुसरी ओढून नेण्याला टप-लेल्या असतात. हानि, दुःख, भय, शोक ह्या प्रचंड लोटांमुळें लाटा उद्भवून त्यांच्या हिंदोळ्यानें त्याची सर्व शक्ति हरण केली जाते व तो ह्या भवमहा-नदींत गटकळ्या खाऊं लागतो. त्यावेळीं त्याला त्रिभुवन आठवतें. अशाश्वत सुखाच्या नादीं भरून भवमहानदींत उडी टाकिल्यामुळें आपण जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडलों ह्याबद्दल त्याला पश्चात्ताप वाटूं लागतो. परंतु अवेळीं पश्चात्ताप वाटून काय उपयोग! ज्ञानदृष्टीनें भवमहानदी कोणच्याही तटावरून पाहिली तरी उत्तम रीतीनें दिसते. लांबून मोह पाडणारें तिचें चकचकणारें पाणी दुःखरूपी कर्दमानें गढूळलेलें आहे, हें ओळखतां येतें. तिच्या भयंकर लाटा, तिच्यांतले आवर्त व महा भयंकर डोह चक्र दिसतात. ह्या प्रवाहांत अज्ञानानें असंख्य लोक बुड्या मारून गटकळ्या खात असतात तेही दिसतात. ह्या नदींत तरून रहावें म्हणून कित्येक स्वाचाररूपी भोपळे बांधतात, परंतु त्याला दंभरूपी भोंकें पडल्यामुळें अभिमानाचें पाणी शिरून ते जड होतात व ते मनुष्यांस नदीच्या रसातळाला ओढूं लागतात. कोणी वेदत्रयीच्या सांग-डीचा आश्रय करून आंत शिरतात तों ते मीपणाच्या खडकावर जाऊन

उतरतात. बराच वेळ पोहून दमलेले जवळच्या विषयसुखरूप बेटाकडे विश्रांति हेतूनें धाव घेत त. त्यांना अतितृष्णेच्या निसरड्यामुळें तेथें जातांच येत नाहीं. ते तेथेंच गटकळ्या खात व बेटाला फेरा देत पडले राहतात. ह्या प्रवाहांत दुसरी एक अशी मजा पहावयास सांपडते कीं आपण स्वतः गटकळ्या खाणारे लोक आपल्या पाराबाळांसही ह्या भवमहानदींत उडी टाकण्याला सांगतात. खरोखर ही महानदी दुस्तर आहे. कोणीही विद्वान् असला, शक्तिमान् असला, धनवान् असला तरी तो ह्या प्रवाहांत थकतोच.


ह्या भवमहानदींत जाणूनबुजून म्हणा अथवा न कळत म्हणा प्रत्येक प्राणी पडलेला आहे. यःकश्चित् कीटकापासून तों बुद्धिमान् मनुष्यापर्यंत सर्व प्राणी या प्रवाहांत सांपडले आहेत व त्यांना परतीर गाठावें अशी इच्छा असते. मनुष्यप्राण्यास इतर प्राण्यांपेक्षां परमेश्वरानें बुद्धि दिली असल्यामुळें तो सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे व तोच भवमहानदीचें परतीर गांठण्यास समर्थ आहे, असें साधु लोक अनुभवानें सांगतात. मनुष्यप्राण्याची ही योग्यता ऐकून व त्याचें चरित्र पाहून फार वाईट वाटतें. कारण, इतकी दिव्य देणगी परमेश्वराकडून त्याला मिळाली असून तो उपयोग करीत नाहीं. माझीं पोरें, माझी बायको, माझी संपत्ति, मी असा आणि मी तसा इत्यादि अहंपणाच्या गोष्टींनीं त्याच्या बुद्धीवर खऱ्या वस्तूच्या ज्ञानासंबंधानें पटल पडलेलें असतें. लौकिक सुखाची हाव त्याला जबर लागल्यामुळें तो नेहमीं मोठ्या आशेनें श्रम करीत असतो; व ऊन, तहान, वारा, शीत इत्यादि गोष्टींची पर्वाही करीत नाहीं. मनाच्या इच्छेला अनुकूल असा वारा जोंपर्यंत वाहत असतो तोंपर्यंत मनुष्याचें संसारतारूं ठीक चालतें. परंतु प्रतिकूल वारा सुटूं लागला, केलेल्या इच्छा फलद्रूप न होतां त्या उलटच आपले आपणास भोवूं लागल्या म्हणजे संसारतारूं वल्हविणारा मनुष्यनावाडी थकतो व काय करावें आणि काय न करावें असें त्याला होऊन जातें. संसारसागर तरून जाण्यास काय अडथळे आहेत याची ज्याला कल्पनाही नव्हती तो प्रत्यक्ष प्रसंग येऊन बसल्यामुळें सावध होऊन कसें पार पडावें, हा विचार करूं लागतो. मोठ्या आशेनें तो लोकांना उपाय विचारतो, परंतु त्याच्या दुर्दैवामुळें पक्का दर्दी असा मनुष्य त्याला न मिळाल्यामुळें तो निराश होतो.

खरेंच आहे. प्रत्येक मनुष्याला आपण मायामोहांत पडलों आहों हें सांसारिक आपत्तींनीं कळून येतें. पण त्यांतून सुटण्यासंबंधानें उत्तम मार्ग-

दर्शक असा त्याला कोणी मिळत नाहीं. गुरु केला असतां तो सर्व संकट निवारण्यास समर्थ होतो, पण असा गुरु कसा सांपडावा! कारण, खरे साधु असतात ते विशेष गोष्टींशिवाय व खरा भाव पाहिल्याशिवाय भेटत नाहींत. साधूंचा वेष घेणारे अनेक आहेत व त्यांच्या वेषाकडे पाहून ज्याप्रमाणें पतंग दिव्यावर जाऊन फसतात त्याप्रमाणें भोळे लोक हे फसतात. असा लोकांचा अनुभव पाहून मनुष्याला मोठा वैताग येऊन जातो. पण नुसता वैताग येऊन काय उपयोग? कांहीं खटपट केली पाहिजेच. मार्गदर्शक असा गुरु मिळावा हीच इच्छाना? ती सफल न होण्यास काय झालें? जेथें इच्छा आहे तेथें फल आहे. परमेश्वर अत्यंत दयाळू आहे. त्यानें लोकांच्या सोयीसाठीं असंख्य गुरु ह्या सृष्टींत उत्पन्न करून ठेविले आहेत. गुणैकदृष्टीनें अवलोकन करा. तुम्हांला परमार्थाला अवश्य लागणारे गुण अंतःकरणांत बिंबवून देण्यासारखे गुरु सृष्टींत अनेक आहेत. पहा, पृथ्वी कशी सर्वांचा भार सहन करून शांतीचा बोध करून देत आहे! डोंगर व पर्वत एकीकडे राहून परोपकार कसा करावा हें औषधिद्रव्यें धारण करून सांगतात व एकांतवासांचा दाखला देतात. सतत वाहणाऱ्या नद्या 'बाबांनो, उद्योग करा, एक क्षणही फुकट घालवूं नका' हें आपल्या वाहण्यानें सुचवितात! असा प्रत्येक वस्तूचा घेण्यासारखा गुण येथें नमूद करूं लागलों तर विस्तार होईल, यास्तव ते गुण शोधकपणें पाहण्याचें काम मुमुक्षुजनांवर टाकतों. हे गुरु उपदेश उत्तम देतात व त्यांना गुरुपदेशाबद्दल दक्षिणाही द्यावी लागत नाहीं व ते ढोंगधत्तुरा माजवीत नसल्यामुळें त्यांजपासून फसण्याची भीति बाळगावयास नको. अवधूतानें परमार्थप्राप्तीकरितां सृष्टींतील चोवीस वस्तूंचा गुरूपदेश कसा घेतला होता व त्यामुळें त्याच्या अंगीं परम वैराग्य कसें बाणलें होतें हें भागवत वाचणारांस ठाऊक आहेच. सांगावयाचें काय, ह्या जगांत मुमुक्षूंस सृष्ट्यवलोकन फार महत्त्वाचें आहे. ह्या सृष्ट्यवलोकनानें आचरणावर उत्तम परिणाम होऊन कित्येक गोष्टींचें ज्ञान होतें; साधूही भेटण्याची आशा करितां येते.

सृष्ट्यवलोकनांत प्रवास येतो व पवित्र क्षेत्रांचा प्रवास म्हणजे यात्रा होत. ह्या यात्रांच्या योगानें नाना प्रकारचे देश पहावयास सांपडतात; नानाप्रकारचे लोक पहाण्यांत येतात. त्यांच्या आचरणांचा विचार करितां जे चांगले गुण आढळतात त्यांचा अंगीकार करावासा वाटतो, व ह्या सदिच्छेनें त्यांचा

अभ्यास घडून मनुष्य सद्‌गुणांचा सांठा बनतो. पंढरीक्षेत्र इतर क्षेत्रांपेक्षां कांहीं गुणानें वरिष्ठ ठरल्यामुळें तेथील यात्रा घडली असतां अनेक गोष्टी अवलोकनांत येऊन मनुष्याच्या आचरणांत फरक पडतो, व परमेश्वर साध्य करून घेणें, हा जो अंतिम हेतु तो सफल होण्याची आशा येते. एवढ्या गोष्टीस्तव आम्ही लोकांस पंढरीस येण्यास विनंति करितो व त्यांना येथील प्रवास सोयीचा व्हावा म्हणून येथील ठोकळ माहिती या पुस्तकद्वारें दिली आहे. पुस्तकाचा हेतु पंढरपुरची माहिती थोडक्यांत द्यावयाची असा असल्यामुळें कोठेंही विस्तार केला नाहीं. आमचें हें पुस्तक पंढरीभक्तांस पसंत पडल्यास आम्हांस आनंद तर वाटणारच आहे. परंतु त्याचें श्रेय आम्ही ज्या साधुसंतांच्या सद्‌ग्रंथवाचनानें आमच्या मनांत पंढरीविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाली त्यांना देतों. दोषांचे भारवाही सर्वथैव आम्ही आहों. हें पुस्तक तयार करितांना बांबे ग्याझिटियरचा आम्हांस थोडा उपयोग झाला. तसेंच आमचे मित्र कै० रा. रा. **विठ्ठल गोपाळ कोरबल्लु** ह्यांनी कांहीं सूचना केल्या व आनंद छापखान्याचे मॅनेजर गोपाळ बळवंत जोशी ह्यांनीं काम काळजीपूर्वक काढून देण्याबद्दल तसदी घेतली ह्या सर्व गोष्टींबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों. सरते शेवटीं ज्या पंढरीनाथाच्या कृपेमुळें पंढरीचें वर्णन लिहिण्याची आम्हांस इच्छा झाली व त्याच्याच वरदहस्तामुळें तें काम सिद्धीस गेलें त्या पांडुरंगाच्या चरणीं नत होऊन असेच सद्‌ग्रंथ आमचे हातून तो घडवो अशी त्याला विनंति करून हा लहानसा उपोद्घात संपवितों.





श्रीविठ्ठल.

अलंकार पूजेचें दर्शन.



श्रीलखुबाई ( पृ. ५४ )

# पंढरीवर्णन.

## प्रकरण पहिलें.

### क्षेत्रप्रवेश व चंद्रभागा.

विठ्ठलाची नगरी पंढरी येथें येण्याचा विचार केला असतां निरनिराळ्या स्थानच्या लोकांस निरनिराळ्या मार्गांनीं येतां येईल. कोंकण, मुंबई, खानदेश, वऱ्हाड, उत्तर हिंदुस्थान, महाराष्ट्र व कर्नाटक ह्या प्रांतांतून लोक पंढरीस येतात व ह्या सर्वांना आगगाडीचा प्रवास सोयीचा असल्यामुळें ते आगगाडीनेंच पंढरीस जावें असें ठरवितात. जी. आय. पी. रेल्वेच्या बार्शीरोड ( कुर्डुवाडी ) स्टेशनपर्यंत उत्तरेकडून अगर दक्षिणेकडून आल्यावर बार्शी लाइट रेलवेचा फाटा पंढरपुरापर्यंत आला आहे, त्या रेल्वेनें थेट पंढरपुरापर्यंत जातां येतें. कुर्डुवाडीपासून लऊळ, पडसाळी, मोडनिंब, अष्टी, बाभुळगांव, आढीव व पंढरपूर अशीं सात स्टेशनें ह्या फाट्यावर आहेत. थर्ड क्लासचें माणसीं पावणे अकरा आणे भाडें सध्या पडतें. मेल व पॅसेंजर गाडीचें भाडें सारखेंच आहे. दिवसांतून दोन गाड्या जातात व येतात.

कुर्डुवाडी स्टेशनवर उतरल्यावर उतारूंना दादरा ओलांडून साधारण पाव मैल गेल्यावर रानांत रुळावर उभ्या असलेल्या दोन गाड्या दिसतात. त्यांपैकीं एक गाडी पंढरपुराकडे व दुसरी बार्शी-लातूरकडे जाते. बार्शी लाइट रेल्वेचे व्यवस्थापक उतारूंकडून पैसे वसूल करण्यांत जितके दक्ष आहेत त्याच्या दशांशानें, शतांशानें उतारूंच्या सुखसोयीकडे लक्ष देते तर—स्टेशन नाहीं, प्लॅटफार्म नाहीं, वेटिंगरूम नाहीं, दादऱ्यावरच जाणारे येणारे उतारू तरंगत आहेत; पाऊस, ऊन व थंडी यांच्या पासून त्रास व इजा न होईल अशी निवाऱ्याची जागा नाहीं—अशा अनेक गैरसोयीच्या गोष्टी-पासून प्रत्येक उतारूला होणारा कमजास्त त्रास तरी वांचला असता. परंतु रेल्वेच्या अधिकाऱ्यांचें लक्ष, हा फाटा सुरु होऊन जवळ जवळ १६ सोळा वर्षे झालीं तरी ज्या अर्थी या गोष्टींकडे पोंचत नाहीं, त्या अर्थी पारमार्थिक सहिष्णुता अंगीं बाणण्यासाठींच ही परमेश्वरी योजना आहे असें वाटतें.

आगगाडीची सोय झाल्यामुळें शेंकडा ७५ लोक रेल्वेनेंच येतात. पायवाटेनें व पायगाडीनें येणारे लोकही बरेच आहेत. बेळगांवकडचे लोक अथणी सांगोलें रस्त्यानें पंढरपुरास येतात. आळंदीहून ज्ञाने-श्वर महाराजांची पालखी व देहूहून तुकाराम महाराजांची पालखी पुणें पंढरपूर रस्त्यानें येते या रस्त्यानें पुणें जिल्ह्यांतील लोक येतात. कोंकण, सातारा, खानदेश, घाट ( निजामशाहींतील मुलूख ) ह्या भागांतूनही पायरस्त्यानें लोक येतात. त्यांपैकीं कांहीं रस्ते चांगले आहेत. ह्या बहुतेक रस्त्यावर ४।५ मैलांच्या अंतरावर धर्मशाळा व पाणी पिण्याच्या विहिरी उदार धनिकांनीं व माजी पेशवे सरकारांनीं बांधलेल्या आहेत. रेल्वेमुळें हे रस्ते फारसे नेहमीं वाहत नाहींत हें

खरें, पण सृष्टिसौंदर्य व जिज्ञासाबुद्धीस विस्तृत क्षेत्र ह्या दृष्टीनें हा प्रवास कमी महत्वाचा नाहीं. मोटारींच्या वाढत्या संख्येनें हे जुने व ज्यांची दुरुस्तीही पूर्वीं यथायथाच होई असे रस्ते आतां पुन्हा दुरुस्त होऊं लागले आहेत.

पूर्वीं पंढरपूरचें स्टेशन नदीपलीकडे होतें. तें आतां गांवांत आलेलें आहे. आगगाडी स्टेशनाचे जवळ जवळ येऊं लागते तेव्हां आगगाडींतल्या लोकांस पंढरपूरचा देखावा चलच्चित्र—पटाप्रमाणें ( सिनेमाप्रमाणें ) एक एक दिसूं लागतो. पापविमोचन करणाऱ्या मंगल चंद्रभागा नदीचें दर्शन होतें. नदीवरील पूल दिसतो. ( ह्या पुलास २६ दगडी मच्छ असून ते लोखंडी गरडरांनीं जोडलेले आहेत. पुलावरून इकडे तिकडे माणसास जातां यावें म्हणून पत्रे टाकून तयार केलेले दोन्ही बाजूंस दोन फूटपाथ आहेत. हा पूल सन १९१५ सालीं बांधून तयार झाला व त्याला विलिंग्डन पूल असें नांव देण्यांत आलें आहे. ) आगगाडींतून नदीचें विस्तृत वाळवंट, वाळवंटातील साधुसंतांच्या समाधी, वाळवंटांतून वर चढून जाण्यास केलेले घाट, नदीकांठच्या इमारती, देवळांचीं उंच शिखरें, रेल्वेच्या नजीकच्या इमारती, पद्मावतीचें तळें वगैरे क्रमाक्रमानें दिसतात. हा देखावा पाहून भाविक व जिज्ञासु प्रवाशांच्या अंतःकरणास भक्तिप्रेमाचा उमाळा येऊन ‘ पुंडलीक वरदा हरि विठ्ठल ’ हा जयजयकार ध्वनि त्यांचे मुखांतून अनेकवार निघतो, व साहजिकपणें येथील सुप्रसिद्ध दैवत श्रीपांडुरंग याचें दर्शन केव्हां होईल व आपल्या जन्माचें साफल्य केव्हां घडेल असें होतें. तसेंच महाराष्ट्रांत नाणावलेलें व पंढरीनाथाच्या वास्तव्यानें सर्वतोपरी प्रेक्षणीय झालेलें पंढरीक्षेत्र आपण केव्हां पाहूं असें त्याला वाटूं लागतें.

पंढरीक्षेत्रानजीक आल्यावर कोठें उतरावें याची काळजी करावयास नको. सर्व तऱ्हेची व्यवस्था ठेवणारे क्षेत्रोपाध्ये प्रवासी लोकांची वाट पहात असतातच. स्टेशनांतून बाहेर पडतांच तुम्हांला कोठें उतरावयाचें हा प्रश्न प्रवाशांपुढें क्षेत्रोपाध्यांचा आला म्हणून समजावा. हे क्षेत्रोपाध्ये उर्फ भिमावळे आलेल्या प्रवाशांस उपनांवें विचारून त्यांचें नांव आपल्या वहींत सांपडल्यास त्यांस आपलेकडे घेऊन जातात. प्रवासी नवीन असल्यास त्याच्या खुषीनें त्याचें नांव आपल्या वहींत दाखल करून त्याला आपल्या घरीं नेतात. प्रवासी लोकांस क्षेत्रोपाध्ये यजमान किंवा वाटसरू असें म्हणतात. या यजमानांस त्यांच्या इच्छेप्रमाणें क्षेत्रोपाध्ये आपल्या घरीं उतरून घेऊन त्यांच्या भोजनादि व्यवहाराची व क्षेत्रसंबंधीं कर्तव्याची व्यवस्था करितात. यजमानाला स्वतंत्र बिऱ्हाड करणें असल्यास तशीही व्यवस्था ते करून देतात. टांगे, छकडे, मोटार हीं स्टेशनवर उभीं असतात. त्यांत बसून अगर पायीं आपल्या उपाध्याचे घरीं अगर इष्टमित्राचे घरीं जावें व आपल्या सवडीप्रमाणें पंढरीक्षेत्राचें अवलोकन करावें.

पंढरपुरांत येऊन उतरल्यावर या क्षेत्राचें जें तीर्थ चंद्रभागा नदी तिच्या स्नानास जावें अशी प्रत्येकाची इच्छा असते. सबब तिजसंबंधीं पुढें माहिती दिली आहे. या क्षेत्राची मुख्य नदी भीमा किंवा चंद्रभागा होय. ही दक्षिणवाहिनी असून इचा प्रवाह साधारणपणें लहान आहे. हिला उन्हाळ्यांत खांडवे पडतात. पावसाळ्यांत हिला बरेंच पाणी असतें व सुमारें सहा महिनेपर्यंत हिच्यांत नावा

१ गयेचे उपाध्ये गयावळ तसे भिमाकांठचे उपाध्ये ते भिमावळ.

चालतात. पावसाळ्यांत चंद्रभागेला कधीं कधीं मोठे पूर येतात व गांवांत क्वचित् पाणी शिरून गांवाचें नुकसानही होतें. इसवी सन १८९६ सालीं नदीस महापूर आला होता. त्यानें गांवांतील पुष्कळ इमारती पडल्या. पाणी किती आलें होतें ह्याची कल्पना येण्यास हायस्कूलच्या इमारतीचे भिंतीस खूण केलेली आहे ती पाहावी. ( Flood 1896 )

भीमा नदीचें वाळवंट मोठें आहे व त्यांत साधुसंतांच्या समाधी ठिकाठिकाणीं दिसतात. नदीचें पात्र वाळूचें असून त्यांत क्वचित् ठिकाणीं लहान खडक आहेत. ह्यामुळें हिचा प्रवाह शांत आहे. आगगाडीकरितां झालेला पूल व सोलापूर नाक्याजवळ होत असलेला बैलगाडीचा पूल ह्यांनीं नदीचा ओघ बराच दूर गेला आहे व कित्येक ठिकाणीं वाळू जास्त भरून जाऊन प्रवाहाचें पात्र खोल झालेलें दिसतें. नव्या पुलापासून पुंडलीकापर्यंतचें पात्र बरेंच धोक्याचें झालें आहे. उतारूंनीं सावधपणें स्नानपानादि व्यवहार करावे.

उन्हाळ्यांत नदीच्या कांठाला ( गांवच्या उत्तर भागीं दोन्ही तीरास व दक्षिणभागीं पूर्वतीरास ) काकड्या, खरबुजें, कलिंगडीं यांची लागवड करितात. हिचें पाणी गोड असून पचनास किंचित् जड आहे. पंढरपुरानजीक हिच्या पात्रांत डोह नाहींत. म्हसोबाच्या देवळाजवळ पूर्वीं एक डोह होता. तो आतां भरत आला आहे. जलदेवता शांत आहे. लाखों माणसें यात्रेनिमित्त स्नानास जातात; पण अपघात क्वचित् होतो. चंद्रभागेसंबंधी पुराणांतून पुढीलप्रमाणें कथा दिलेली आहे—

त्रिपुर नांवाचा दैत्य मनुष्यांस व देवांस प्रबल होऊन पीडा देऊं लागला, तेव्हां तो त्रास त्यांना असह्य होऊन त्याचें गार्‍हाणें

महाद्देवाकडे नेण्याचा त्यांनीं विचार केला. ह्याप्रमाणें देवमंडळी शंकरास शरण गेली. देवांची विनंति ऐकून शंकर त्रिपुरासुरास जिंकण्यास सिद्ध झाले. देवांनीं युद्धाची तयारी पुढीलप्रमाणें केली– पृथ्वीला रथ व्हावें लागलें. सूर्यचंद्र त्या रथाचीं चाकें झालीं. मंदरगिरि कणा झाला. धर्म, काम, अर्थ व मोक्ष हे चारी पुरुषार्थ चार खांब झाले; चारी वेद रथाचे घोडे झाले त्या रथावर ब्रह्मदेव सारथी झाले; शास्त्र वाग्दोर झाले, पुराणें तटबंद झालीं; उपपुराणें खिळे झालीं; मेरुपर्वत धनुष्य झाला; इंद्र धनुष्याची दोरी झाला; भगवान् विष्णु शर झाले. त्यावेळीं शंकर रथांत बसूं लागले तों तो खालीं जाऊं लागला; तेव्हां रथांत एक पाय व नंदिकेश्वरावर एक पाय ठेवून शंकरांनीं त्रिपुराशीं तुमुल युद्ध केलें व त्याला जिंकिलें. त्या वेळेस युद्धाच्या श्रमानें महादेवास घाम आला तो नदीरूपानें पंढरपुराजवळ आला. त्या नदीचा प्रवाहनाद भयंकर असल्यामुळें तिला भीमा हें नांव पडलें. पंढरपुराजवळ ती भयंकर शब्द करीत आली, तशी येथील त्या वेळची क्षेत्रस्थ मंडळी भयभीत होऊन कालभैरवास शरण गेली. नंतर भैरव त्यांना अभय देऊन हातांत दंड घेऊन नदीवर आला. त्याची त्रिकाळ व भयंकर मुद्रा पाहून भीमा भयभीत झाली व तिनें पांडुरंगाची स्तुति करण्यास आरंभ केला. तिची स्तुति ऐकून पांडुरंग प्रसन्न झाले व म्हणाले ' हे भीमे ! भिऊं नकोस; तूं शब्द न करितां या क्षेत्राजवळून वहात जावें व माझ्या भक्तांस स्नानपानदर्शनानें पूत करीत जावें अशी माझी आज्ञा आहे. ' तेव्हांपासून भीमा पांडुरंगाच्या आज्ञेवरून शांतपणें वहात आहे व असंख्य पापीजन उद्धरीत आहे. भीमा नदीस पंढरपुराजवळ चंद्रभागा नांवानें संबोधितात. चंद्र गुरुपत्नी

तारा हिच्याशीं रममाण झाला असतां त्यास गुरूनें ‘ तूं क्षयी होशील ’ असा शाप दिला. तेव्हां चंद्रास पश्चात्ताप होऊन तो गुरूस शरण गेला. तेव्हां गुरु प्रसन्न झाले व त्यांनीं त्याला उःशाप दिला कीं, ‘ भीमेंत सूर्यतीर्थांत स्नान करून तप कर म्हणजे तुझा दोष जाऊन शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत तूं वृद्धिमान् होत जाशील. ’ भीमेंत स्नान केल्यामुळें चंद्राचा दोष गेला, म्हणून हिला चंद्रभागा असें नांव पडलें. चंद्रभागेंत अनेक तीर्थें आहेत. त्यांचा पुराणास अनुसरून तपशील:--

१. **पंचगंगा**—हें स्थान उत्तरेकडे क्षेत्रापासून दीड कोसावर आहे. येथें पांच नद्या वाहतात. त्यांचीं नांवें—तुंगा, कांति, सुना, सती व भृंगारी. येथें सावर्णि मनूनें एक सुवर्णलिंग स्थापन केलें आहे. हें तीर्थ फारच रमणीय, पुण्यकारक व मनोरथ पूर्ण करणारें आहे. पंचगंगेचें स्नान करून शंकराचें पूजन करीत जाण्याचा क्रम सहा महिने चालू ठेविल्यास शंकर प्रसन्न होऊन दर्शन देतात. वैशाख शुद्ध तृतीयेपासून सहा महिनेपर्यंत हा क्रम ठेविल्यास त्याचें विशेष फल आहे. महाशिवरात्रीस शंकराचें दर्शन घेणारास मोठें पुण्य मिळतें. येथें शिवरात्रीस पुष्कळ यात्रा भरते.

२. **मांडव्यतीर्थ**—हें स्थान ईशान्येस भटुंबरें गांवाजवळ आहे. यास मांडवखडकी असें म्हणतात. येथें पूर्वीं मांडवऋषींनीं तप केलें आणि या स्थळीं त्यांची तपश्चर्या सिद्धीस गेली, म्हणून या स्थानास हें नांव आहे. येथें स्नान करून कोणत्याही पुण्यकृत्यास आरंभ केल्यास तें कार्य सिद्धीस जातें. गयावर्जनप्रसंगीं येथें प्रायश्चित करून मग गयावर्जन करावें,

३. ब्रह्मतीर्थ—येथें ब्रह्मदेवानें तीस अश्वमेध केले म्हणून याला ब्रम्हतीर्थ असें म्हणतात. येथें स्नान केलें असतां अश्वमेधयज्ञाचें फळ मिळतें.

४ कलशतीर्थ—हें तीर्थ ब्रह्मतीर्थाच्या पुढें आहे. येथें ब्रह्मदेवानें यज्ञसिद्धि होण्याकरितां कळशाची स्थापना केली म्हणून ही संज्ञा या तीर्थास प्राप्त झाली आहे. येथें स्नान केलें असतां अवभृथ स्नानाचें फल प्राप्त होतें.

५. पितृतीर्थ—हें कलशतीर्थाच्या पुढें शंभर हातांवर आहे. याची लांबी व रुंदी सात हात आहे. हें पितरांस आनंद देणारें आहे. येथें पिंडदानाची गयेपेक्षां ज्यास्त महती आहे. पूर्वीं रामचंद्रांनीं येथें आपला पिता दशरथ याजकरितां पिंडप्रदान केलें होतें. यास्तव या तीर्थाचे ठायीं स्नान करून श्रीरामचंद्राची पूजा करावी व श्राद्ध करून पिंडदान करावें म्हणजे सप्तगोत्रांचा उद्धार होतो.

६. चक्रतीर्थ—हें पितृतीर्थाच्या पुढें आहे. पूर्वीं अंबरीषामुळें दुर्वासामागें लागलेलें सुदर्शनचक्र या स्थानीं विराम पावलें, म्हणून या तीर्थास हें नांव पडलें आहे. या तीर्थाची लांबी रुंदी नऊ हात आहे. या ठिकाणीं चक्रांकित शिला केव्हां केव्हां दृष्टीस पडतात. येथें स्नान करून श्रीविष्णूचें ध्यान करणारास सायुज्यमुक्ति मिळते.

७. व्यासतीर्थ—हें व्यासोनारायणाच्या समोर चंद्रभागेमध्यें आहे. येथें व्यासांनीं तपश्चर्या केल्यामुळें या तीर्थास व्यासतीर्थ हें नांव पडलें आहे. येथें स्नान करून श्रीव्यासाचें ध्यान केलें असतां सौख्य व सुबुद्धि प्राप्त होते.

८. **लक्ष्मीतीर्थ**—व्यासतीर्थाजवळच हें तीर्थ आहे. तेथें पूर्वी लक्ष्मीनें मोठी तपश्चर्या केली. येथें स्नान करून लक्ष्मी देवीची पूजा केली म्हणजे अखंड लक्ष्मी प्राप्त होते.

९. **तीर्थपंचक**—लक्ष्मीतीर्थाच्या पुढें शंखतीर्थ, चक्रतीर्थ, गदा-तीर्थ, पद्मतीर्थ व गोपिकातीर्थ अशीं पांच तीर्थें आहेत. हीं साठ हात लांबीच्या जागेंत आहेत. येथें स्नान केलें असतां सर्व पातकें जाऊन इच्छित फल मिळतें.

१०. **पुंडरीकतीर्थ**—हें तीर्थ पुंडलीकाचे समोर आहे. या तीर्थाचें ठिकाणीं पांडुरंग आहेत. तेथें स्नान करून श्रीविठ्ठलाची पूजा करावी म्हणजे तो प्रसन्न होतो.

११. **मुक्तकेशीतीर्थ**—हें तीर्थ पुंडलीकापासून पुष्पावतीपर्यंत आहे. या तीर्थांत स्नान केलें असतां मोक्षफल मिळतें. येथें अस्थि टाकिल्या असतां तीन महिन्यांनीं त्या अस्थींचें पाणी होतें. ज्येष्ठ शुद्ध अष्टमीचे दिवशीं मुक्तकेशीचे दर्शनाचें मोठें पुण्य सांगितलें आहे.

१२. **संगमतीर्थ**—भीमा व पुष्पावती या नद्यांच्या संगमावर हें तीर्थ आहे. येथून विष्णुपद नजीकच आहे. येथें यमधर्मानें अनु-ष्ठान केलें. या तीर्थाचें जो सेवन करील त्याला धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांची प्राप्ति होईल असा यमधर्माचा वर आहे. या ठिकाणीं स्नान केलें असतां विष्णुलोकाची प्राप्ति होते. वैशाख शुद्ध तृतीया व भाद्रपद शुद्ध एकादशी या दिवशीं येथें स्नान केलें असतां त्याचें विशेष फल मिळतें.

चंद्रभागेचा प्रवाह पूर्वीं क्षेत्राला लागून असावा. नद्यांचे प्रवाह कालांतरानें स्थानच्युत होतात ही गोष्ट सर्वश्रुत आहेच. ह्या निय-

मास अनुसरून चंद्रभागेचा प्रवाहही क्षेत्रापासून दूर दूर वाहत चालला आहे. नदीच्या अलीकडच्या तीराला जे घाट बांधले आहेत ते साधारणपणें १००–१२५ वर्षांपूर्वींचे आहेत. त्यावेळेस प्रवाह घाटाजवळ असावा. प्रवाह क्षेत्रापासून दूर झाल्यामुळें मध्यंतरीं विस्तृत वाळवंट बनलें आहे. ह्या वाळवंटांत पावसाळ्याखेरीज इतर दिवसांत कीर्तनें, भजनें, कसरतींचे खेळ व गांवांतील मुलांचे खेळ चालतात. यात्रेच्या दिवसांत वाळवंटांत यात्राही उतरते. उन्हाळ्याच्या चांदण्या रात्रींत ह्या वाळवंटांत एकटें म्हणा अथवा कीर्तनभजनाजवळ म्हणा, बसण्याची मोठी मौज असते. चंद्राचें शुभ्र व शीतल चांदणें आणि नदीकांठचा शरीरास आनंद देणारा मंद वाहणारा वारा ह्या दोन गोष्टींनीं उष्णकाळचा ताप सर्वतोपरी हरून जाऊन अंतःकरण प्रसन्न होतें व ज्याप्रमाणें समीपस्थ चंद्रभागेच्या अप्रतिबंध प्रवाहांत स्वच्छ पाण्यावर लहरी उठतात, त्याप्रमाणें उदात्त विचारांच्या लहरी मनुष्याच्या अंतःकरणांत उठूं लागतात. अशा समयीं पूर्वरात्र संपत आली तरी नैसर्गिक सौंदर्यानें व त्या जागेंत साधुसंतांनीं जी एकप्रकारची मोहनी घालून ठेविली आहे तीमुळें मन मोहित होऊन घराकडे परतत नाहीं. असो.

वाळवंटांतून गांवांत प्रवेश करण्यास अकरा घाट आहेत. उत्तरेकडून पहिला कृष्णाजीचा घाट—हा म्युनिसिपल कमेटीच्या कचेरीजवळ आहे. हा कृष्णाजी नाईक नरगुंदकर यांनीं सन १८२५ त बांधिला. दुसरा आतां जमिनींत आहे. तोही नरगुंदकरांनींच बांधिला होता. तिसरा उद्धव घाट—हा कमेटीच्या कचेरीच्या दक्षिणेस आहे. हा १७८० त गोपाळ नाईक तांबेकर ह्यांनीं बांधिला. ह्या घाटावरून प्रदक्षिणेच्या निमित्तानें फार लोक उतरतात, चवथा

हरिदास घाट—हा १७८९ त हरी जानाई आप्पा हरिदास यांनीं बांधिला. पांचवा कुंभार घाट—हा रामचंद्र कृष्ण लिमये यांनीं १७९७ त बांधिला. सहावा घाट—हा १७५० त बांधला गेला. ह्या घाटाच्या पांच चार पायऱ्या दिसतात. ह्यावरून हा घाट अपुरा बांधला गेला असावासा दिसतो. सातवा महाद्वार घाट—हा फार रहदारीचा घाट आहे. हा विठोबाच्या देवळासमोर असल्यामुळें स्नानास, प्रदक्षिणेस व पुंडलीकदर्शनास निघण्यास सोयीचें पडतें. हा चिंतो नागेश बडवे ह्यांनीं १७८९ त बांधिला. आठवा कासार घाट—हा रामराव जवळेकर कुळकर्णी यांनीं १७९८ त बांधिला. ह्या घाटाजवळ दक्षिणेस पाध्ये यांची समाधि आहे. नववा चंद्रभागा घाट—हा दुसरा बाजीराव पेशवा व साधु गोविंदबुवा चोपडेकर या दोघांनीं १८१० त बांधिला. प्रदक्षिणेच्या वेळीं पुष्कळ लोक ह्या घाटांनें चढून वर येतात. ह्या घाटापासून दत्ताच्या घाटापर्यंत तट बांधिला आहे. दहावा दत्ताचा घाट—हा चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीकर ह्यांनीं १८२० त बांधिला. अकरावा घाट—हा गोपाळ नाईक जांभेकर ह्यांनीं १७७० त बांधिला. हा घाट गांवाच्या अगदीं शेवटीं असून अपुरा आहे. सर्व घाटांच्या पायऱ्या लांब व रुंद आहेत व त्यांचें कामही मजबुत आहे. घाटांशिवाय फरसबंदीचे रस्ते आहेत. ते गाड्या वगैरे जाण्यायेण्यास सोईचे आहेत.

---

# प्रकरण दुसरें.

## विठोबाचें देऊळ.

चंद्रभागेचें स्नान झाल्यावर आपापल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें किंवा कुलसांप्रदायाप्रमाणें आपलें आन्हिक आटोपून पांडुरंगाच्या दर्शनास जाण्याची वहिवाट आहे. त्याप्रमाणें आम्हीही विठोबाच्या देवालया-संबंधीं सर्व तऱ्हेची माहिती देण्यास सुरवात करितों.

पंढरपुरांतील मुख्य व मोठें असें देऊळ म्हटलें म्हणजे विठोबाचें देवालय होय. हें मध्यवस्तींत असून याची पूर्व पश्चिम लांबी ३५० फूट व दक्षिणोत्तर रुंदी १७० फूट आहे. देवळाच्या सभोंवतीं फरसबंदीचा रस्ता आहे. त्याची जास्तींत जास्त रुंदी २५ फूट आहे. देवळाच्या पुढच्या भागाला गड म्हणतात. देवळाला आठ दरवाजे आहेत; पूर्वेस तीन, दक्षिणेस एक, पश्चिमेस एक व उत्तरेस तीन असे आहेत. पूर्वेकडच्या दरवाजानें लोक फार जातात व येतात. या दरवाज्यास नामदेव दरवाजा असेंही म्हणतात. या दरवाज्या-पर्यंत १२ पायऱ्या चढून जावें लागतें. त्यांपैकीं पहिल्या पायरीस नामदेवाची पायरी असें म्हणतात. असें नांव पडण्याचें कारण येथें नामदेवांनीं समाधि घेतली. नामदेवांनीं येथें समाधि घेण्याचें कारण असें सांगतात कीं, ‘पांडुरंगाचें दर्शनास अनेक भक्त येतात. त्यांचे पाय आपल्या मस्तकास लागल्यास आपण उद्धरूं म्हणून नामदेवांनीं आपण होऊन देवाजवळ या जागेची मागणी केली.’ नामदेवराय देवाचे इतके आवडते भक्त होते कीं नामदेवांच्या मनांत वैकुंठपद

मिळावें असें वाटतांच त्यांना त्याची प्राप्ति झाली असती. परंतु खरे भक्त वैकुंठपदाची इच्छा न करितां देवाच्या पायाजवळ स्थान मागतात. हें त्यांच्या अंगच्या खऱ्या लीनतेचें लक्षण आहे. नामदेवपायरीवर व तिच्या वरच्या पायरीच्या समोरच्या बाजूस पितळेचा पत्रा बसविलेला आहे. नामदेव पायरीवर चढणाऱ्या मनुष्याच्या उजव्या हातास नामदेवाचा एक पितळेचा मुखवटा आहे. वरच्या पायरीच्या समोरच्या बाजूस पत्रा आहे. त्यावर चौदा मनुष्याकृति उठविल्या आहेत. त्या नामदेवांनीं ज्या वेळेस तेथें समाधि घेतली त्याचवेळेस त्यांच्या चवदा नातलगांनीं उड्या घेतल्या त्याचें निदर्शक आहे. नामदेवाच्या मुखवट्यास मराठेशाही पोषाख घालून माळा घालितात व गंध लावितात. हा मुखवटा शिंपी गुमास्त्याच्या देखरेखींत असून त्यापुढें येणारें उत्पन्न बडव्याकडे जातें. नामदेवपायरीपुढें संगमरवरी दगडाची फरशी केली असून तेथें कीर्तन वगैरे होतें. नामदेवराय मोठे साधु व भगवद्भक्त होऊन गेले, म्हणून त्यांच्या पायरीवर पाय देऊन कोणी जात नाहीं.

पायऱ्या चढून दरवाज्याच्या आंत गेलें कीं मुक्तिमंडप लागतो. हा अरुंद व लहान आहे. ह्याच्या दोन्ही भिंतींत समोरासमोर तीन तीन खोल्या असून त्यांत कोणी देवाचे भक्त राहतात. येथेंच डाव्या बाजूच्या भिंतीमध्यें मोठें फडताळ असून त्यांत एक गणपति आहे. या मंडपाच्या वर नगारखाना आहे. नगारखान्यांत जाण्याची वाट मंडपाच्या उजव्या बाजूस आहे.

मुक्तिमंडपाच्या चार पायऱ्या उतरून गेलें कीं एक मोठा फरशी केलेला चौक लागतो. ह्याचें क्षेत्र १२०×६० फुटांचें आहे. ह्याच्या दक्षिण व उत्तर बाजूस ओऱ्या असून देवळांत प्रयोजनें होतात.

तेव्हां येथें स्वयंपाक होतो. इतर वेळीं ह्या दोन्हीं जागा विद्यार्थी अभ्यास करण्यास आणि वारकरी भजन करण्यास उपयोगांत आणितात. पायऱ्या उतरतांच लाकडी मंडप लागतो तो बडव्यांनीं बांधिला असें म्हणतात. येथेंच साधु गुंडोजीबोवा यांचें भजन चातुर्मास्यांत दिवसा चार वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत चालतें. पायऱ्यांच्या उजव्या हातास प्रख्यात साधु प्रल्हादबोवा बडवे यांची समाधि आहे. जवळच कान्हया हरिदास यांची समाधि आहे. ह्या मंडपांत एक लहान दीपमाळ आहे व उत्तरेस मंडपाबाहेर एक तीस फूट उंचीची दीपमाळ आहे. ह्या दीपमाळेजवळच एक दगडी रांजण आहे तो बोधलेबोवांचा आहे असें म्हणतात. मंडपाच्या पश्चिम बाजूंत समोरासमोर दोन दीपमाळा आहेत. ह्यापुढें लाकडी सभामंडप लागतो. यांत एक गरुडाचें व एक मारुतीचें अशीं दोन लहान देवळें आहेत. गरुडाचें देऊळ नीट विठोबाच्या मूर्तीसमोर आहे. गरुडाच्या पुढें पण किंचित् डाव्या अंगास मारुतीचें देऊळ आहे. उजव्या हाताच्या ओवरींत भयंकर मुद्रा दिसणारी मारुतीची एक मूर्ति आहे. श्री समर्थ रामदास स्वामीं यांनीं तिची स्थापना केली. ती भक्ताची कसोटी पाहून प्रसन्न होते. जवळच एक तुळसीवृंदावन आहे. ह्या मंडपांत उजव्या बाजूस माळणी फुलांच्या माळा करीत व विकीत बसतात. येथें कथाकीर्तनेंही होतात. गुंडोजीबोवांच्या दुसऱ्या शाखेचें भजन येथें उजव्या भागांतच घाटीपाशीं होतें.

येथपर्यंत देऊळ पहात येणारास दगडाच्या फरशीवर असंख्य नांवें खोदलेलीं आढळलीं असतील. हीं नांवें खोदविण्यांत भाविक लोकांचा असा समज असतो कीं, 'आपलें नांव पांडुरंगदर्शनास येणाऱ्या भक्तांच्या चरणधूळीनें पवित्र व्हावें.' नांवांप्रमाणेंच पायऱ्या-

वरून व इतर जागीं गोल भोकें आढळतात. हीं भोकें, लोक रुप्याचीं नाणीं हातोड्यानें नवसाकरितां ठोकवितात त्यामुळें झालीं आहेत. रुपलेले रुपे पैशाच्या आशेनें देवाच्या निकटच्या लोकांनीं काढून घेतल्यामुळें आतां भोकें मात्र राहिलीं आहेत.

चौकांतून पायऱ्या चढून वर जातांना डाव्या बाजूस लोळी पडलेली घाटी लागते. ही २॥ फूट उंचीची असून हिचा व्यासही तितकाच आहे. पायऱ्या चढून आलें म्हणजे एक दालन लागतें. ह्या दालनांतून आंतील मंडपांत जाण्यास तीन दरवाजे लागतात. ह्या दरवाज्यासमोर चौकांतून वर येण्यास पायऱ्या आहेत. मधल्या दरवाज्यासमोरील पायऱ्यांच्या दोन्ही बाजूस ओटे आहेत. तेथें माणसें देवाचें दर्शन घेऊन आल्यावर टेकतात. मधल्या दरवाज्यावर पितळेचे पत्रे कुशलतेनें बसविलेले असून त्याच्या एका बाजूस जय व दुसऱ्या बाजूस विजय ह्यांच्या मूर्ति उठविल्या आहेत. दरवाज्याकडे तोंड करून उभें राहिलें असतां डाव्या हातास दालनाच्या भिंतीस एका कोनाड्यांत एक गणपती आहे व उजव्या हातास सरस्वती आहे. ही चतुर्भुजा असून तिच्या वरच्या उजव्या हातांत कमल, खालच्या उजव्या हातांत माळ, वरच्या डाव्या हातांत परशु व खालच्या डाव्या हातांत गदा आहे. दरवाजे लाकडी असून त्यांत लोखंडी गज बसविले आहेत.

ह्या दरवाज्यांतून आंत गेलें म्हणजे सोळखांबी मंडप लागतो. या मंडपाला असें नांव पडण्याचें कारण याला सोळा खांब आहेत. ह्याचें क्षेत्र ( ४१॥ × ४९॥ ) फूट आहे. सर्व खांब दगडी असून त्यांच्या मधल्या चौकोनी चिऱ्यावर कोठें फुलें व कोठें कृष्णलीलेचीं व मत्स्यकूर्मादि अवतारांचीं चित्रें खोदलेलीं आहेत. ह्या खांबांपैकीं

दुसऱ्या ओळींतील दुसरा खांब रुप्याच्या व सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेला आहे म्हणून या खांबास गरुडखांब असें म्हणतात. गरुड हा देवाचें वाहन व भक्त म्हणून सर्व लोक ह्यास आलिंगन देऊन पांडुरंगाचे दर्शनास जातात. ह्या मंडपाच्या दक्षिणेच्या भिंतीला दोन व उत्तरेच्या भिंतीला तीन दरवाजे आहेत, पश्चिमेच्या भिंतींत पली-कडे जाण्यास दरवाजा आहे. त्याला रुप्याचा दरवाजा असें म्हणतात. हा पूर्वीं लहान होता व त्यावर रुप्याचा पत्रा होता. आतां फक्त कडी व तिचें कमळ हीं रुप्यानें मढविलेलीं आहेत.

रुप्याच्या दरवाज्यानें आंत गेलें कीं चौखांबी मंडप लागतो. ह्या मंडपाला चार खांब आहेत, म्हणून याला चौखांबी मंडप असें नांव पडलें आहे. या चार खांबांपैकीं तीन खांबांना पश्चिम व उत्तर बाजूस कठडा लावितात. चौखांबी मंडपाच्या दक्षिण बाजूच्या भिंतींत हत्तीदरवाजा आहे. हा दरवाजा लहान असून त्याच्या पायऱ्यांच्या दोन्ही बाजूला दगडी हत्ती आहेत. म्हणूनच याला हत्ती दरवाजा असें म्हणतात. हत्ती दरवाज्यानें देवाचे उपचार कर-ण्याकरितां जे लोक सोवळ्यानें यावयाचे असतात त्यांना घेतात. देवळांत ज्या वेळेस मोठी दाटी असते, त्यावेळीं ह्याचा विशेष उप-योग होतो. कित्येक लोकांना बडव्यांच्या ओळखीनें दाटीचा त्रास चुकवून चौखांबी मंडपांत जातां येतें. उत्तरेकडच्या भिंतींत एक मोठें कपाट आहे. त्यांत पांडुरंगाचें शेजघर आहे. ह्या शेजघरांत रुप्याचा पलंग असून बहुमूल्य वस्त्रांनीं युक्त अशी शय्या आहे. शेजघराचें दार लाकडी जाळीचें असून त्याला शेजारतीच्या वेळे-खेरीज इतर वेळीं कुलूप असतें. ह्या मंडपाच्या छपराला हवा व

उजेड येण्याकरितां जाळ्या व भोकें राखिलीं आहेत. मंडपाची जमीन संगमरवरी दगडाची आहे.

चौखांबी मंडपांतून पुढें गेलें म्हणजे एक चौरस जागा लागते. हिला कमान असें म्हणतात. कमानीच्या पुढें गर्भागाराचा दरवाजा ( ३×१ ) फूट असून गर्भागाराचें क्षेत्र आठ चौरस फुटांचें आहे. गर्भागार व कमान ह्यांची जमीन संगमरवरी दगडाची आहे. गर्भागारामध्यें एक आठ इंच जाडीची पितळेच्या पत्र्याची दांडी आहे. दांडीच्या पुढें भिंतीला लागून एक प्रभावळ आहे व दगडी चौथ-ऱ्यावर रुपेरी चौरेडोलाच्या आंत विटेवर उभी असलेली एक मूर्ति आहे. हीच पांडुरंगाची मूर्ति होय. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस लहानसे दगडी ओटे देवाचे पुजारी बसण्याकरितां केलेले आहेत.

ज्या मूर्तीच्या दर्शनाकरितां लांबलांबून पंढरपुरास लोक येतात व देवळांत आल्यावर गर्दी व धक्काबुक्की सहन करितात तीच ही मूर्ति होय. ह्या मूर्तीचें नामाभिधान विठ्ठल, पांडुरंग, पंढरीनाथ, विठ्ठलनाथ इत्यादि विविध प्रकारानें उच्चारिलें जातें. विठोबा हा विष्णूचाच अवतार होय व विष्णु शब्दापासून विठू—विठ्ठलु—विठ्ठल असा शब्द बनत आला आहे. विठ्ठल शब्द मूळचाच कानडी असावा असें मत एकानें प्रतिपादन केलें आहे; पण तें इतिहास व पुराण ह्यांच्या पुराव्यानें चुकीचें ठरतें. पांडुरंग हें नांव पंडरिगें ह्या पंढर-पूरच्या मूळ नांवावरून बनलें आहे. पंडरिगेचा तो पांडुरंग; पांडु आहे रंग ज्याचा तो पांडुरंग असा विग्रह करून अर्थ घ्यावयाचा नाहीं. पांडुरंगाची मूर्ति साडेतीन फूट उंचीची आहे. तिच्या डोक्या-वर महादेवाचें लिंग आहे, पाठीवर शिंकें आहे, गळ्यांत कौस्तु-भमणि आहे, हृदयावर वत्सलांछन आहे, पोटावर त्रिवळी आहे,

पायावर ध्वज, अंकुश, यव, वज्र व रोचलेली काठी इत्यादि खुणा आहेत. कंबरेस कंबरबंध आहे. त्याचा एक शेवट उजव्या मांडीवर पडला आहे. इ० स० १८७३ सालापर्यंत देवाच्या पायास कवटाळतां येत होतें. परंतु त्या सालीं पांडुरंगाचे दर्शनास कोणी बैरागी आले होते. दर्शनाचे वेळीं त्यांनीं देवाचे पायावर धोंडा टाकिला. त्यानें मूर्ति दुखावली. प्रसंग भयंकर होता; परंतु बडव्यांच्या चतुराईनें तो निभावला. त्यानंतर पायाला मागें धीर दिला गेल्यामुळें आतां फक्त पायावर डोकें मात्र ठेवितां येतें. पायांस कवटाळितां येत नाहीं. तेव्हांपासून कोणीही गोसावी बैरागी देवदर्शनास येत असल्यास त्याचा झाडा घेऊन त्याला आंत सोडतात.

विठोबाचें दर्शन घेऊन सोळखांबी मंडपाच्या दक्षिणेच्या दरवाज्यानें बाहेर आलें म्हणजे दक्षिण व पश्चिम बाजूंत एक सलग ओसरी आहे. सोळखांबी मंडपांतील खांबांप्रमाणेंच येथें खांब आहेत. त्या ओसरीच्या पूर्वेकडच्या भिंतींत मोठ्या कोनाड्यांतून चार मूर्ति आहेत. पलीकडे दक्षिणेकडे जाऊं लागलें म्हणजे एक तरटीचें झाड लागतें. ह्या झाडाचें मूळ पाहिलें तर वठल्यासारखें दिसतें; परंतु विस्तार पहावा तर कसा टवटवीत दिसतो. याचें मूळ एका शिळेंत असून यास पोषकद्रव्यें माती व पाणी हीं मिळत नसतां तें जिवंत कसें राहिलें याचें आश्चर्य वाटतें! परमेश्वराच्या ह्या अद्भुत जगांत आश्चर्य करण्यासारखें काय नाहीं? ह्या झाडाच्या उत्पत्तीची हकीकत अशी सांगतात कीं, कानुपात्रा नांवाची एक नायकीण पांडुरंगाची भक्त होती. ती पंढरपुरानजीक मंगळवेढें गांवांत राहत असे. तिच्या सौंदर्याची ख्याति ऐकून त्या वेळच्या एका बादशाहानें

तिला धरणें पाठविलें. कानुपात्राचें मन पांडुरंगीं तन्मय झालें असल्यामुळें बादशाहाकडे जाऊन आपलें शरीर भ्रष्ट करून घेण्यापेक्षां भक्ताची लाज राखणाऱ्या पांडुरंगास शरण जाऊन आपला देह त्याचे चरणीं ठेवावा असा विचार करून व धरणेकऱ्यांस 'फक्त पांडुरंगदर्शन घेऊन येतें' असें सांगून ती विठ्ठलदर्शनास देवळांत आली व पांडुरंगाचे चरणांवर मस्तक ठेवून तिनें प्रार्थना केली कीं 'विठ्ठला! मला तुजजवळ ठाव दे.' आपल्या भक्तेची विनंति ऐकून करुणाघन पांडुरंगाचें अंतःकरण द्रवलें व त्यानें तिला आपल्या मांडींत गुप्त करून टाकिलें. त्याच प्रसंगीं हें तरटीचें झाड येथें उत्पन्न झालें व भक्तवत्सल पांडुरंगाच्या कृपारूपीं जिव्हाळ्यामुळें अजूनपर्यंत जिवंत राहिलें आहे. ह्या झाडाच्या खालीं एका कोनाड्यांत कानुपात्रेची प्रतिमा करून बसविली आहे. तरटीच्या झाडाजवळ जो दरवाजा आहे त्याला ह्या झाडाच्या सान्निध्यामुळें तरटीदरवाजा असें म्हणतात.

कानुपात्रेच्या पुढें जवळच उजव्या हातास व्यंकटेशाचें लहान मंदिर आहे. व्यंकटेशाची मूर्ति गंडकी शिळेची असून हिनें आपल्या चतुर्भुजांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें धारण केलीं आहेत. व्यंकोबासमोर ओट्यावर एक नागोबा आहे. व्यंकटेशास उजवें घालून जवळच्या मंडपांत यावें. ह्या मंडपाच्या दक्षिण बाजूंतील ओरी बाजीराव पेशव्यानें बांधिली आहे. मंडपांत मध्यभागीं लक्ष्मीचें देऊळ आहे. या देवळाचे सभामंडप, व मध्यगृह व मूर्तिनिवासस्थान असे भाग आहेत. गाभाऱ्यांत गारेच्या शिळेची फारच सुंदर अशी लक्ष्मीची मूर्ति आहे. लक्ष्मीच्या डाव्या आंगच्या खोलींत

अन्नपूर्णा आहे. लक्ष्मीचें देऊळ १८३० मध्यें गुरसाळ्याचे व्यापारी कवडे* यांनीं बांधिलें. बाजीरावाच्या ओवरींत नारद आहे. तसेंच या ओवरीच्या शेजारीं कोपऱ्यांत वर चढून गेलें म्हणजे एक शिवलिंग लागतें. ह्याचें रामेश्वर असें नांव आहे. पश्चिमेच्या भिंतींतील ओऱ्यांतून सूर्य, गणेश, खंडोबा व नागोबा हे देव आहेत.

विठोबाचे देवळामागें ईशान्येच्या कोपऱ्यांत पूर्वेकडे तोंड करून रुक्मिणीचें देऊळ आहे. ह्यांत मूर्तिनिवासस्थान, मध्यगृह, मुख्य मंडप व लांकडी सभामंडप ह्यांचा समावेश होतो. लांकडी सभामंडपांत देवीपुढें कथाकीर्तनें होतात. येथें एक दीपमाळ आहे. मुख्य मंडपाला सहा खांब आहेत. मध्यगृहाच्या उत्तरेकडच्या भिंतींत एक खोली आहे. तें रुक्मिणीचें शेजघर होय. मध्यगृहाच्या दक्षिणेकडच्या भिंतीस दरवाजा आहे. तिकडून सत्यभामा व राही ह्यांच्या मंदिराकडे रस्ता जातो. मध्यगृहाच्या पलीकडे गर्भागार आहे. त्यांत रुक्मिणी देवीची सिंहासनस्थ मूर्ति आहे. रुक्मिणीच्या जवळचा रस्ता टाकून दोन खोल्या आहेत. त्यांपैकीं एकींत सत्यभामा व दुसरींत राही आहे. रुक्मिणीकडून दक्षिणेकडच्या दरवाजानें येतांना डाव्या हातास नवग्रहांची एक शिला आहे.

रुक्मिणीच्या सभामंडपाच्या पायऱ्या चढून वर आलें म्हणजे रुक्मिणीसमोर अश्वत्थ वृक्ष लागतो. ह्याचें नांव सुवर्णपिंपळ हें आहे. येथून रुक्मिणीचें पुनः मुखदर्शन घेतात. ह्याला पार आहे. ह्या वृक्षाजवळच्या ओवरींत डावीकडून उजवीकडे जाऊं लागलें म्हणजे सात खोल्यांतून पुढील देव दिसतात. पहिलींत काशीविश्वनाथ,

---

* कवडे व्यापारी नसून योद्धे होते अशीही माहिती लागते.

[library stamp]

दुसरींत रामलक्ष्मण, तिसरींत पिनळेच्या पत्र्यानें मढविलेल्या कुत्र्यावर आरुढ झालेली कालभैरवाची मूर्ति, चौथींत रामेश्वराचें लिंग, पांचवींत दत्तात्रय व सहावींत नरसोबा असून सातवी रिकामी आहे. या खोल्या कानबाबा बडव्यानें बांधिल्या. ह्या खोल्या व सोळखांबी मंडप यांमध्यें अरुंद रस्ता आहे. त्याच्या पूर्व टोंकास भिंतींत एक शिलालेख आहे. याला चौऱ्याऐशीं असें म्हणतात. ह्याच्यावरच देवी बसविली आहे. चौऱ्याऐशींचा शिलालेख व देवी ह्यावरून या ठिकाणास चौऱ्याऐशींची देवी असें म्हणतात. ह्या दगडास पाठ घासली असतां लक्ष चौऱ्याऐशीं जन्मांचा फेरा चुकतो असा भाविक लोकांचा समज आहे.

चौऱ्याऐशींचें दर्शन घेऊन सोळखांबी मंडपांत आलें असतां वायव्येकडील कोपऱ्यांत दोन पादुका आहेत. एक पादुकांचा जोड सूर्यनारायणाच्या मूर्तीसमोर उत्तरेकडील दरवाजाजवळ आहे. त्याच्या अलीकडे जो दुसरा जोड आहे त्याला गारेच्या पादुका असें म्हणतात. दामाजीपंताच्या विनंतीवरून महाराचे वेषांत पांडुरंगानें बादशाहाला जें दर्शन दिलें तें ह्या जागीं. त्याचें निदर्शक ह्या पादुका होत. पांडुरंगाचें मुखदर्शन घेण्याच्या तीन जागा आहेत. पहिली चौखांबी मंडपांतील रंगशिला, दुसरी गरुडखांबाजवळची व तिसरी मुक्तिमंडपांतील गणपतीच्या जवळची जागा ह्या तिन्ही जागांवरून पांडुरंगाचें मुखदर्शन उत्तम प्रकारें होतें. तिसऱ्या जागेवरून सूर्याचीं किरणें देवाच्या पायांवर वर्षाच्या कांहीं नियमित दिवसांत पडतात. ह्या गोष्टीवरून त्यावेळीं शिल्पशास्त्रांत प्राचीन कारागिरांची किती प्रवीणता होती तें कळून येतें.

मुक्तिमंडपांतून बाहेर येऊन उजवीकडे वळलें म्हणजे जो भाग लागतो तेथील खोलींत तेहतीस कोटि देव आहेत. या ठिकाणीं कोटि या शब्दाचा अर्थ संख्या असा न धरितां प्रकार असा धरावयाचा. ह्याची पूजा वगैरे रामानुजपंथी लोकांकडून होते व उत्पन्नही त्यांनाच मिळतें. ह्या देवासमोर एक मारुति आहे. तसेंच येथें जवळच एक मोठा वटवृक्ष आहे. हा जुनाट असून वटसावित्रीचे दिवशीं सर्व स्त्रिया ह्याचें पूजन करितात. विठोबाच्या देवळाच्या शिखरदर्शनाचें माहात्म्य मोठें असून यात्रेच्या दिवसांत लोकांस विठोबाचें दर्शन होणें शक्य नसतें त्या वेळीं शिखरदर्शनावर आपली इच्छा भागवितात. शिखराजवळ एक सुवर्णकलश आहे.



# प्रकरण तिसरें.

## देवाचे उपचार.

विठोबाच्या उपचारांचे वर्णनास सुरवात करण्यापूर्वीं बडवे व सेवाधारी ह्यांची थोडी माहिती देणें जरूर आहे. बडवे हे देवाचे मुख्य उपाध्ये असून देवाची व्यवस्था ठेवणारे पंच आहेत. ते स्वतःला देवाचे मालक असें समजतात. बडव्यांचीं घरें ८० आहेत. पुजारी, बेणारी, परिचारक, हरिदास, डिंगरे, डांगे व दिवटे हे सात देवाचे सेवाधारी होत. पुजारी यांच्याकडे देवाची पूजा करण्याचें काम आहे. ते देवाला स्नान घालितात, वस्त्रें नेसवितात, दागिने घालितात, फुलें वाहतात, धूप दीप दाखवितात व देवाच्या प्रत्येक उपचाराचे वेळीं ते हजर असावे लागतात. पुजाऱ्यांचीं ६।७ घरें आहेत. बेणारी म्हणजे स्तुतिपाठक. हे पूजेच्या वेळेस मंत्र म्हणतात. परिचारक हे देवाच्या स्नानाकरितां पाणी आणितात. हरिदास देवापुढें पंचपदी म्हणतात. डिंगरे यांचें काम देवास पोषाख घातल्यावर आरसा दाखविण्याचें आहे. शेजारतीच्या वेळीं पाऊलघडी हेच घालितात. डांगे हे प्रत्येक पूजेच्या वेळीं सोन्याची अथवा रुप्याची मढविलेली काठी घेऊन कमानींत असतात. दिवटे हे शेजारतीच्या वेळीं दिवटी घेऊन उभे असतात. उत्पात रुक्मिणीचे पुजारी होत. पूजेसंबंधीं सर्व गोष्टी तेच आपआपसांत वांटून घेतात. उत्पात ऋग्वेदी ब्राह्मण आहेत. बडवे, पुजारी, बेणारी, डिंगरे व दिवटे हे

यजुर्वेदापैकीं कण्व शाखेचे आहेत. हरिदास व डांगे माध्यंदिन शाखेचे आहेत. हे सर्व देशस्थ ब्राह्मण आहेत. बडव्यांचीं मल्हार, शामराज, तानबा व तिमनची अशीं चार घराणीं झालीं आहेत. तसेंच उत्पातांचीं बाराभाई, उंडेकर, खडकर व उत्पात अशीं आहेत. अशीं घराणीं विभागण्यांत हेतु एवढाच कीं, सोयर अथवा सुतक आलें म्हणजे देवाच्या सेवेंत अंतर न पडावें

अहोरात्र साधारणपणें देवाची सहा वेळां पूजा होते. काकडारती, पंचामृतस्नानाची पूजा, मध्यान्हपूजा, तृतीय प्रहराची पूजा, धूपारती व शेजारती हे देवाचे नित्योपचार होत. ह्यांची क्रमाक्रमानें पुढें हकीकत देण्यांत येत आहे.

पहाटेस पांच वाजतां गांवांतील कांहीं लोक व नवीन आलेले यात्रेकरू पांडुरंगाचे सकाळचे तिन्ही उपचार पाहण्यास येतात. ह्या वेळेस सोळखांबी मंडपाचीं द्वारें लागलेलीं असतात तीं बडवे उघडतात. रुप्याचा दरवाजाही उघडतात. ह्या वेळेला देवाला लांबूनच पाहण्यांत काय मौज वाटते ती वर्णन करितां यावयाची नाहीं. मला तर त्या वेळचा देखावा उदात्त वाटतो! एकटा पांडुरंग!! कोणाचा गलबला नाहीं. त्या वेळीं पांडुरंगास साष्टांग प्रणिपात घालून स्तुतिस्तोत्रांनीं आळवावेसें वाटतें व आदल्या दिवशींच्या शेजारतीच्या वेळीं फुलांच्या माळा घालून नटविलेला पांडुरंग किती वेळां पाहिला तरी नेत्रांची तृप्ति होत नाहीं. ह्या वेळीं कांहीं लोक सोवळ्यानें येतात ते पांडुरंगाच्या गाभाऱ्यांत जाऊन बसतात. ब्राह्मण कमानींत बसतात. इतर लोक व बायकामुलें चौखांबी मंडप व सोळखांबी मंडप ह्यांत आपणास देव दिसेल अशा रीतीनें बसतात. नंतर बडवे व सर्व सेवाधारी सोवळ्यानें पूजासाहित्य घेऊन येतात व

काकडारतीस सुरवात होते. बेणारी ‘ उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविंद उत्तिष्ठ गरुडध्वज । उत्तिष्ठ कमलाकांत त्रैलोक्यं मंगलं कुरु ।’ अशी स्तुति करितात. पुजारी देवाचे पाय दुधानें धुवून नवीन गंध कपाळाला लावतात. माळा घालतात व धूपदीप नैवेद्य दाखवून काकडारती ओवाळण्यास सुरवात करतात. काकडारती ओवाळण्याचें उपकरण कांडीसारखें असतें व त्याच्या वरच्या तोंडास तुपांत भिजविलेल्या कापसाच्या वातींचा जुडगा बसविलेला असतो. परिचारक ही चांदीची कांडी पुजाऱ्याचे हातांत देतो व पुजारी देवाचे पायापासून मस्तकापर्यंत व तेथून पायापर्यंत हळूं हळूं ओवाळितो. या आरतीच्या प्रकाशांत विठ्ठलाचें मुख फारच मनोहर दिसतें. काकड्याचे वेळीं आरत्या म्हणतात त्या:—

## पहिली.

**अनुपम्य नगर पंढरपुर, भीमा मनोहर, संतांचें माहेर अव्यक्त आदिमूर्ति परब्रम्ह साकार, विटेवरी उभें नीट, कटीं ठेवुनि कर, । जय देवा पांडुरंगा, जय आनंदकंदा, आरती ओवाळीन पुंडलीक वरदा।ध्रु०। गोमती, गोदावरी, यमुना, सरस्वती, कृष्णा, तुंगभद्रा, नर्मदा, भागीरथी, सकळीक माध्यान्हीं चंद्रभागेसी येती, कनक पात्रीं आरती या विठोबासी ओवाळिती । जय देवा० ॥ २ ॥ धन्य हा वेणुनाद, क्रीडा करी गोविंद, पश्चिमेसि पद्मतीर्थ, क्षेत्रपाळ प्रसिद्ध, नारद तुंबरहो गाती ध्रुव, प्रल्हाद, प्रेमें आनंदभरित करताती आनंद । जय० ॥ ३ ॥ तीर्था क्षेत्राचिया ऐशा म्हणती कोटी, पांडुरंग एक स्थळीं नेणती घडी वामांगे रखुमाई वेद बोलती प्रौढी, जयजयकार गर्जती देव तेहतीस कोटी ॥जय०॥४॥ ऐसा देवाधिदेवो विठु पंढरीरावो, भक्त जना कुटुंबिया देवी-**

रखुमाई रावो, पुरवील मनकामना कैवल्य पावो, कानया* हरिदास हा मागें प्रेमपाश राहो । जय देवा० ॥ ५ ॥

## दुसरी.

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा । पुंडलिका भेटीं परब्रह्म आलें गा चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा । जय देव जय देव जय पांडुरंगा । रखुमाई वल्लभा राहीच्या वल्लभा पावे जिवलगा ॥ १ ॥ तुळशी माळा गळां कर ठेवूनि कटीं । कासे पीतांबर कस्तुरी ललाटीं । देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढें उभे राहती । जय देव० ॥ २ ॥ आषाढी कार्तिकी भक्त जन येती । चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती । दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ति । केशवासी नामदेव भावें ओंवाळिती ॥ ३ ॥

## तिसरी.

आरती अनंतभुजा । विठु पंढरीराजा । न चलती उपचार, मनें सांरिली पूजा ॥१॥ परेसी पार नाहीं । न कळे निगमा ठाईं । भुलला भक्तिभावें । लाहो घेतला देहीं । अनिर्वाच्य शुद्धबुद्ध । उभा राहिला नीट । एका जनार्दनीं पाईं जडली वीट ॥३॥

ह्या तीन आरत्या झाल्यावर सर्व ब्राह्मण देवावर ‘ जय जय ’ म्हणून मंत्र-पुष्पांजलि टाकितात; मग पंचामृत स्नानास व पूजेस आरंभ होतो. प्रथम पुजारी देवाच्या अंगावरच्या माळा व वस्त्रें काढून घेतो. मग परिचारक रुप्याचे घंगाळांत उष्णोदक ओतून देवास स्नान घालण्यास पुजाऱ्यास देतो. उदकस्नान झाल्यावर दूध, दहीं, तूप, मध व साखर ह्या पंचामृतांनीं स्नान घालितात. देवाच्या अंगावर दहीं घालतात तेव्हां देव फार मनोहर दिसतो. दधिस्नान झाल्यावर लोण्याचा गोळा देवाचे तोंडास लावितात. व

* ह्यांची समाधि प्रल्हादबोवा बडवे यांचे जवळ आहे.

आरती ओवाळितात. नंतर तो गोळा काढून घेतल्यावर मध व साखर देवाचे अंगास लावून पाठीमागून दूध घालितात, व सरतेशेवटीं शुद्धोदक स्नान घालून देवास धोतर नेसवितात, अंगांत अंगरखा घालितात, व डोक्याला पागोटें बांधितात. देवाचे तोंडास सुवासिक तेल लावितात; गंध लावितात; व गळ्यांत फुलांच्या माळा घालितात. मग डिंगरे देवास आरसा दाखवितात. नंतर एकारती व धूपारती होऊन देवास नैवेद्य दाखवितात. येणेंप्रमाणें सकाळची पूजा होते. मग स्नान करून आलेल्या लोकांस सोवळ्यानें अथवा ओवळ्यानें देवाचें दर्शन घेण्यास मोकळीक होते. ज्यांनीं स्नान केलें नसेल त्यांनीं देवाचें लांबून दर्शन घ्यावें. देवास स्पर्श करूं नये.

पूजा झाल्यावर एक दिवसकरी बडवे व एक पुजारी हे देवाजवळ बसतात. सकाळची पूजा झाल्यापासून शेजारतीपर्यंतच्या वेळांत पुष्कळ लोक देवाचे दर्शनास येतात; येणाऱ्यांपैकीं कोणी देवास फळें, कोणी मेवामिठाई व व्यावहारिक द्रव्य वगैरे अर्पण करितात. हें जें उत्पन्न देवापुढें येतें तें दिवसकरी बडवे व पुजारी आपआपल्या हक्काप्रमाणें घेतात. दररोज रात्रीं शेजारतीनंतर दुसऱ्या दिवसाबद्दल अमुक रक्कम बडवेकमेटीस देऊं असें ठरवून त्या दुसऱ्या दिवसापुरता बडवे देवाच्या पुढें येणाऱ्या उत्पन्नाचा मालक होतो. दिवसकरी बडव्यानें नंदादीपास तेल मिळवून देण्याची वहिवाट आहे. रुक्मिणीकडे प्रायः महिन्याचा खंड होतो.

नऊ वाजल्यापासून एक वाजेपर्यंत देवास लोक सोवळ्यानें महानैवेद्य घेऊन येतात. महानैवेद्य दाखविणारानें देवास नैवेद्य समर्पण करून देवाचे पायावर डोकें ठेवल्याशिवाय तो देवास पावता होत नाहीं. याविषयीं एक आख्यायिका ऐकण्यांत आहे कीं, पंढरपुरस्थ

हरिभक्ति-परायण विद्वान् साधु व धर्मसिंधुकार बाबा पाध्ये यांचा देवास रोज नैवेद्य जात असे. एके दिवशीं त्यांच्या घरच्या एका अतिसोवळ्या ब्राह्मणाकडे नैवद्य दाखवून आणण्याचें काम आलें. तो देवळांत नैवेद्य घेऊन जाऊन देवास लांबून नैवेद्य दाखवून आला. त्याच्या मनांत असें आलें कीं ज्या देवास आपल्या देवत अंगरखा-पागोटें घालून लोक शिवले; त्या देवास आपण कडकडीत सोंवळ्यानें भेटून ओंवळें होणें प्रशस्त नव्हे. ब्राह्मण घरीं आला व रोजच्याप्रमाणें त्यांचीं नित्यकृत्यें झालीं. रात्रीच्या वेळीं बाबा देवास आठवूं लागले तों देव म्लानवदन दिसले. तेव्हां त्यांनीं देवास त्याचें कारण विचारिलें. त्यावरून त्यांना देव आज अशा अशा तऱ्हेनें उपवासी आहेत असें कळून आलें. त्यांनीं लागलींच नैवेद्य तयार करवून स्वतः देवास नेऊन दाखविला. बाबांशीं देव बोलत असत व त्यांच्या मोठ्या मनोरंजक आख्यायिका आहेत हें पंढरपुरांतील वृद्ध जनांस व पंढरीभक्तांस ठाऊक आहेच.

दुपारीं तीन वाजण्याचे सुमारास देवास दुसरा पोषाख घालितात. त्या वेळीं देवाचे पाय धुवून सकाळचा पोषाख उतरतात व नवा पोषाख घालितात. सणाचे दिवशीं जरा अगोदर पूजा करून देवास महावस्त्रांचा पोषाख करितात व दागिने घालितात. या वेळेसही देवास नैवेद्य दाखवितात. पांडुरंगास मोठमोठ्या सणास जे दागिने घालितात त्यांपैकीं ठळक ठळक दागिने खालीं दिले आहेत—

**सोन्याचे**—पायांत पैंजण व साखळ्या; हातांत कडीं तोडे; दंडांत बाहूभूषणें; कानांत मत्स्याकार कुंडलें; सोन्याचा मुकुट, नाम, नेत्र, बोराएवढ्या सोन्याच्या मण्यांच्या पांचचार माळा, पुतळ्यांच्या

माळा, होनांच्या माळा, मोहरांच्या माळा, जवांच्या माळा, सूर्यहार, चंद्रहार, जानवें, मुरली, पागोटें व धोतर.

जडावाचे—कानांत चौकडा, शिरपेंच, नाम, कौस्तुभमणि व कमळाचा जडावाचा हार.

**मोत्याचे**—बोरा एवढ्या मोत्याची एकावळी, मोत्यांचे कंठे इत्यादि.

संध्याकाळीं दिवे लावण्याच्या सुमारास पांडुरंगाची धुपारती होते. ह्या वेळीं सकाळच्याप्रमाणें सेवाधारी हजर असतात. हरिदास टाळ घेऊन स्तवन करण्यास येतो. परिचारक धूपदीपाचें सामान घेऊन येतो व बडवे फुलें, गंध, माला, अक्षता, बुका व नैवेद्य हें साहित्य आणवितात. ह्या वेळीं कित्येक नेमाचे लोक धूपारती पाहण्यास येतात. पुरुष चौखांबी मंडपांत, ब्राह्मण कमानींत व स्त्रिया सोळखांबी मंडपांत बसतात.

उशिरा येणारे लोक खांबावर चढून आरती पाहतात. सेवाधारी आल्यावर डांगे, गाभाऱ्यांत अंगरखा पागोटें घालून आलेले दर्शनेच्छु लोक असतील त्यांना सवडीप्रमाणें दर्शन घ्यावयास लावून अथवा मग घेण्यास सांगून गाभारा मोकळा करितात, व आंत सेवाधारी जातात. सर्व मंडळींचें ध्यान देवाकडे लागलेलें असतें, व गडबड बंद झालेली असते. अशा वेळीं पुजारी देवाचे पाय धुतो. मग देवाचें पूर्वींचें गंध काढून घेऊन नवें गंध लावतो. तोंडास सुवासिक तेल लावतो. गळ्यांत माळा घालतो. मग धूपारती व दीपारती ओवाळतो. या वेळीं प्रेक्षकजन 'जय जय रामकृष्ण हरी' ह्या दशाक्षरी मंत्रानें भक्तिपुरस्सर देवाची प्रार्थना करीत असतात. देवाचे पाय धुतल्यानंतर तें तीर्थ सर्वांस मिळतें. नैवेद्य दाखविण्याचे

वेळीं सर्व प्रेक्षकजन पुढील पद मोठ्या प्रेमानें म्हणत असतात.

**जेवीं बा सगुणा । सख्या हरी । जेवीं बा सगुणा । कालविला दहिंभात आले मिरे लवणा । जेवीं बा सगुणा ॥ १ ॥ साय दुधावरी साखर रायपूरी कान्हवले चिमणा । सख्या० ॥ २ ॥ उद्धव चिद्घन शेष इच्छिती गोपाळा रमणा । सख्या हरी ॥ ३ ॥**

सरते शेवटीं युगें अठ्ठावीस ही नामदेवाची धूपारती झाल्यावर देवळांतील इतर देवांसही धूपारती ओवाळतात. सर्व नागरिक जनांस धूपारतीचे वेळीं देवळांत हजर असतां येत नाहीं. म्हणून परिचारक ती देवाची आरती गांवभर हिंडवितात. ह्या त्याच्या कृतीनें लोक कृतार्थ होऊन त्या इसमास कांहीं देणगीही देतात.

नित्योपचारांपैकीं देवाचा शेवटचा उपचार म्हटला म्हणजे शेजारती हा होय. ही शेजारती दहा वाजण्याचे सुमारास होते. ह्या वेळेस हरिदासाशिवाय सर्व सेवाधारी हजर असतात. बडवे येऊन शेजघराचें दार उघडतात; व बिछाना साफसूफ करून ठेवितात. तसेंच देवाचे उपचाराकरितां फळें, मेवामिठाई, पाणी, दूध, फुलांच्या माळा वगैरे सामान आणितात. डिंगरे हे देवाच्या सिंहासनाकडून शेजघरच्या दरवाजापर्यंतची जागा पाणी शिंपडून व झाडून स्वच्छ करितात. ह्या वेळेस अगोदरच कठडा काढून ठेवलेला असतो. नंतर ते रांगोळी घालून सुमारें १॥ फूट रुंदीचें कापड सिंहासनापासून शेजघरापर्यंत हंतरतात. या कापडावर गाईचीं व कृष्णाचीं पाउलें असतात. डांगे हातांत काठी घेऊन उभे असतात, व त्यांचे समोर हातांत पेटविलेली दिवटी व बुधली घेऊन दिवटे उभे असतात. बेणारी कमानींत देवासमोर उभे राहून देवाचीं स्तुतिस्तोत्रें म्हणत असतात. देवाचे कपडे निघण्यापूर्वीं बेणारी स्तोत्रें म्हणून एक एका-

रती देवास ओवाळतात. आंत पुजारी देवाचे पाय धुवून गंध पुसून सर्व पोषाख अंगावरून उतरतात व नंतर नवा पोषाख चढवितात. या वेळचा पोषाख डोक्यास पागोटें, कंबरेखालीं धोतर व मध्यभागास गुंडाळलेलें धोतर एवढा असतो. त्यावर पुष्कळ माळा देवास घालितात. माळा इतक्या घालितात कीं त्यांत देवाचें सर्व अंग झाकून जातें. देवास कलगी तुरेही घालितात. नंतर तोंडास तेल लावून केशरी गंध व अक्षद लावितात. नंतर धूप, दीप व नैवेद्य दाखवितात. मग दोघे बडवे गर्भागारांत राहून पांच आरत्या, पदें म्हणत म्हणत ओवाळितात. लोकही आरत्यांचीं पदें म्हणतात. त्या आरत्यांपैकीं तीन येथें देतों.

## आरती पहिली.

हरि चला मंदिरा ऐशा म्हणती गोपिका । भावें ओवाळिती यादव कुळटिळका। एकीकडे राही एकीकडे रखुमाई । मयूरपिच्छ चामरें ढाळिती ठाई ठाई ॥ २ ॥ अष्टाधिक सोळा सहस्र ज्याच्या सुंदरा । ज्या ज्यांनीं प्रार्थिलें गेला त्यांचिया घरां ॥ ३ ॥ एका जनार्दनीं हरि तूं लाघवी होसी । इतुक्याही भोगुनी ब्रह्मचारी म्हणविसी ॥ ४ ॥

## दुसरी.

चरणकमल ज्याचे असति सुकुमार । ध्वजवज्रांकुशरेखा चरणीं ब्रीदाचा तोडर ॥ १ ॥ ओवाळूं आरती मदन गोपाळा ॥ श्यामसुंदर गळा वैजयंति माळा ॥ २ ॥ नाभीं कमळीं ज्याचे ब्रह्मयाचें स्थान । हृदयीं पदक शोभे श्रीवत्स लांछन ॥ ३ ॥ मुखकमल ज्याचें पाहतां सुखाच्या कोटी । वेधलें मानस हारपली दृष्टि ॥ ४ ॥ एका जनार्दनीं देखियेलें रूप । रूपाचि पाहतां अवघें झालें तद्रूप ॥ ५ ॥

## तिसरी.

**संतसनकादिक भक्त मिळाले आणिक । स्वानंदें गर्जती पाहूं आले कौतुक ॥ १ ॥ नवल होताहे आरती देवाधिदेवा स्वर्गीहुनी सुरवर पाहूं येती केशवा ॥ २ ॥ नरनारी बाळा टक पडिलें नयना । ओंवाळितां श्रीमुख धणी न पुरे मन ॥ ३ ॥ एका जनार्दनीं मंगल आरत्या गाती । मिळाले वैष्णव जयजयकार गर्जती ॥ ४ ॥**

ह्या आरत्या म्हणून झाल्यावर देव शेजघरांत निजावयास जातात. ह्या वेळीं शेजारतीस आलेल्या सर्व लोकांस प्रसाद मिळतो. नंतर लोक घराकडे जातात बडवेही चौखांबी मंडपाला कुलूप घालून घराकडे जातात.

वर श्रीपांडुरंगाच्या उपचारांचें वर्णन केलें. त्याचप्रमाणें रुक्मिणीकडे ते उपचार, पांडुरंगाचे उपचार होत असतांनाच होतात. पांडुरंगाप्रमाणें रुक्मिणीलाही सणाचे दिवशीं अलंकार घालितात. रुक्मिणीच्या दागिन्यांपैकीं ठळक ठळक दागिने पुढें लिहिले आहेतः—

**सोन्याचे**—पैंजण, साखळ्या, गोट, पाटल्या, तोडे, वाक्या, सरी, माळा, कंठा, चंद्रहार, मोहोरांच्या माळा, पुतळ्यांच्या माळा, अकबरी चौकटी मोहोरांची माळ, जवमाळ, पातळ, कर्णफुलें व मंगलसूत्र.

**जडावाचे**—कंबरपट्टा, शिंद्याचा हार (ह्याचे पाचू हिरवे असून ह्याला खारकेएवढीं लांब मोत्यें आहेत. असे पांच पांच मोत्यांचे सर आहेत. हा गळ्यापासून मांड्यांपर्यंत लांब पडतो.) ठुशी ( वर मोतीं व खालीं हिरवे पाचू ), बाजूबंद, बिंदी, बिजवरा, कर्णफुलें, मुकुट, मत्स्य व तन्मणी.

**मोत्यांचे**—कंठे, पेट्या, पोतपेट्या, पाटल्या, जवे, बांगड्या,

बाजुबंद, बिंदी, बिजवरा, मोठी नथ, काप, पुतळी व पैठणी.

देवास बुधवारीं व शनिवारीं अभ्यंगस्नान घालतात. एकादशीला रोजच्याप्रमाणें शेजारती होऊन देव शयनमंदिरांत शयनास जात नाहींत. त्या दिवशीं बाबा पाध्ये यांच्या आरत्यांचीं पदें म्हणून देवास आरत्या ओंवाळतात. एकादशीस देवास उपवासाच्या जिनसांचा नैवेद्य दाखवितात. धनसंक्रातीपासून मकरसंक्रातीपर्यंत देवास खिचडीचा नैवेद्य असतो व पोषाखाचे वेळीं कानपट्टी बांधितात. माघ शुद्ध पंचमीपासून रंगपंचमीपर्यंत देवाच्या पायांवर गुलाल टाकितात, व डोक्यास बसंती पागोटें बांधतात. उन्हाळ्यांत तिसरे प्रहरीं देवास गार पाणी, उपहारार्थ कांहीं फराळाचे पदार्थ, व तांबूल हीं अर्पण करतात. पूर्वीं पाडव्यापासून मृग नक्षत्र निघेपर्यंत देवास तिसरे प्रहरीं गंधाची उटी करीत असत. आतां शेजारतीचे वेळीं करितात. गोकुळ अष्टमीचा नऊ दिवस देवाकडे चांगला उत्सव होतो. त्या वेळीं कथा, कीर्तन व ब्राह्मणभोजन होतें. * महाद्वार काला देवळांत आषाढ वद्य १ स व कार्तिक वद्य २ स होतो. त्या वेळीं हरिदासाचे डोक्याला पादुका बांधून वाजत गाजत त्याला देवळांत आणितात. काला मारुतीपाशीं होतो. काला पाहण्यास पुष्कळ लोक जमलेले

* ह्याचें नांव नामदेव काला असेंहि आहे. हा काला साधु नामदेव करीत असत व पुढें तो त्यांच्या वंशजाकडे चालू होता. पुढें कांहीं कारणांनीं हरिदासांनीं करण्याची वहिवाट पडली. हरिदासाला पादुका बांधून पाठीवर बसवून आणितात. काल्याचे वेळीं गोकुळांत कृष्ण जे खेळ खेळले त्यांपैकीं कांहीं करून दाखवितात. हमामा, हुंबऱ्या, फुगड्या, टिपऱ्या, चेंडु वगैरे खेळ खेळतात.


असतात. काल्याची हंडी मारुतीपाशीं असते ती फोडतात व मग काल्याचा प्रसाद सर्वांस देतात. हरिदासास खांद्यांवर घेऊन मारुतीलि प्रदक्षिणा घालतात त्यावेळीं तो पांडुरंगासारखा दिसतो. काला झाल्यावर त्याला घरीं पोचवितात. त्या दिवशीं तो देहभानावर नसतो. दुसरे दिवशीं शुद्धीवर येतो.

देवाप्रमाणें रुक्मिणीमातेला मंगळवारीं व शुक्रवारीं अभ्यंगस्नान घालतात. उन्हाळ्यांत तिसरे प्रहरीं पाणी अर्पण करितात व उटी लावितात. धनसंक्रांतीपासून महिनाभर खिचडीचा नैवेद्य असतो. नवरात्रांत देवीचा उत्सव नऊ दिवस चांगला होतो. रोज दागिने घालितात. देवीपुढें नऊ दिवस पुराण, गायन, कथा व ब्राह्मण-भोजन हीं होतात. अष्टमीच्या दिवशीं सर्व पांढरा पोषाख व मोत्यांचे दागिने घालतात. त्या दिवशींचा पोषाख व भोंवतालच्या सर्व गोष्टी पाहून असें वाटतें कीं त्रिभुवनसुंदरी कमलजा देवी हिच्या आनंद-मंदिरांत जणूं काय आपण आलों आहों ! सर्व सण, भोगी, संक्रांत व किंक्रांत ह्या दिवशीं देवीस दागिने घालतात. राखीपौर्णिमेस राखी व अलंकार घालतात.

आषाढी व कार्तिकी या यात्रा पंढरपुरास दांडग्या भरतात व त्यावेळीं लाखों लोक दर्शनास येतात. त्या सर्वांना देवाचे नित्य उपचार चालल्यास दर्शन व्हावयाचें नाहीं ह्यासाठीं यात्रा भरूं लागण्याचे पूर्वीं म्हणजे शुद्ध पंचमीस देवाचा व देवीचा पलंग बाहेर निघतो. तेव्हांपासून प्रक्षाळपूजा होईपर्यंत दोघांचे सर्व नित्यो-पचार बंद असतात. फक्त सकाळचें स्नान व पूजा दोहोंकडे होते व अहोरात्र देवाचे दर्शनास मोकळीक असते. यात्रेच्या दिवसांत भक्तांस अहोरात्र दर्शन दिल्यामुळें पांडुरंगास शिणवटा येतो अशी

समजूत आहे. म्हणून प्रक्षाळपूजेचे दिवशीं उंची उटण्यांनीं व साखरेनें देवाचें अंग चोळून स्वच्छ करितात. ह्या दिवशीं गांवांतल्या लोकांकडून साखर व पाणी देवास स्नान घालण्यास येत असतें. देवास पुष्कळ स्नानें घालतात. ह्यांचा हेतु देवाचा शीण जावा हा असतो, व ज्या वेळेस देवाचे अंगास घाम सुटलासा दिसतो तेव्हां स्नान घालणें बंद करून पोषाख घालून धूपदीप व नैवेद्य हीं अर्पण करितात. देवाचे स्नानानंतर बडवे लक्ष्मीसमोर स्नानें करितात. हा समारंभ पाहण्यास लोकांची गर्दी होत असते. प्रक्षाळपूजेचा समारंभ एकवार अवश्य पहावा.

ह्याशिवाय देवळांत गौरी व गणपति ह्यांचा उत्सव होतो. महालक्ष्मीच्या समोरील ओट्यावर गणपति बसवितात. हा गणपति मोठा प्रेक्षणीय असतो. ह्याचें विसर्जन अनंतचतुर्दशीस होतें. बडवे मोठ्या घाटीजवळ गौरी बसवितात व उत्पात रुक्मिणीकडे दुसरी गौरी बसवितात.



# प्रकरण चवथें.

## प्रदक्षिणेच्या वाटेवरील देव.

विठोबा–रखुमाईचें दर्शन घेतल्यावर प्रदक्षिणेस जाण्याचा सांप्रदाय आहे. देवळांतून निघाल्यावर महाद्वारांतील देवांचें दर्शन घेऊन महाद्वार घाटानें खालीं उतरून पुंडलीकास नमस्कार व प्रदक्षिणा करून चन्द्रभागा घाटानें वर यावें. पुढें दक्षिणेस दत्ताचें व महादेवाचें दर्शन घेऊन पश्चिमेस वळावें. नंतर काळा मारुति व कृष्णाजीबोवा यांची समाधि यांचें दर्शन घेऊन उत्तरेकडे वळावें. पुढें त्या रस्त्यानें पैठणकरांच्या वाड्यापर्यंत येऊन पूर्वेकडे जावें. मग उद्धव घाटानें खालीं उतरून पुंडलीकापर्यंत यावें म्हणजे प्रदक्षिणा पुरी होते. ह्या प्रदक्षिणेच्या रस्त्यावरील कोणच्याही देवळापासून आरंभ करून तेथें परत आलें म्हणजे प्रदक्षिणा पुरी होते. प्रदक्षिणेस निघाल्यावर वाटेंत देवालयाशिवाय कोठें बसूं नये व बोलत जाऊं नये. हरिपाठ अगर इतर भगवत्स्तुतिपर कवनें म्हणत जाण्यास हरकत नाहीं. प्रदक्षिणेस निघालें असतांना वाटेलाच जे देव लागतात त्यांची माहिती पुढें देण्याचा हेतु आहे.

काळभैरव—विठोबाच्या देवळांतून नामदेव दरवाजानें आलें असतां पूर्वेकडे निघालें म्हणजे डाव्या हाताच्या दुकानाच्या ओळींत पांच चार दुकानें टाकिल्यावर हें देऊळ लागतें. आंतील देवास काळ-

**भैरव** असें म्हणतात. याला क्षेत्रपाल अशीही दुसरी संज्ञा आहे. काळभैरवाजवळच **जोगेश्वरी** देवी आहे. ह्याची पूजा बडव्याकडून दररोज एकदां होते. चैत्र शुद्ध ८ स येथें वर्गणी जमवून उत्सव व ब्राह्मणभोजन होतें.

**गणपति**—काळभैरवाच्या देवळाजवळ गणपतीचें एक लहान देऊळ आहे. **गणपतीची** पूजा बडव्यांकडे आहे. गणेश चतुर्थीस ह्याला शेंदूर लावितात व येथें लहानसा उत्सव होतो. जवळच **सरस्वती** आहे.

**शाकंबरी**—काळभैरवाच्या देवळाच्या पूर्वेस शाकंबरीचें देऊळ आहे. तेथें दोन मूर्ति आहेत. त्यांपैकीं किंचित् लहान आहे ती अनगळ यांनीं बसविली. इला **बनशंकरी** असेंही म्हणतात. येथें पौष शुद्ध पौर्णिमेस उत्सव होतो. इच्या नैवेद्यास साठ भाज्या लागतात.

**मल्लिकार्जुन**—शाकंबरीच्या देवळापासून एक दुकान टाकलें कीं **मल्लिकार्जुनाचें** देऊळ लागतें. हें महादेवाचें स्थान असून विठोबाइतकेंच जुनें आहे ह्या देवळाचे गर्भागार व मंडप असे दोन भाग आहेत गाभाऱ्यांत मध्यभागीं शाळुंका व लिंग आहे. हेंच मल्लिकार्जुनाचें लिंग होय. मंडपांत दुसरें सोमेश्वराचें लिंग आहे. ह्याची पूजा दररोज दोन वेळां एका लिंगाईताकडून होते इतर लोकही पूजा करून जातात. नैवेद्य कोळी घेतात. संध्याकाळीं पूजा होऊन गेल्यावर कोणासही पूजा करूं देत नाहींत. दशाहार, चैत्रमास, श्रावणमास, कार्तिकमास व महाशिवरात्र, हे देवाचे उत्सवाचे दिवस होत. ह्यावेळीं ब्राह्मण अभिषेक करितात. ब्राह्मणभोजन व कथाकीर्तनेंही होतात. रंगपंचमीस रोषनाई होते व पालखी निघते. चैत्राच्या महिन्यांत गंधाची उटी लावितात. दिवाळींतही येथें दीपो-

त्सव होतो. सर्व उत्पन्न कोळ्यांकडे जातें. हें देऊळ पांडुरंगभक्त नरहरि सोनारानें बांधिलें असें म्हणतात.

**तांबडा मारुति**—महाद्वार वेशींतून बाहेर येतांच डाव्या हातास मारुतीचें देऊळ लागतें. हेंही जुनें आहे. ह्यालाच ग्राममारुति असें म्हणतात. ह्या मारुतीचें दर्शन घेतलें म्हणजे अकरा मारुतींचें दर्शन एकदम घेतल्याचें श्रेय मिळतें. कारण, ह्याच्या पुढच्या खांबावर आठ व बाहेरच्या भिंतीवर दोन मारुति आहेत. हे सर्व मिळून अकरा होतात. ह्या मारुतीपुढें नंदी आहे. हें देऊळ पांढरे यानीं पुन्हां बांधिलें. ह्यापुढें कथापुराणें होतात.

**राम**—पुढें पूर्वेस जातांना चाटी ओळीचा रस्ता ओलांडल्यावर होळकराच्या वाड्याची एक बाजू डाव्या हातास लागते. ह्या वाड्यांत नदीकडल्या बाजूस श्रीरामचंद्राचें देऊळ आहे. हें श्री. अहल्याबाई होळकरीण यांनीं उत्तम रीतीनें बांधिलें असून त्या देव- ळाला दोन सभामंडप व गाभारा आहे. पूर्वेकडचा सभामंडप मोठा असून त्यांत प्रकाशही चांगला पडतो; व कथाकीर्तनें होतात. ह्या मंडपांतच रामचंद्रासमोर मारुतीचें लहान देऊळ आहे. मधल्या मंडपांत दत्तात्रेयाची मूर्ति आहे. गाभारा उंचावर असून त्यांत सिंहासनावर धनुष्यबाण धारण करणारे श्रीरामचंद्रलक्ष्मण असून रामचंद्राच्या डाव्या हातास सीताबाई आहेत. ह्या मूर्ति संगमरवरी दगडाच्या असून सुबक आहेत. जवळच अहल्याबाईची मूर्ति बस- विलेली आहे. ह्या चारी मूर्ति उत्तर हिंदुस्थानांतून आणिल्या असें म्हणतात. यांची रोजची पूजा पादप्रक्षालन करून गंधपुष्पधूपदीप- नैवेद्ययुक्त होते. संध्याकाळींही धूपदीप दाखवितात. दर एकादशीस कपडे काढून मूर्तीस स्नान घालितात; सारवरेनें चोळितात; व पुन्हां

स्नान घालून नवा पोषाख वगैरे घालितात. रामनवमीचा उत्सव चांगला होतो. रामजन्म व हनुमानजयंति यांनिमित्त कथा व ब्राह्मण-भोजनें होतात. पूजेकरितां स्वतंत्र ब्राह्मण ठेविला आहे व ह्याला कांहीं उत्पन्नही करून दिलेलें आहे. सर्व खर्च होळकर सरकारा-कडून होतो.

**मुरलीधर**—रामचंद्राच्या देवळासमोर महाद्वारांतून चंद्रभागेकडे जातांना उजव्या हातास मुरलीधराचें देऊळ आहे. हें श्री. बायजा-बाई शिंदे यांनीं बांधिलें असून याची बांधणी मजबूत व सुंदर आहे. देवळाचे गाभारा, मध्यमंडप व सभामंडप असे तीन भाग आहेत. गाभाऱ्यांत सिंहासनावर शालिग्रामशिलेची मुरलीधराची मूर्ति आहे. तिच्या एका बाजूस राधेची व दुसऱ्या बाजूस रुक्मिणीची मूर्ति आहे. जवळच बायजाबाईची मूर्ति करून बसविली आहे. तिच्या समोर गणपति व गरुड ह्यांच्या मूर्ति आहेत. मुरलीधराला चार हात आहेत. मुरलीधराची पूजा रोज दोन वेळां होते. नगारखाना, दिवाबत्ती व पूजा यांस लागणारा खर्च शिंदसरकाराकडून होतो. ज्येष्ठ वद्य ९, गोकुळ अष्टमी ( श्रावण वद्य ८ ) व विजयादशमी हे मुरलीधराचे उत्सवदिन आहेत. गोकुळ अष्टमीचा उत्सव नऊ दिवस चांगला होतो. दररोज कथा होते. अष्टमीस जन्म होतो व दुसरे दिवशीं ब्राह्मणभोजनही होतें. दसऱ्याला पोषाख व दागिने घालितात.

**गारेचा महादेव**—हें लहानसें पूर्वाभिमुख देऊळ मुरलीधराच्या देवळाजवळ आहे. हें दुसरे बाजीराव पेशवे यांनीं बांधिलें. गारेचें लिंग शाळुंकेंत बसविलें आहे म्हणुन याला गारेचा महादेव असें म्हणतात. महाशिवरात्र हा उत्सवदिन आहे. त्या दिवशीं अभिषेक

व पंचामृतस्नान घालितात व दुसरे दिवशीं ब्राह्मणभोजन घालितात. ह्याचा खर्च देवस्थानकमेटीकडून होतो. पुढें येणारें उत्पन्न कोळ्यांकडे जातें. या देवळांत बैरागी व भिकारी लोक राहतात.

**पुंडलीक**—चंद्रभागा नदीच्या वाळवंटांत विठोबाच्या देवळापासून पूर्वेस सुमारें १०० यार्ड अंतरावर पुंडलीकाचें देऊळ आहे. श्रीपांडुरंगाप्रमाणें पुंडलीकाचें माहात्म्य आहे. पुंडलीकाच्या देवळाचे दोन भाग आहेत. एक मूर्तिनिवासस्थान व दुसरा मंडप. पुढें पटांगण आहे. या पटांगणांत कीर्तनें वगैरे होतात या देवालयाचें शिखर इतरांच्या शिखरांपेक्षां उंच आहे. देवळांत शाळुंका व लिंग आहे. शाळुंका व लिंग यावर पितळेचा मुखवटा बसविलेला आहे. यालाच पुंडलीक असें म्हणतात. ह्या मुखवट्यास वस्त्रें घालितात, डोक्यास मुकुट चढवितात व कानांत कर्णभूषणें घालितात. शाळुंकेच्या जवळ दोन्ही बाजूंस पितळी पत्र्याच्या जयविजयाच्या मूर्ति आहेत. याची पूजा कोळ्याकडून रोज सकाळीं होते. त्यावेळीं पंचामृतस्नान घालून बेल व फुलें वाहतात. दुपारचे वेळीं ब्राह्मणाकडून नैवेद्य येतो. संध्याकाळीं धूपारती होते. येथें महाशिवरात्रीस माघ वद्य दशमीपासून पांच दिवस उत्सव होतो. त्यावेळीं कोळी लोक भिकारी, आंधळे व पांगळे यांस जेवावयास घालितात. उन्हाळ्यांत उटी करितात.

सध्यां ज्या ठिकाणीं हें देऊळ आहे त्या ठिकाणीं पुंडलीकाच्या आयुष्याचे दिवस गेले व तेथें त्यानें समाधि घेतली. पुंडलीकाची पुढीलप्रमाणें हकीकत सांगतात:—पंढरी क्षेत्रांत जानुदेव नांवाचा एक सत्वस्थ ब्राह्मण होता. त्याच्या पत्नीचें नांव सत्या. सत्येच्या पोटीं पुंडलीक अवतरला. हा लहानपणीं अति हूड होता व तो आईबापांचें ऐकत नसे. पुढें त्याचें लग्न झालें. हूड मुलें तरुणपणीं

स्त्रीवर आसक्त असतात. त्याप्रमाणें पुंडलीक आपल्या पत्नीला सर्वस्व मानून मातापित्यांची अवहेलना करूं लागला. याप्रमाणें चालू असतां एकदां गांवांतील लोक काशीयात्रेस निघाले. त्याबरोबर पुंडलीक आपल्या स्त्रीसह निघाला. बिचाऱ्या वृद्ध मातापितरांची त्यानें कांहींच वास्तपुस्त केली नाहीं त्यांनींही विचार केला कीं, पुष्कळ लोक काशीस जात आहेत त्यांबरोबर आपणही पायीं जावें व गंगेचें स्नानपान व काशीविश्वेश्वराचें दर्शन करून यावें. पुंडलीक आपल्या बायकोला घेऊन वाहनावर मार्ग आक्रमीत आहे व वृद्ध मातापितरें पायीं निघालीं आहेत अशा रीतीनें सर्व यात्रेचा मुक्काम काशीजवळ तीन कोसांवर कुक्कुटाचे आश्रमाजवळ पडला. पुंडलीकही तेथें नजीकच उतरला. संध्याकाळीं भोजनोत्तर तो लवकरच निजला. यात्रेच्या श्रमामुळें त्याला झोंपही लवकर लागली. पुढें झोप चांगली झाल्यामुळें तो पहाटेस लवकर जागा झाला. त्यावेळीं त्याच्या पाहण्यांत असें आलें कीं, कोणी तीन स्त्रिया मलीन वेष धारण करून कुक्कुटाचे आश्रमांत शिरत आहेत. इतक्या पहाटेस ह्या स्त्रिया आंत शिरण्याचें कारण काय असावें, असा प्रश्न मनांत उभा राहून पुंडलीक त्या काय करीत आहेत हें लक्षपूर्वक पाहूं लागला. जराशा वेळानें त्या स्त्रिया त्या आश्रमांत रुडासंमीजन करून दिव्य देह धारण करून बाहेर आल्या. त्यांना पाहून पुंडलीकानें विचारिलें, ‘ आपण कोण व येथें कशाकरितां आलां होतां ? ’ त्या त्याच्याशीं कांहींच न बोलतां पुढें जाऊं लागल्या. तेव्हां पुंडलीकानें एकीचे पाय धरण्याकरितां त्वरा केली. तो आपणास शिवणार असें पाहून त्या स्त्रिया म्हणाल्या, ‘ हां ! शिवूं नकोस. तूं पापी आहेस. आम्हांस विटाळ होईल ! ’ पुंडलीक दीनवाणीनें म्हणाला, ‘ तुम्ही कोण व येथें कां

आला, तें मला सांगा.' त्याचें केविलवाणें तोंड पाहून त्या म्हणाल्या, 'पुंडलीका, आम्ही गंगा, यमुना, व सरस्वती ह्या नद्या आहों. तुझ्यासारखे असंख्य पापी आमच्या पात्रांत स्नानें करून आपलीं पापें टाकून जातात. त्या योगानें आम्हांला मलीनपणा येतो, तो दूर व्हावा एवढ्याकारितां या पुण्यपुरुषाच्या आश्रमांत कामें करण्यास आम्ही येतों व पूर्ववत् शुद्ध होऊन जातों.' ही त्यांची हकीकत ऐकून पुडंलीक त्यांना म्हणाला, 'माझा तुम्ही उद्धार करा.' त्या म्हणाल्या 'जा, या आश्रमांत कुक्कुट ऋषि आहेत; त्यांच्या चरणीं लाग. ते तुला उद्धाराचा मार्ग दाखवितील.' पुंडलीक त्यांच्या सांगण्यावरून कुक्कुटास भेटला व त्यानें त्यांना आपली हकीकत सांगितली. त्यावर कुक्कुट त्याला म्हणाले 'पुंडलीका! काय तूं वेडा आहेस? आपलीं परमपूज्य मातापितरें टाकून देऊन या काशीयात्रेला आलास; तुला तिचें काय फल मिळणार? आईबापांची सेवा काशीयात्रेपेक्षां श्रेष्ठ आहे. जा, जा; त्यांची सेवा कर. सर्व तीर्थें त्यांच्या चरणापाशीं आहेत.' परम मातृपितृभक्त कुक्कुटऋषि यांच्या भाषणाचा पुंडलीकाचे अंतःकरणांत चांगला प्रकाश पडला. त्यानें सकाळींच मातापितरांचा शोध करून आपलें वाहन त्यांना बसावयास दिलें व रीतीप्रमाणें काशीयात्रा करून तो आईबापांसह पंढरीस येऊन राहिला; व त्यांच्या सेवेंत अनन्यपणें काळ घालवूं लागला. याप्रमाणें त्याची सेवा चालली असतां एक दिवस त्याला दर्शन देण्याकारितां भगवान् पांडुरंग तेथें आले. पुंडलीकास या वेळीं कोडें पडलें देवाचें आदरातिथ्य करावें तर आईबापांच्या सेवेंत अंतर पडतें व न करावें तर तेंही गैरच. परंतु त्यानें सेवेंत अंतर करणें हेंच जास्त गैर असें ठरवून देवास उभें राहण्यास एक वीट फेंकून दिली. त्याच विटेवर

अजून पांडुरंग उभे आहेत. मातापितरांची सेवा होतांच त्यांच्या अनुज्ञेनें तो पांडुरंगाकडे आला व देवाची स्तुति करूं लागला. त्या योगें देव प्रसन्न होऊन त्यांनीं वर माग म्हणून त्यास सांगितलें. पुंडलीक म्हणाला, 'देवा! ह्याच ठिकाणीं आपण रहावें.' पुंडलीकाच्या इच्छेवरून देव येथेंच अजून आहेत व लाखों लोक त्या मूर्तीचें दर्शन घेऊन कृतार्थ होत आहेत.

पुंडलीकाच्या मातापित्यांच्या समाधि त्या देवळाच्या जवळच आहेत. पावसाळ्यांत चंद्रभागेला पाणी येतें तेव्हां पुंडलीकाच्या मुखवटा वगैरे चल वस्तु घेऊन कोळी नदीकाठीं सुरक्षित जागीं त्याची स्थापना करितात. पुंडलीकाचा काल शके ११०० च्या सुमारास असावा. त्याचें देऊळ प्रथम चांगदेवांनीं बांधिलें. तें पडल्या-वर हेमाडपंती धर्तीवर दुसऱ्या कोणीं बांधिलें. १६९० त होळकर यांनीं पुन्हां बांधिलें, व त्याची दुरुस्ती पुण्याचे राहिवाशी नंदराम ह्यांनीं १८५० त केली. पंढरपुरांतले सावकार श्रीधर कृष्ण भाटे यांनीं १८७८ त सभामंडप जोडिला. पुंडलीकाच्या देवळाच्या पूर्वेस लोहदंड तीर्थ आहे. यालाच पुंडलीक तीर्थ असेंही म्हणतात. ह्याच्या चारी बाजूच्या भिंतींत कोनाडे असून त्यांत विठ्ठलरखुमाई, गरुड, गणपति व मारुति ह्यांच्या मूर्ति आहेत. हें पुंडलीकाच्या वेळेपासून असून पापनाशन करणारें आहे. यांत दगडाची नाव तरते. जिज्ञासु प्रवाशांनीं हा चमत्कार एकवार अवश्य पहावा. लहानशी देणगी दिली म्हणजे कोळी लोक हें दाखवितात.

**चन्द्रभागा**—चंद्रभागेच्या घाटावर चंद्रभागेचें देऊळ आहे. येथें चंद्रभागेची मूर्ति आहे. हें गोविंदबोवा चोपडेकर यांनीं बांधिलें,

याचें उत्पन्न बडव्यांकडे जातें. या देवळाजवळ महादेवाचीं दोन लहान लहान देवळें आहेत.

**दत्त**—चंद्रभागेच्या दे.ळाकडून दक्षिणेकडे जातांना दत्ताच्या घाटावर हें देऊळ लागतें. हें देऊळ बोरबनकर विप्र यांचें असून ह्याला विप्रांचा मठ असेंही म्हणतात. हें देऊळ बरेंच उंचावर असून आंत मोठा चौक आहे. चौकाच्या तिन्ही दालनांत यात्रेकरू उतरतात. पश्चिमेकडच्या बाजूस गर्भागार आहे. त्यांत दत्तात्रेयाची पांच फूट उंचीची मूर्ति आहे. ही शालिग्रामशिलेची केलेली असून फार प्रेक्षणीय बनली आहे. पंढरपुरांत अशी दुसरी सुंदर मूर्ति नाहीं. दत्तास तांड एकच असून हात सहा आहेत व त्या हातांत शंख, चक्र, गदा, पद्म, त्रिशूल व डमरु हीं आयुधें धारण केलेलीं आहेत. मूर्तीस जानवें, अक्षमाला व कुंडलें आंगचीं कोरलेलीं आहेत. डोक्यावर मुकुटही आहे. दत्ताचें सोवळें कडक रीतीनें पाळितात. देवाचें दर्शन लांबून घ्यावें लागतें. दत्ताची पूजा मालकाकडून दररोज सकाळीं होते. संध्याकाळीं धूपारती करितात. दत्ताला जरी साधा पोषाख केला असला तरी तो इतका मनोहर दिसतो कीं, त्याच्या दर्शनाची तृप्तिच होत नाहीं. ह्याचे पुजारी देवाला पोषाख करण्यांत व उटी लावण्यांत फार कुशल आहेत. गुरुवारीं संध्याकाळींही पूजा करितात व आरत्या पदें वगैरे म्हणतात. येथें दत्तजयंतीचा उत्सव चांगला होतो. देवाला लघुरुद्राचा अभिषेक करितात व जन्मानिमित्त कथाही होते. आषाढी व कार्तिकी वारीचा काला गोपाळकाल्याच्या दुसऱ्या दिवशीं विप्र मोठ्या थाटानें करितात. हें देऊळ गाणगापुर सांप्रदायाचें आहे.

**वटेश्वर महादेव**—दत्ताच्या देवळाजवळ कोमट्यांनीं बांधिलेलें

वटेश्वराचें देऊळ आहे. पूर्वी गाभारा व सभामंडप देवळाला होता. आतां शिखर केलें आहे. महाशिवरात्रीस उत्सव होतो. कोमटी ब्राह्मणांकडून पूजा करवितात.

**बेरीचा महादेव**—वटेश्वर महादेवाकडून पश्चिमेकडे जो रस्ता जातो त्यानें गेलें म्हणजे डाव्या हातास बऱ्याच अंतरावर लाकडाच्या अड्ड्यापाशीं हा महादेव लागतो. इ० स० १७८५ मध्यें क्षेत्रपाल बेरी यांनीं हें देऊळ बांधिलें म्हणून याला हें नांव आहे. पूर्वींचें याचें नांव भद्रेश्वर महादेव असें आहे.

**काळा मारुति**—पुढें त्याच रस्त्यानें जातांना कोपऱ्यावर हा मारुती लागतो. या मारुतीची मूर्ति काळ्या पाषाणाची आहे. मारुती-जवळ जंबू माळ्याची ( रावणाचा माळी ) मूर्ति आहे त्याची पूजा बडव्यांकडून होते. येथें हनुमानजयंति होते. हा मारुति प्रसिद्ध साधू भानुदास बोवा पैठणकर यांनीं विजयनगराहून पांडुरंगास आणावयाच्या कामांत यश येण्याकरितां स्थापिला. याचें वारकरी अवश्य दर्शन घेतात व दिंडी निघाली असतां येथें तुकारामाचे दोन अभंग म्हटल्याशिवाय जात नाहींत. इतर मारुतीप्रमाणें याला शेंदूर लावीत नाहींत. ह्याच्या नैऋत्येस जवळच साधू कृष्णाजीबोवा यांची समाधि आहे.

**चोफाळा**—काळ्या मारुतीकडून उत्तरेकडे जो रस्ता जातो त्यानें निघालें म्हणजे कांहीं अंतरावर हें देऊळ लागतें. ह्या देवळाचा दर-वाजा पश्चिमेकडे तोंड करून आहे. ह्या देवळास पुढें व मागें मंडप असून मध्यें गाभारा आहे. गाभाऱ्यांत विष्णुपंचायतन आहे. पंचायत-नांत विष्णु मध्यें असून त्याजवळ दोन्ही बाजूंस एकेक गोपी आहे. विष्णूच्या मागें उजव्या बाजूस सूर्य व त्यापुढें गणपति असून डाव्या

बाजूस अंबाबाई व महादेवाचें लिंग आहे. पंचायतनाशिवाय तेथें मारुति, खंडोबा व गरुड ह्यांच्या मूर्ति आहेत. पंचायतनाची पूजा बडव्यांनीं ठेविलेल्या ब्राह्मणाकडून होते. इंदापूरचे एक गृहस्थ नारायण नाखरे १७४० चे सुमारास येथें यात्रेस आले असतां देवळांत निजले होते. त्यांच्या स्वप्नांत विठोबा येऊन त्यांनीं त्यांना विष्णुपंचायतनाचें देऊळ बांधण्याविषयीं आज्ञा केली, म्हणून त्यांनीं हें देऊळ बांधिलें.

**पारावरचा दत्त**—हरिदास घाटावर अश्वत्थ व औदुंबर हे वृक्ष असून येथें पार बांधला आहे. वृक्षाखालीं लहानसें देऊळ बांधून त्यांत दत्ताच्या पादुका बसविल्या आहेत. येथें दर गुरुवारीं पादुकांपुढें पुष्कळ नारळ येतात व त्या दिवशीं पूजाही चांगली केलेली असते. दत्तजयंतीचा उत्सव येथेंही चांगला होतो. पेठेंतील लोकांचा याला बराच आश्रय असून एक कोंकणस्थ पुजारी रोज पूजा आणि नैवेद्य करितो. हा दत्त नरसोबाच्या वाडीच्या सांप्रदायाचा आहे.

**बाभळ्याचा महादेव**—उद्धव घाटावर दक्षिणेस लहानसें महादेवाचें देऊळ आहे. ह्यांतील लिंग व शाळुंका पाषाणाची असून ह्याची पूजा ब्राह्मणाकडून व कोळ्याकडून होते. सोमवारीं अभिषेक होतो. येथें महाशिवरात्रीचा उत्सवही होतो. देवळांत एक लेख आहे. त्यावरून हें इ. स. १७७२ त क्षेत्रपाळ नाईक बेरी ह्यांनीं बांधिलें असें दिसतें.


**अमृतेश्वर**—रामायणाचे गेटावरून चाटी आळींत येऊं लागलें असतां कुंभारवेशींतून जो रस्ता येतो तो ओलांडतांच उजव्या हातास

अमृतेश्वराचें देऊळ लागतें. देवळास सभामंडप व गर्भागार आहे. जवळच नगारखाना आहे. ह्याची पूजा ब्राह्मणाकडून होते व त्याबद्दल त्याला श्री. खासगीवाले यांजकडून कांहीं उत्पन्न मिळतें. याचे नित्योपचार म्हटले म्हणजे काकडारती, सकाळची पूजा व संध्याकाळची धूपारती हे होत. महाशिवरात्रीस मोठा उत्सव होतो. त्यावेळीं तेथें कथा व रुद्रावर्तनें होतात. रथही निघतो. रथांत मुखवटा बसवून मिरवितात.


# प्रकरण पाचवें.

## क्षेत्रांतील इतर देव.

विष्णुपद--पुंडलीकाचे देवळापासून दक्षिणेस सुमारें पाऊण मैलावर नदीचे पात्रांत विष्णुपद नांवाचें स्थान आहे. हें देऊळ मंडपाप्रमाणें असून नदींतील खडकावर आहे. ह्याचें क्षेत्र सुमारें ( ३०×३१ ) असून याची उंची १२ फूट आहे. ह्याला १६ खांब आहेत व याची बांधणी दगडी आहे. पुंडलीकाच्या देवळाला जेव्हां पाण्याचा वेढा पडतो तेव्हां विष्णुपदाचें अर्धें अधिक देऊळ पाण्यांत असतें. ह्या देवळांत मध्यभागीं एक लहान चौकोन आहे. त्यावर श्रीकृष्णाचीं पदें उपटलेलीं आहेत. ह्या चोकोनाच्या कोपऱ्यांत गाईचींही पाउलें उमटलेलीं आहेत. ह्या पावलांजवळ पेल्याच्या आकाराचा खळगा आहे; त्यांत देव जेवले असें म्हणतात. येथें श्रीकृष्णाचीं दोन प्रकारचीं पाऊलें आहेत. चौकोनाच्या पश्चिम बाजूजवळ समचरण आहेत, व त्यापुढें देहुडा चरण आहे. देहुडा म्हणजे एक पुढें व एक मागें. ह्या रीतीनें श्रीकृष्ण येथें वेणु वाजविण्यास उभे राहिले होते. ह्याची पूजा बडव्यांकडून होते. यात्रेकरू येथें श्राद्धें करितात, त्या वेळेस ह्या पाऊलांवर पिंड ठेवून त्यांची पूजा करितात. नंतर ते पिंड नदींत टाकून ती जागा धुतात. मार्गशीर्ष महिन्यांत ग्रामस्थ लोक इष्टमित्रांसह येथें भोजनास येतात. बडवे मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेस विठोबाच्या पादुका विष्णुपदीं नेतात व



श्रीपद्मावती. ( पृ. ५३ ).



श्रीगोपाळपूर. ( पृ. ५१ )

अमावास्येस त्या रथांतून समारंभानें घेऊन येऊन विठोबाच्या शेजघरांत ठेवितात. येथें गाईगोपाळांसह कृष्ण जेवावयास आले होते, म्हणून या जागेला महत्व आलें आहे व एवढ्याच करितां ग्रामस्थ व यात्रेकरू लोक येथें जेवण्याचें सामान नेऊन अथवा तेथेंच स्वयंपाक करून जेवतात. तेथें जवळच एक मारुति आहे. तेथें विष्णुपदें पूर्वीं होतीं. तीं पुढें साधु धामणगांवकर यांनीं १६४० त एका ओट्यावर स्थापिलीं. पुढें १७८९ त चिंतो नागेश नांवाच्या बडव्यानें हल्लींच्या जागीं स्थापिलीं व मंडप उभारला. विष्णुपदाजवळ खडकावरील पाउलें उमटलेलीं दिसतात. विष्णुपदाच्या पूर्वेस मारुतीचें लहान देऊळ आहे. विष्णुपदाची पुराणांतरीं कथा अशी सांगतातः—

रुद्राच्या क्रोधापासून गय नांवाचा असुर उत्पन्न झाला. ह्याचें मुख भयंकर होते. डोळे पिंगट होते व केश किंचित् रक्तवर्णाचे होते. तो पृथ्वीवर तप करूं लागला. दैत्यानें तप करून महादेवाचा वर मिळविला असतां तो देवांस व गाईब्राम्हणांस पीडा देण्यास बलिष्ठ होतो असा अनुभव असल्यामुळें कोणी दैत्य तपाचरण करीत असल्यास त्याचें वेळींच पारिपत्य करण्याचें दूरदर्शित्व देव अंगिकारीत. गय तप करितो हें पाहून सर्व देव ब्रम्हदेवास घेऊन विष्णूकडे गेले व त्यांनीं विष्णूस आपलें संकट सांगितलें. विष्णु त्यांना आश्वासन देऊन गयासुराकडे आले व म्हणाले, ‘ हे असुरश्रेष्ठा, तुझी तपश्चर्या पाहून मी संतुष्ट झालों आहें, अभीष्ट वर माग. ’ त्यानें एवढाच वर मागितला कीं, ‘ देवोत्तम, माझी काया तीर्थे, यज्ञ व ब्राम्हण यांपेक्षांहि पवित्र व्हावी. ’ भगवान् विष्णु ‘ तथास्तु ’ म्हणून तेथून स्वस्थानाप्रत गेले. देवाच्या वरप्रसा-

दानें गयासुराचा देह इतका पवित्र झाला कीं, त्याच्या दर्शनानें पापी लोक उद्धरूं लागले. देवांस हीही गोष्ट सहन होईना. गयासुराचें निराकरण करण्यास विष्णूस उत्तेजन देऊन ते पुन्हा गयासुराकडे गेले. त्यांना पाहून तो म्हणाला, 'महाराज, मी आज पुन्हा आपल्या दर्शनानें कृतार्थ झालों. आपल्या आगमनाचें कारण मला कळेल?' तेव्हां ब्रम्हदेव म्हणाले, 'आम्हीं यज्ञ करण्याचा विचार केला आहे. त्याला पवित्र असें स्थान मिळत नाहीं. तूं आपला देह या कार्यास आम्हांस दे.' देवांची मागणी त्यानें मान्य करून आपलें शरीर धरणीवर टाकलें. त्यावेळीं तें या दिंडिरवनांत पडलें. देवांनीं यज्ञसामुग्री जमवून यज्ञ केला. यज्ञास देव प्रदक्षिणा घालूं लागले. तेव्हां गयासुरानें आपलें शरीर हालविलें. हें पाहून सर्व देवांस मोठी भीति पडली कीं हा असुर आतां काय करील? त्यांनीं विष्णूचें स्मरण केलें. विष्णूनें त्याचें कारण जाणून समस्त पर्वत, समुद्र व नद्या यांस गयासुराचे शरीरावर आरूढ होण्यास आज्ञा केली. पर्वतादिकांचा भार शरीरावर पडला तरी गयासुरानें आपलें मस्तक हालविलेंच. पुन्हा ब्रम्हदेवानें विष्णूचें स्मरण करून प्रार्थना केली कीं, 'हा असुर वरचेवर असें आपलें शरीर हालवील तर आमची काय स्थिति होईल? आपण आपला भार याचे शरीरावर घातल्याशिवाय ही स्वारी स्थिर होणार नाहीं.' तेव्हां विष्णु आपले दोन्ही पाय गयासुराचे कटिप्रदेशावर ठेवून उभे राहिले. या हकीगतीवरून या स्थळास विष्णुपद असें नांव पडलें आहे. विष्णुपदास वेणुनाद असेंहि म्हणतात.

**वेणुनाद**—हें नांव पडण्याच्या दोन कथा सांगतात. एक—श्रीकृष्णांनीं गोपाळांसह द्वारकेहून येऊन पुष्पावतीचे संगमाजवळ गोपाळ

उभे करून या ठिकाणीं वेणु वाजविली म्हणून वेणुनाद नांव पडलें. दुसरी—पुष्पावति व भीमा या नद्यांचा संगम झाला आहे. त्यांचे वरले भागीं संगम नांवाचा राक्षस रहात होता. त्या राक्षसाचें व श्रीकृष्णाचें मोठें युद्ध होऊन त्यांत राक्षस हरला. श्रीकृष्ण आपणास मारतील अशी भीति राक्षसास वाटून तो एका शिलेचे खालीं गुप्त होऊन दडून राहिला. हें कृत्य जाणून श्रीकृष्ण त्या शिळेवर एक पाय पुढें व एक पाय मागें ठेवून वेणु वाजवीत उभे राहिले.

**गोपाळपूर**—पंढरीक्षेत्राच्या दक्षिणभागांत गोपाळपूर नांवाचें एक खेडें गांवापासून एक मैलावर आहे. तेथें २०।२५ घरांची वस्ती असून गोपाळकृष्णाचें देऊळ आहे. हें देऊळ माळावर बांधलें आहे. ह्या देवळाजवळ ईशान्येस एक गणपतीचें देऊळ असून तेथें एक रांजण आहे. या रांजणांत यशोदा ताक करीत असे असें सांगतात. खेडें आग्नेय दिशेस असून दक्षिणेस म्युनिसिपालिटीच्या धर्मशाळा आहेत. देऊळ दगडी असून मोठें आहे. देवळांत जाण्यास तीन दरवाजे आहेत. पूर्वेच्या व उत्तरेच्या दरवाज्यानें लोक जातात व येतात. दक्षिणेच्या भिंतींत एक दरवाजा असून त्याच्या दोन्ही बाजूंस जिने आहेत. त्यांनीं वर गच्चीवर जातां येतें. देवळाच्या चौकांत चार लहान देवळें असून एक तळघर आहे. गोपाळकृष्णाचें देऊळ पूर्वेकडे तोंड करून आहे. या देवळास गाभारा व मंडप आहे. मंडपाला सहा दगडी खांब आहेत. गाभाऱ्यांत गोपाळकृष्णाची मूर्ति डाव्या पायावर उजवा पाय टाकून व त्याचा अंगठा फक्त आसनास लावून उभी आहे. हातांत वेणु असून ती वाजवीत आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूंस गाई आहेत. मूर्ति मनोहर दिसते. ह्या देवाचे उपचार विठोबा प्रमाणेंच आहेत. पूजेची व्यवस्था गुरवाकडे आहे. गोकुळअष्टमीचा

उत्सव होतो. आषाढी व कार्तिकी पौर्णिमेस येथें काल्यानिमित्त यात्रा भरते. येथें एक तळघर आहे. भीमकराजाचें देऊळ गोपालकृष्णाचे उत्तरेस आहे. येथें महादेवाचें लिंग असून त्याला भीमकराजाचा पितळेचा मुखवटा बसवितात. पुढें नंदी आहे. पूजा गुरव कारितो. भीमकराजाच्या पूर्वेस लक्ष्मीनारायणाचें देऊळ आहे. ह्या देवळांत विष्णूची चतुर्भुज मूर्ति असून विष्णूच्या मांडीवर लक्ष्मी बसलेली आहे. गोपालकृष्णाच्या देवळाच्या पूर्वेस एका कोठडींत नारदाची मूर्ति आहे. गोपाळकृष्णाच्या देवळाच्या आग्नेयीस जनाबाईचें तळघर आहे. ह्या तळघरांत गेलें म्हणजे जनाबाईची स्वैपाकाची जागा, निजण्याची खाट, गोधडी व विठोबाची मूर्ति दाखवितात.

गोपाळपुरासंबंधानें अशी कथा आहे कीं, श्रीकृष्ण द्वारकेंत असतां एक दिवस राधेस आपल्या मांडीवर घेऊन बसले होते. अशा स्थितींत त्यांची पट्टराणी रुक्मिणी तेथें आली व तिनें त्यांना पाहिलें. रुक्मिणीस पाहून राधा व कृष्ण ह्यांनीं तिला मान द्यावयास पाहिजे होता; परंतु तसें कांहीं झालें नाहीं. तें रुक्मिणीस सहन न होऊन ती द्वारका सोडून निघाली व फिरत फिरत या दिंडिरवनांत आली. रुक्मिणी आपणावर रागावून द्वारका सोडून गेली हें पाहून श्रीकृष्ण तिच्या शोधार्थ निघाले. श्रीकृष्णांनीं द्वारका सोडतांच गोपाळही निघाले. गोवर्धन पर्वत आणि गंगा व यमुना नद्या ह्या मंडळीसही कृष्णावांचून चैन पडेना. सर्व मंडळी एकसमयावच्छेदेंकरून दिंडिरवनांत ( सध्या गोपाळपुर आहे तेथें ) आली. गोवर्धन गोपाळपुरचा माळ झाला, गंगा भीमा झाली व यमुना पुष्पावती नदी बनली. गोपाळपुर हें रम्य स्थान पाहून श्रीकृष्ण गोपाळांसहवर्तमान येथें राहिले. पुढें रुक्मिणीचा शोध लागून तिचा व

त्यांचा समेट होतांच जें जेवण झालें, त्यावेळीं प्रत्येक जणानें आपापली शिदोरी सोडून ती एकत्र करून मोठ्या प्रेमानें खाल्ली. म्हणून या ठिकाणीं आषाढी व कार्तिकी पौर्णिमेस काला होतो. त्यावेळीं येथें मोठी गर्दी होते.

**पंचमुखी मारुति**—दत्ताच्या घाटाच्या दक्षिणेस कांहीं अंतरावर पंचमुखी मारुतीचें लहानसें देऊळ आहे. या देवळाचें तोंड पश्चिमेकडे आहे. आंत मारुती आहे. त्याला पांच तोंडें आहेत. त्याच्या डाव्या पायाखालीं जंबु माळी आहे. डावा हात कंबरेवर असून उजवा हात वर आहे. त्याच्यावर शेंदुराचें दाट आवरण आहे. ह्याचें मधलें तोंड सर्वांत मोठें असून त्याचे डोळे तांब्याचे आहेत. याची पूजा बैरागी करितात. बैरागी लोक जवळच्या मठांत राहतात. तेथें अलीकडे सांपडलेली रामाची मूर्ति पूर्वेकडे तोंड करून स्थापिली आहे. मूर्ति संगमरवरी दगडाची असून प्रेक्षणीय आहे.

**भुलेश्वर**—पंचमुखी मारूतीच्या पलीकडे व घाटग्याच्या बागेजवळ हें महादेवाचें स्थान आहे. दोन शाळुंकांत हें लिंग बसविलेलें आहे. पुढें नंदी आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं हें नागनाथाचें स्थान आहे. एकांतस्थान ज्यांना पाहिजे त्यांना हें फारच आवडेल. हें देऊळ इ. स. १७८७ त सरदार जनाजी बाजी घाटगे ह्यांनीं बांधिलें. आतां हें जरा जीर्ण झालें आहे.

**पद्मावती**-पंढरपूरच्या पश्चिमेस अर्ध्या मैलावर पद्मावतीचें तळें व देऊळ आहे. हें सरदार यशवंतराव पवार यांच्या पत्नी सकवारबाई यांनीं इ० स० १७७८ त बांधिलें. तळें चौकोनी असून तें टाकीच्या दगडानें बांधिलें आहे. व ठिकाठिकाणीं मोठ्या पायऱ्याहि आंत उतरण्यास केल्या आहेत. पाणी घेण्यास एक बाजू मोकळी

ठेविली आहे. सध्यां तळयास पाणी नाहीं. तळयांमध्यें पद्मावतीचें देऊळ पूर्वाभिमुख बांधिलें आहे व तेथपर्यंत जाण्यास दगडी पूल केला आहे. देवळास गाभारा व सभामंडप आहे. गाभाऱ्यांत शेंदूर फासलेला देवीचा मुखवटा आहे. पूजा बडव्याकडून होते. नवरात्रांत उत्सव होतो व लोक दर्शनास फार जातात.

व्यास—पंढरपूरच्या उत्तरेस व्यासाचें देऊळ आहे. देवळाच्या पश्चिमेस धर्मशाळा आहेत. त्यांत बैरागी राहतात. उत्तरेस हात जोडून उभी अशी मारुतीची मूर्ति आहे. येथें एक विहीर आहे. देवळाला गाभारा व मंडप आहे. गाभाऱ्यांत महाभारतादि पुराणांचे कर्ते कृष्णद्वैपायन व्यास ह्यांची मूर्ति आहे. पूजा बडवे करितात. दररोज पुष्कळ ब्राम्हण दर्शनास येतात. व्यासापुढें गांवांतील लोक नवसाचे सत्यनारायण करितात. कार्तिकी पौर्णिमा हा उत्सवदिन आहे. जवळच रामबाग हें प्रेक्षणीय स्थान आहे.

अंबाबाई—व्यासाच्या देवळाच्या पूर्वेस बऱ्याच अंतरावर अंबाबाईचें पूर्वाभिमुख देऊळ आहे. देवळांत गाभारा व लहान मंडप आहे. देवापुढें एक होमकुंड आहे. त्यांत नवरात्रांत होम होतो. पूर्वेस दोन बाजूस दोन दीपमाळा आहेत. जवळच नगारखान्याची जागा आहे. गाभाऱ्यांत पाषाणाची महिषासुरमर्दिनी अंबेची मूर्ति आहे. देवीस आठ हात आहेत. पूजा बडव्यांकडे आहे. नवरात्रांत मंगळवारीं, शुक्रवारीं व अष्टमीस गांवांतील पुरुष, बायका व मुलें यांची येथें गर्दी असते.

लखुबाई—पंढरपुरच्या उत्तरेस वाळवंटांत लखुबाईचें हेमाडपंती देऊळ आहे. देवळाला गाभारा व मंडप आहे. गाभाऱ्यांत काळया पाषाणाची लक्ष्मीची चतुर्भुज मूर्ति आहे. लक्ष्मीपुढें मोठ्या

ठोकळ्यावर शेंदूर फासलेला गोटा आहे. त्याला तांडला असें म्हण-तात. मूर्तीबरोबर याचीहि पूजा होते. रुक्मिणी कृष्णावर रुसून दिंडिरवनांत प्रथम आली ती येथें आली व तिनें येथें तप केलें. पुढे त्यांचा समेट गोपाळपुरीं झाला. ह्या गोष्टीचे स्मारकार्थ येथें हें देऊळ आहे. दशाहारांत येथें ब्राह्मणभोजन होतें. नवरात्रांत पुष्कळ लोक येथें दर्शनास येतात. तुळजापूरच्या देवीच्या दर्शनास जातांना यात्रेकरू यात्रा सुखरूप होण्याकरितां एक दिवस येथें मंडपांत राहून जातात.

**यमाई व ज्योतिबा**—हीं देवळें पंढरपुरच्या दक्षिण भागांत आहेत. नवरात्रांत यमाईस पुष्कळ लोक दर्शनास जातात. जोतिबाचा रविवार मुख्य वार असून चैत्र शुद्ध पौर्णिमेस त्याची यात्रा भरते.

**श्रीधरस्वामींची समाधि**—कुंभार घाटावर देवधराचे घराजवळ 'रामविजय' 'हरिविजय' इत्यादि प्रसिद्ध ग्रंथांचे कर्ते श्रीधरस्वामी नाझरेकर यांची समाधि आहे.

**नगरेश्वर**—कासारघाटावर चढून येतांना वरती उजव्या हातास हें महादेवाचें देऊळ लागतें स्थान रमणीय आहे व त्याला कोमटी लोकांचा आश्रय आहे.

**सरकारवाड्यांतील महादेव**—चंद्रभागा घाटावर प्रदक्षिणेच्या वाटेवर सरकारवाडा म्हणून एक मोठा वाडा पूर्वाभिमुख आहे. ह्या वाड्यांत साताराचे छत्रपति महाराज यांच्या कचेऱ्या पूर्वी होत्या. महाराष्ट्रप्रतापसूर्याचा अस्त झाल्यावर कचेऱ्याहि गेल्या. ह्या वाड्याला वासकराचा वाडा असेंहि म्हणतात. येथें जातांना डाव्या हातास हा महादेव आहे. ह्याच्या पूजेची व्यवस्था कांहीं उत्पन्न तोडून दिलें आहे त्यांतून होते.

त्र्यंबकेश्वर—रोकडोबाच्या वेशीजवळ हें देऊळ आहे. देवळास गाभारा व सभामंडप आहे. गाभाऱ्याच्या मध्यभागीं उंच शाळुंकेवर लिंग बसविलेलें आहे. ह्याची पूजा देवस्थान कमेटीकडून रोज तीन वेळां होते. सकाळीं पंचामृत स्नान घालून पूजा होते. लिंगावर एक पितळेचा मुखवटा बसवितात. महाशिवरात्रीस महादेवाच्या इतर स्थानाप्रमाणें येथें उत्सव होतो. ह्या देवळाजवळ कुंडलतीर्थ आहे.

ताकपिठ्या विठोबा—विठोबाच्या देवळाच्या पश्चिमेस एका बोळांत हें लहान देऊळ आहे. देवळांत विठोबारखमाईच्या मूर्ति शेजारीं शेजारीं आहेत. पूजा बडवे करितात. रमाबाई नांवाच्या विधवा स्त्रीच्या ताकपिठाची देवास आवड होती. ती नित्य देवास देवळांत जाऊन नैवेद्य दाखवी. पुढें वृद्धावस्थेमुळें तिच्यानें देवळांत जाणें होईना; म्हणून तिची खरी भक्ति जाणून देव तिच्या घरीं राहण्यास गेले म्हणून या देवळास ताकपिठ्या विठोबाचें देऊळ असें नांव पडलें आहे.

कोटेश्वर—होळकराच्या रामाच्या देवळाच्या उत्तरेस कोटेश्वर ह्मणून एक महादेवाचें स्थान आहे.

खाजगीवाले ह्यांच्या घरच्या सोन्याच्या मूर्ति—ह्या तीन मूर्ति आहेत. मध्यें पांडुरंग एका बाजूला राधिका व दुसऱ्या बाजूला रुक्मिणी अशा ह्या मूर्ति असून पांडुरंगाचा आषाढीकार्तिकीस रथ निघतो तेव्हां त्यांत बसवून तो मिरवितात. मूर्ति प्रेक्षणीय आहेत.

गोंदवलेकर यांचा राम—कोमटी ओळींत भडगांवकरांचे वाड्यांत हें देऊळ अलीकडेच झालेलें आहे. राम, लक्ष्मण व सीता या तीन मूर्ति येथें असून त्या मनोहर आहेत. साधु गोंदवलेकर

ह्यांनीं ह्याची स्थापना केली म्हणून ह्याला गोंदवलेकर यांच्या रामाचें देऊळ असें ह्मणतात.

**नामदेवमंदिर**—हें कासारघाटावर आहे. प्रसिद्ध साधु व पांडुरंगाचा परम भक्त नामदेव याचें हें निवासस्थान होय. येथें पांडुरंगाची मूर्ति असून त्यासमोरच्या मंडपांत कीर्तनें व भजनें होतात. येथें हरिनामाचा नित्य पहारा आहे. वीणा कधीं खालीं ठेविला जात नाहीं. नामदेवाचे वंशज येथें राहतात. येथें चारी प्रहरांस चौघडा वाजतो.

**श्री महाप्रभुजीची बैठक**—हें स्थान नदीच्या पलीकडील तीराला आहे. श्रीमत् महाप्रभु वल्लभाचार्य हे पांडुरंगदर्शनार्थ पंढरीस आले असतां चंद्रभागेस महापूर आला असल्यामुळें त्यांच्या बरोबरच्या मंडळीस गांवांत कसें जातां येईल हा विचार पडला. आचार्य संध्यावंदन झाल्यावर विचार पाहूं असें म्हणून संध्येस बसले. ध्यान सुरू होतें तोंच पांडुरंग त्यांच्या पुढें येऊन उभे राहिले. भक्तकामकल्पद्रुम पांडुरंगास पाहून त्यांना हर्ष झाला व त्याच्या भरांत त्यांनीं पांडुरंगाचें पूजन केलें. नंतर वल्लभाचार्यांच्या संमतीनें ते गुप्त झाले. येथें एक भुयार आहे. त्यांत गादी व तक्या ठेविलेला असतो. त्याची पूजा व सेवा होते. ह्या स्थळीं वल्लभाचार्यांनीं भागवतसप्ताह केला होता. याचे वरचे बाजूस एक राधाकृष्णाची मूर्ति आहे. ह्या ठिकाणाहून पंढरपुरचा देखावा चांगला दिसतो. ज्या वेळीं नदीला बरेंच पाणी असतें तेव्हां नावेंत बसून हें स्थान पाहण्यास जातात

याशिवाय पंढरपुरच्या पंचक्रोशींतील संध्यावळी, मासनूर, कोर्टीचा महादेव वगैरे स्थानें पाहण्यासारखीं आहेत.

# प्रकरण सहावें.

## क्षेत्रवर्णन.

पंढरपूर हें १७° ४०' उत्तर अक्षांश व ७५° २३' पूर्व रेखांश ह्यावर असून ह्याची लांबी एक मैल व रुंदी सुमारें अर्धा मैल आहे. पंढरपूर हें बरड जमिनीवर वसलेलें आहे. जमिनीच्या थराखालीं काळ्या फत्तराचा खडक आहे. विठोबाचें देऊळ व त्या नजीकचा भाग हीं उंचावर असून बाकीचा शहरचा भाग उतारावर आहे; पेठेचा भाग जरा उंचावर आहे. चंद्रभागेला जेव्हां मोठा पूर येतो तेव्हां उतारावरच्या भागांत पाणी शिरून नासधूस होते. पुराचा उपसर्ग विठोबाच्या देवळाच्या नजीकच्या लोकांस होत नाहीं. पंढरपूरची हवा निरोगी आहे. उन्हाळ्यांत दिवसा उष्णतेमुळें त्रास होतो परंतु रात्रीं आठ नऊ वाजल्यानंतर गार वारा सुटतो. उन्हाळ्यामधील उष्णतामान ९०° वर असतें व १०३°।०४° पर्यंत जातें. थंडी व पावसाळा हे काळ येथें राहण्यास उत्तम; कारण त्यावेळीं येथील हवा स्वच्छ व उत्साहपर असते. ज्या ठिकाणीं पाऊस फार पडतो त्या ठिकाणीं पावसाळ्यांत हवेमध्यें ओलावा फार असतो; तसा येथें बिलकुल नसल्यामुळें चातुर्मास्यांत येथें राहणें फार हितावह वाटतें. पंढरपुरास साधारणमानानें २० इंच पाऊस पडतो. पंढरपुरास पाऊस बेताचा पडत असल्यामुळें येथें बहुतेक घरें धाब्याचीं

आहेत. येथील लोकांचा धंदा चांगला चालत असल्यामुळें त्यांनीं आपले वाडे दुमजली तिमजली बांधिले आहेत. देवळाजवळ बडवे उत्पात यांचे वाडे फार जवळ जवळ बांधिलेले असल्यामुळें त्यांतून हवा व उजेड हीं कमी खेळतात. या लोकांस पाणी लांबून आणण्याचा त्रास पूर्वीं सोसावा लागे. पण आतां घरोघर नळ झाल्यामुळें तो चुकला आहे. प्रत्यक्ष देवळांत आतां नदीचें पाणी नळाचे द्वारें खेळत आहे.

पंढरपुराचे देवळाजवळचा भाग, संत पेठ, जुनी पेठ व नवी पेठ असे ठोकळ भाग आहेत. नव्या पेठेस नारायण पेठ असें म्हणतात. येथें सुमारें २५००० वस्ती असून यांत ब्राह्मणवस्ती बरीच आहे. मुसलमानांची लोकसंख्या सुमारें हजार आहे. येथें जैन लोकांचीही थोडी वस्ती आहे. पंढरपूर हें तालुक्याचें ठिकाण असल्यामुळें येथें मामलेदार कचेरी, फौजदार कचेरी, सबजज्ज कोर्ट, पोस्ट व तार आफिस हीं सरकारी आफिसें आहेत. शिवाय येथें म्युनिसिपालिटी आहे. हिला यात्रेच्या करांचें उत्पन्न चांगलें होत असल्यामुळें ही सधन कमेटी म्हणून मुंबई इलाख्यांत प्रसिद्ध होती. यात्राखातें स्वतंत्र ठेवून यात्रांच्या करांचे उत्पन्नापैकीं बहुतेक भाग यात्रेकरूंच्या सोयींसाठींच खर्चण्याचें ठरल्यामुळें कमेटीची एक उत्पन्नाची बाब हातावेगळी झाली आहे. त्यामुळें आतां कमेटीस जमाखर्चाची तोंडमिळवणी करणें फार जड जातें. गांवची आरोग्यासंबंधीं व्यवस्था कमेटी चांगली ठेविते गांवांतील रस्ते चांगले असून घाण पाणी वहात जाण्यास खोल व मजबूत गोल गटारें बांधलेलीं आहेत. पिण्याचे व वापरण्याचे पाण्याकरितां वॉटर वर्क्सकडून चंद्रभागेचें पाणी नळाचे द्वारें घरोघरीं लोकांस मिळतें. नळाचें

पाणी पचनास चांगलें आहे. येथें दवाखाना आहे. त्यालाही कमेटीची मदत आहे. गरीब लोकांस येथें औषध फुकट व उत्तम रीतीनें मिळतें. कमेटीकडे प्राथमिक शिक्षणाच्या शाळा असून त्यांत मुलांस व मुलींस शिक्षण बरें दिलें जातें. पंढरपुरांतील पाहण्यासारख्या संस्था म्हटल्या म्हणजे हायस्कूल, उद्योगशाळा, ऑर्फनेज, संस्कृत-पाठशाळा, वॉटरवर्क्स व वाचनालय ह्या होत.

हायस्कूल—ही इंग्रजी शाळा कमेटीनें आपल्या खर्चानें चालविली असून तिचें नांव व्हिक्टोरिया जुबिली हायस्कूल असें आहे. येथें येणारे कांहीं शिक्षक चांगल्या विद्वानांत मोडणाऱ्यांपैकीं असून त्यांना पगारही बरा मिळतो. हे शिक्षक कमेटीच्या मेंबरांच्या मत-भेदामुळें व कधीं स्वतःच्या हयगयीमुळें येथें फार दिवस टिकत नाहींत ही वाईट गोष्ट आहे. शिक्षणांत सोलापूर जिल्हा मागसलेला आहे. त्यांत पंढरपुरच्या लोकांस इंग्रजी शिक्षणाचें अगत्य व महत्व वाटत नसल्यामुळें शाळेंतील मुलें अभ्यासानें मागसलेलीं असतात व परीक्षेंत थोडींच उतरतात. हायस्कूलची इमारत नदीकांठीं असून प्रेक्षणीय आहे.

उद्योगशाळा—कमेटीनें आपल्या खर्चानें चालविलेली ही दुसरी शाळा आहे. ही संस्था अत्यंत उपयुक्त असून येथें चित्रकलेचें, सुतारकीचें व लोहारकामाचें शिक्षण मोफत मिळतें; इतकेंच नव्हे तर तींतील विद्यार्थ्यांस कांहीं स्कालरशिपाही मिळतात. शिकणाऱ्या मुलांपैकीं बरींच मुलें ऑर्फनेजपैकीं असून कांहीं हायस्कुलापैकीं व कांहीं गांवांतील आहेत. ह्या संस्थेला जोडून वर्कशॉप नांवाची संस्था आहे. तिच्या द्वारें लाकडी व लोखंडी सामान तयार होऊन तें बाहेर विकावयास जातें.

इतर शिक्षणसंस्था—( १ ) कमेटीनें चालविलेली एक संस्कृत पाठशाला आहे. तिचे सध्याचे गुरु वेणीमाधवाचार्य हरिपुरकर हे असून त्यांची कौमुदी, काव्य व अलंकार शिकविण्याचे कामांत हुशारी आहे. ह्या शाळेंत बरेच विद्यार्थी काव्य व कौमुदी शिकत आहेत. ( २ ) वेदशाळा—येथील शास्त्री धारूरकर यांच्या मेहनतीनें वेदशाळा चालत आहे. हींत चारी शाखांच्या वेदांच्या अध्ययनाची व्यवस्था केलेली आहे. अलीकडे वेदाध्ययनाकडे लोकप्रवृति अगदीं थोडी असल्यामुळें या शाळेंत विद्यार्थी फार थोडे आहेत. ( ३ ) कमेटीजवळ एका लहानशा जागेंत येथील नेटिव्ह जनरल लायब्ररी आहे. लायब्ररींत मराठी व इंग्रजी पुस्तकांचा संग्रह बरा आहे. येथें महाराष्ट्रांतील प्रसिद्ध पत्रें व मासिक पुस्तकें येतात. येथें एक गोरक्षण नांवाची संस्था आहे.

ऑर्फनेज—उद्योगशाळेजवळ ऑर्फनेज म्हणून एक संस्था आहे. ही संस्था १८७८ त दुष्काळानंतर स्थापन झाली. या इमारतीच्या पायाचा दगड सर रिचर्ड टेंपल, मुंबईचे तेव्हांचे गव्हरनर, यांच्या हस्तें पुरण्यांत आला; प्रार्थनासमाजानें जमविलेल्या फंडाच्या व्याजावर ही संस्था चालत आहे. येथें गरीब निराश्रित मुलें रक्षण करण्यांत येत असून त्यांना प्राथमिक शिक्षण व उद्योग धंद्याचें शिक्षण दिलें जातें. मुंबईच्या भाट्याप्रमाणें श्रीमंत लोक आले म्हणजे ही संस्था पाहून तिला कांहीं देणगी देतात व मुलांस खाऊ देतात. ऑर्फनेजला लागून ‘ फाउंडलिंग होम ’ नांवाची दुसरी संस्था आहे. कुमार्गप्रवृत्त झालेल्या स्त्रिया अब्रुरक्षण करण्याकरितां पोटच्या गोळ्याचा प्राणघात करितात; तो न व्हावा व

त्यांची अब्रूहि राखली जावी ही सोय ह्या संस्थेच्या द्वारें होते. उत्पादकांचा हेतु परोपकाराचा व दयाशीलतेचा आहे.

पंढरपुर हें क्षेत्र व तालुक्याचें ठिकाण असल्यामुळें येथील पेठ मोठी आहे व आठवड्याचा बाजार मंगळवारीं दांडगा भरतो. चाटी, कोमटी, वाणी, बोहरी, गंधी सामान विकणारे, हलवाई, भांडीं विकणारे कासार, बांगड्या विकणारे कासार, चितारी, भडबुंजे यांचीं दुकानें येथें बरींच आहेत व त्यांना यात्रेमुळें बरीच किफायत होते. येथें बुक्का, कुंकू, रवे, उदबत्त्या, तपकीर, डाळें व मकेच्या लाह्या ह्यांची फार विक्री होते. कारण हे जिन्नस व कापड, भांडीं, बांगड्या वगैरे जिन्नस देवाच्या गांवांतले म्हणून प्रासादिक अशा समजुतीनें यात्रेकरू येथें फार खरेदी करतात.

पंढरपुरास खडी काढण्याचा धंदा मोठा चालतो. ही खडी लुगड्यांवर व खणांवर काढितात. खडी पांढरी किंवा सोनेरी वर्ख लावून सोनेरी उठवितात. हिच्या योगानें त्या वस्त्रास मोठी शोभा येते व फार किंमत पडते. पंढरपुरास कुंकू व बुक्का करण्याचे बरेच कारखाने आहेत. तपकीर व जर्दा येथें बराच तयार होतो. लाखेच्या बांगड्या व छंद हें सौभाग्यवर्धनाचे बायकांचे दागिने येथील कासार पुष्कळ तयार करितात. करडीचें तेल काढण्याचे घाणे येथें बरेच आहेत व येथून पुष्कळ तेल बाहेर जातें. येथें पूर्वीं मातीचीं चित्रें रंग देऊन चांगलीं तयार करीत असत. पण अलीकडे तीं कोठें फारशी दिसत नाहींत. वारकरी लोकांस वीणा, चिपळ्या वगैरे अवश्य लागणारे जिन्नस येथील चितारी चांगले तयार करितात; हेच चितारी तंबोरे, सतार वगैरे मोहक वाद्येंहि उत्तम करितात.

येथें ब्राम्हणवस्ती बरीच आहे. पण ती बहुतेक देशस्थांची आहे.

ह्या देशस्थ ब्राह्मणांत बडवे, उत्पात, सेवाधारी, भटभिक्षुक व भिमावळे ह्यांचा समावेश होतो. ह्या सर्वांची रहाणी विशेषशी चांगली नसल्यामुळें त्यांना धामे असें नांव पडलें आहे. यांची उपजीविका यात्रेकरूंवर असते हें मागें सांगितलें आहेच. क्षेत्रस्थ ब्राह्मण या नात्यानें त्यांचें वर्तन जसें असावयास पाहिजे तसें नसल्यामुळें त्यांच्याविषयीं समाजांत पूज्यबुद्धि कमी आहे. खरे स्नानसंध्याशील ब्राह्मण पंढरपुरांत किती आढळतील तें कोण जाणें. ही ब्राम्हणमंडळी बैठकींत बसली असतां सुधारकांच्या यःकश्चित् गोष्टीवर हवी तशी अद्वातद्वा टीका करतील परंतु ह्यांचें आचरण पहावें तो सुधारकांच्या पलीकडे. धर्माचरणाच्या बाबतींत येथलि ब्राह्मण मंडळींत जें औदासिन्य आढळून येतें तसेंच इतर क्षेत्रांतील ब्राम्हणवर्गांत आढळून येतें. तेव्हां येथीलच ब्राम्हणसमुदायाला दोष द्यावयास नको. ब्राम्हणमंडळीनें विहितआचरणाचा त्याग केल्यामुळें त्यांना मान राहिला नाहीं व ते सर्वपरींनीं अधोगतीस पोचले आहेत व अजूनही ही गोष्ट ज्याअर्थीं त्यांच्या विचारांत येत नाहीं त्याअर्थीं ब्राम्हणवर्गाची स्थिति पुढें काय होणार हा प्रश्न पुढें उभा राहतो. व भावी चिन्ह एकंदरींत ठीक नाहीं हें पाहून वाईट वाटतें. क्षेत्रस्थ ब्राह्मणमंडळीनें याविषयीं विचार करून पुढील पिढीला तरी वळण लावावें अशी आमची त्यांना सूचना आहे. ब्राह्मणवर्गानें आपलें आचरण नीट ठेविलें नाहीं एवढाच त्यांच्यावर दोष असता तरी बस्स होता; परंतु वृथा शाखाभिमानानें त्यांच्यांत जे कलह उत्पन्न होतात त्यांनेंही समाजाची थोडी नुकसानी होत नाहीं! पंढरीक्षेत्रांत वृथाशाखाभिमानजन्य कलह थोडे आहेतच; परंतु त्यापेक्षांही भयंकर असा कलह येथील बडवे व सेवाधारी यांमध्यें आहे.

भांडणाचीं कारणें पाहूं गेलें तर फार क्षुल्लक आहेत. त्यावरून असेंही कळून येईल कीं, पैसा मिळूं लागला म्हणजे त्याची हाव कशी सुटूं लागते व मनुष्य त्या गोष्टीच्या भरांत दुसऱ्याचें वित्त वाटेल त्या रीतीनें हरण करण्यास कसा प्रवृत्त होतो. वास्तविक पाहिलें असतां दोघांनींही विठोबाच्या महिम्यावर आपला चारितार्थ चालत असल्यामुळें मिलाफानें राहून कार्यभाग चालवावा व इतर लोक लहान मोठ्या देणग्या देतील त्या प्रथमच्या शिरस्त्याप्रमाणें वाटून घ्याव्या व देवाची सेवा अबाधितपणें चालू ठेवावी यांत शहाणपण आहे. परंतु इतका दूरदर्शीपणा स्वार्थाकडे नजर असल्यामुळें त्यांना कसा कळावा? दोघांच्या भांडणाचा तपशील देण्याचें हें स्थळ नव्हे व तो समजण्यापासून इतरांस फायदाही नाहीं. हें येथें ध्वनित करण्याचें कारण येवढेंच कीं, विठोबा हा सार्वजनिक देव आहे व तो सर्वांचा आवडता देव असल्यामुळें त्याच्या सेवेंत बडवे व सेवधारी यांजकडून कधीं कधीं अंतर पडतें तें लोकांस हितावह वाटत नाहीं. येथें बरींच वर्षें प्लेग झाला नसतां देवास सात आठ दिवस स्नान न घडल्यामुळें त्याचा क्षोभ होऊन प्लेगोबाची स्वारी येथें धडकली व गांवची होळी झाली अशी समजूत विठ्ठलभक्त ग्रामस्थांची व इतरांची आहे; ती खोटी असें कोणांसही म्हणतां यावयाचें नाहीं. देवता क्षोभेपर्यंत कलह यावा हें सर्वांचें दुर्भाग्य होय! सर्वांस सुबुद्धि देणारा पांडुरंगदेव त्यांना सुबुद्धि देऊन त्यांच्यामध्यें शांतता राखील व सर्वांवर कृपादृष्टि ठेवील अशी आशा धरून त्याची प्रार्थना करीत रहावें, हें बरें.

पंढरपुरास मराठीच भाषा चालते. एकच भाषा एका देशांतल्या निरनिराळ्या भागांत कांहीं थोड्या फरकानें चालते हा अनुभव



रथाची मिरवणूक. ( पृ. ७१ )



श्रीविष्णुपद. (पृ. ४९)

सर्वांस आहेच. व्यवहारास हा फरक कोणतेही रीतीनें आड येत नाहीं. परंतु एका भागांतील लोकांना, दुसरे लोक आपलीच भाषा भिन्न प्रयोगानें व शब्दोच्चारणाच्या भिन्नतेनें बोलतांना ऐकण्यास चमत्कारिक लागते व ज्या भागांतली भाषा ग्रंथादिकांस व व्याकरणास बहुतांशीं अनुसरून असते त्यांना तर ती अशुद्ध वाटते. पुणें, सातारा प्रांतांतील लोकांची भाषणपद्धति व्याकरणास अनुसरून असल्यामुळें त्यांना येथील लोकांच्या भाषणांत आढळून येणारे 'तुम्ही केव्हां येताल, मामाजी काय करत्येस, ती पाणी प्येली' वगैरे प्रयोग व 'ह्यो त्यो' हे शब्द अशुद्ध वाटतात व ते त्यांबद्दल त्यांना हसतात हें चुकीचें नाहीं. हा भाषणप्रकार बायकामाणसें, भिमावळे, बडवे, उत्पात व सेवाधारी ह्यांच्या भाषणांत नेहमीं आढळून येतो तो क्षम्य मानतां येईल. परंतु देवाची शेजारती होत असतांना बेणाऱ्यांची स्तुति ऐकावी. वैदिक स्तुतीचें वर्णन करावयास नको. पौराणिक स्तुतींत 'गुनगनमंडित, सुमणोहरम्, पस्यंतु' असले अशुद्ध शब्द ऐकून प्रथम हसूं आल्याशिवाय व नंतर थोडेंसें वाईट वाटल्याशिवाय रहात नाहीं. ब्राह्मणेतरांचीं मुलें देखील संस्कृत स्तोत्रें शुद्ध म्हणतात; व नावाजलल्या देवाचे पिढीजाद स्तुति करणारे हलगर्जीपणानें अशुद्ध स्तुति करणारे व्हावे हें आश्चर्य नव्हे काय? शिक्षणप्रसारानें आतां ह्या बाबतींत थोडी सुधारणा आहे.

पंढरपुरांतल्या ब्राम्हणलोकवस्तीसंबंधानें दोन तीन विशेष गोष्टी आम्हास सांगाव्याशा वाटल्या म्हणून त्या येथें वर्णिल्या आहेत. पंढरपुरचा हा काळा भाग आहे. गोऱ्याचें विवेचन करण्यापूर्वी काळा भाग थोडा लक्षांत येऊन गेला असला म्हणजे बरें. ब्राह्मणलोकवस्तीप्रमाणें इतरांच्या गुणदोषांचें वर्णन करावयास पाहिजे; परंतु

त्यांत विशेष कांहीं नसल्यामुळें जागा अडविण्याची आमची इच्छा नाहीं. व्यवहारांत वागणाऱ्या सामान्य लोकांचीं चरित्रें काळया डागांनीं भरलेलीं असावयाचींच. लोकोत्तर पुरुष व्यवहारांत वागतात खरे; पण ते स्वतःकरितां वागत नसून सामान्य लोकांच्या हिताकरितां वागत असतात व त्यांचें चरित्रही फार निराळें असतें. त्यांची स्वार्थैकदृष्टि नसल्यामुळें त्यांत काळा भाग क्वचित् आढळतो. असे पुरुष पंढरींत होऊन गेले आहेत व होत आहेत. ते आपला कार्यभाग निमुटपणें करीत आहेत व त्यांच्यात्र चरित्राचा मनावर परिणाम घडतो.

पंढरपुरांत पुढील साधुसंतांचे वाडे आहेत:—ठाकुरबोवांचा मठ, कबीरबोवाचा मठ, पाध्यांची समाधि, चोपडकराचा वाडा, विप्राचा मठ, गुंडोजीबोवाचा मठ, भानुदासबोवाचा मठ, पैठणकराचा मठ, ज्ञानोबाचा मंडप, भजनदासाचा मठ, गोरोबाची समाधि, नंदयशोदेचा मठ, सिद्धेश्वरबोवांचा मठ, मुक्ताबाईचा मठ, माणकेश्वराचा वाडा, जयरामस्वामी वडगांवकर यांचा मठ, नामदेवमंदिर, अमळनेरकराचा मठ, गंगुकाकाचा वाडा, पुंडलीकबावा यांचा वाडा, पंत आणि पाध्ये यांचे वाडे व गाडगेबुवांचा मठ इ०. ह्या वाड्यांतून त्यांचे वंशज म्हणा शिष्य म्हणा रहात आहेत. सर्व नेहमींच येथें असतात असें नाहीं. तर सवडीप्रमाणें चातुर्मास्यभर किंवा मोठ्या वारीस ते राहतात. गुंडोजीबोवा, टोपडेबोवा व अमळनेरकरबोवा हे चातुर्मास्यांत येथें असतात. गुंडोजीबोवांचें भजन ४ ते ६ वाजेपर्यंत संध्याकाळीं लाकडी मंडपांत होतें. टोपडेबोवांचें भजन नारदाजवळच्या ओरींत ४ ते ६ वाजतां होतें. अमळनेरकरबोवांचें भजन सकाळीं ९ ते १ वाजेपर्यंत हत्तीदरवाज्यापाशीं होतें. एकादशीस

रात्रीं नऊ वाजेपर्यंत असतें. कार्तिक शुद्ध १० स ह्या सर्वांच्या भजनांची अखेर होते. त्या दिवशीं त्यांच्यांवर गुलाल वगैरे उधळत असतो. तो सर्व समारंभ पाहण्यालायक असतो. देवळांत इतरांचींही बारा महिने भजनें होतात. पुंडलीकबोवांचें काकड्याचेवेळेपासून आठ वाजेपर्यंत रांजणाजवळ भजन होतें. बोरीकरांचें भजन ओरींत होतें. अन्याबा अरणकरांचें भजन धूपारतीनंतर शेजारती होईपर्यंत हत्ती दरवाज्यापाशीं होतें. ४ ते ६ वाजेपर्यंत संध्याकाळीं घाटीजवळ सिद्धेश्वरबोवांचें व रुक्मिणीच्या सभामंडपांत रामानुजांचें भजन होतें. माणकेश्वराचे नरहरबोवाचा फड व धोंडोपंताचा फड असे दोन फड आहेत. त्यांच्याकडे आश्विन शुद्ध १० पासून कार्तिक शुद्ध १० पर्यंत उत्सव असतो. कार्तिक शुद्ध ९ स गंगुकाकाची पुण्यतीथ होते; व कार्तिक शुद्ध ८ स दिंडी निघते. देहूकर आणि वासकर यांचे उत्सव भाद्रपद शुद्ध १० पासून आश्विन शुद्ध १० पर्यंत होतात. भाद्रपदांत गोकुळ अष्टमीनिमित्त शुद्ध १ स बडवे दिंडी काढितात व ती देवळांतही येते. गोरुकाकाची दिंडी चैत्र वद्य ३० स निघते. जळोजीबोवांचा उत्सव पौष शुद्ध १२ पासून माघ शुद्ध १० पर्यंत होतो. नामदेवमंदिरांत व नामदेवाचे पायरीपाशीं आषाढ वद्य १ पासून उत्सव सुरू होतो. आषाढ वद्य १३ स नामदेवाची पुण्यतीथ होते. साधुसंतांचे हे वाडे पाहून व त्यांचे उत्सव चालले असतांना त्यांचीं भजनें पाहून मनाला मोठें समाधान वाटतें. पंढरींत येऊन ज्या चांगल्या गोष्टी पहावयाच्या त्यांपैकींच ह्या होत.

पंढरपूर देवगिरीच्या जाधवांच्या वेळेपासून इतिहासांत चांगलें प्रसिद्ध आहे. विठोबाच्या दर्शनाकरितां अनेक साधुसंत, राजेरजवाडे,

जहागिरदार, सरदार व मानमानकरी येथें येऊन गेले व त्यांनीं आपलीं स्मारकें सच्चारित्र्यानें व देणगीच्या रूपानें येथें ठेविलेलीं आहेत. सुमारें नऊ शतकाच्या अमदानींत अनेक राज्यक्रांत्या व फेरफार झाल्यामुळें पंढरपुरचा बराचसा महत्वाचा इतिहास मनोरंजक व चिंतनीय असा आहे. देवांस मोठमोठ्या सरदारांनीं दिलेल्या दागिन्यांची माहिती बडवे उत्पातांच्या दप्तरांवरून कळून येणार आहे. ह्या दागिन्यांपैकीं कांहीं चोरीस गेले आहेत व कांहीं आपसांतल्या भांडणामुळें खर्चाकरितां मोडले आहेत, अशी वृद्ध लोकांच्या सांगण्यावरून माहिती कळते. मुसलमानांच्या अमदानींत पंढरपुरास बराच त्रास सोसावा लागला. मराठ्यांच्या उदयकालापासून इंग्रजीच्या चालू अमदानीपर्यंत लहानमहान संकटें उद्भवत तरी त्यांचा वेळींच परिभव होत गेल्यामुळें शांततेची विशेष हानि झाली नाहीं. पंढरपुरांत अनेक साधुसंत होऊन गेले. त्यांच्या चरित्रांतील अनेक गोष्टी इतक्या मनोरम, अद्भुत, बोधकारक व भक्तिरसोत्पादक आहेत कीं, त्यांची कल्पना भक्ताशिवाय इतरांस होणारी नाहीं. साधुसंतांच्या गोष्टी म्हणून एक प्रकरण या पुस्तकास जोडावें असा प्रथम आमचा हेतु होता; परंतु त्यांच्या गोष्टी इतक्या ऐकण्यांत आल्या कीं, त्या सर्व या पुस्तकांत घ्याव्या तर पुस्तक फारच मोठें होईल व निवड करून घ्याव्या तर त्यांत कोणची टाकावी व कोणची घ्यावी ? सर्वच मनोरंजक आहेत. ह्या सर्व गोष्टी प्रासादिक वाणीनें लिहिण्यास महिपतीच जन्मला पाहिजे असें मला वाटतें. पंढरपुरचा राजकीय, सामाजिक व धार्मिक इतिहास लिहिण्यासारखा असून त्याला उत्तम लेखक मिळाल्यास त्याची महाराष्ट्राच्या इतिहासाला मोठी मदत होईल.

---

# प्रकरण सातवें.

## यात्रा व यात्रेकरू.

एकादशी हा विठोबाचा आवडता दिवस असल्यामुळें त्याचे भक्त तो उत्सवदिवस समजतात व सवड करून त्याचे दर्शनाचा लाभ मिळवितात; आणि उपवास, भजन व कीर्तन ह्यांमध्यें ते अहोरात्र घालवितात. बारा महिन्यांच्या चोवीस एकादशा होतात. त्यांपैकीं शुद्ध एकादशा ह्यांना विशेष महत्व आहे. त्या दिवशीं पंढरीपासून दूर असलेले भक्त देवास भेटावयास येतात म्हणून ह्या एकादशांस वारीच्या एकादशा असें म्हणतात. प्रत्येक वारीच्या एकादशीला थोडी तरी म्हणजे दहा बारा हजार यात्रा भरतेच. आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी एकादशीस फार यात्रा जमते; व त्यावेळेस यात्रेकरूंस कर देऊन जावें लागतें. पांडुरंगाचे बरेच भक्त आषाढीस त्याचे दर्शनास येत असल्यामुळें आषाढीची यात्रा दोन अडीच लाख भरते. ह्या वारीला मोठमोठ्या साधुसंतांच्या पालख्या व दिंड्या येतात. खानदेश, वऱ्हाड, उत्तर हिंदुस्थान, दक्षिण हैद्राबाद, व गोमांतक ह्या भागांतूनही बरीच यात्रा येते. ज्ञानेश्वर महाराजांच्या वेळेपासून ही वारी जोरांत भरत असून ह्यावेळीं गांवांत फार गर्दी जमते. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें चंद्रभागेस पाणी येऊन यात्रेकरूंना वाळवंटांत उतरण्याची सोय नसते. गांवांत जागा, भाजीपाला, सर्पण व दूध हीं फार महाग होतात. किराणा जिन्नसही पुर-

जहागिरदार, सरदार व मानमानकरी येथें येऊन गेले व त्यांनीं आपलीं स्मारकें सच्चारित्र्यानें व देणगीच्या रूपानें येथें ठेविलेलीं आहेत. सुमारें नऊ शतकाच्या अमदानींत अनेक राज्यक्रांत्या व फेरफार झाल्यामुळें पंढरपुरचा बराचसा महत्वाचा इतिहास मनोरंजक व चिंतनीय असा आहे. देवांस मोठमोठ्या सरदारांनीं दिलेल्या दागिन्यांची माहिती बडवे उत्पातांच्या दप्तरांवरून कळून येणार आहे. ह्या दागिन्यांपैकीं कांहीं चोरीस गेले आहेत व कांहीं आपसांतल्या भांडणामुळें खर्चाकरितां मोडले आहेत, अशी वृद्ध लोकांच्या सांगण्यावरून माहिती कळते. मुसलमानांच्या अमदानींत पंढरपुरास बराच त्रास सोसावा लागला. मराठ्यांच्या उदयकालापासून इंग्रजीच्या चालू अमदानीपर्यंत लहानमहान संकटें उद्भवत तरी त्यांचा वेळींच पराभव होत गेल्यामुळें शांततेची विशेष हानि झाली नाहीं. पंढरपुरांत अनेक साधुसंत होऊन गेले. त्यांच्या चरित्रांतील अनेक गोष्टी इतक्या मनोरम, अद्भुत, बोधकारक व भक्तिरसोत्पादक आहेत कीं, त्यांची कल्पना भक्ताशिवाय इतरांस होणारी नाहीं. साधुसंतांच्या गोष्टी म्हणून एक प्रकरण या पुस्तकास जोडावें असा प्रथम आमचा हेतु होता; परंतु त्यांच्या गोष्टी इतक्या ऐकण्यांत आल्या कीं, त्या सर्व या पुस्तकांत घ्याव्या तर पुस्तक फारच मोठें होईल व निवड करून घ्याव्या तर त्यांत कोणची टाकावी व कोणची घ्यावी? सर्वच मनोरंजक आहेत. ह्या सर्व गोष्टी प्रासादिक वाणीनें लिहिण्यास महिपतीच जन्मला पाहिजे असें मला वाटतें. पंढरपुरचा राजकीय, सामाजिक व धार्मिक इतिहास लिहिण्यासारखा असून त्याला उत्तम लेखक मिळाल्यास त्याची महाराष्ट्राच्या इतिहासाला मोठी मदत होईल.

---

# प्रकरण सातवें.

## यात्रा व यात्रेकरू.

एकादशी हा विठोबाचा आवडता दिवस असल्यामुळें त्याचे भक्त तो उत्सवदिवस समजतात व सवड करून त्याचे दर्शनाचा लाभ मिळवितात; आणि उपवास, भजन व कीर्तन ह्यांमध्यें ते अहोरात्र घालवितात. बारा महिन्यांच्या चोवीस एकादशा होतात. त्यांपैकीं शुद्ध एकादशा ह्यांना विशेष महत्व आहे. त्या दिवशीं पंढरीपासून दूर असलेले भक्त देवास भेटावयास येतात म्हणून ह्या एकादशांस वारीच्या एकादशा असें म्हणतात. प्रत्येक वारीच्या एकादशीला थोडी तरी म्हणजे दहा बारा हजार यात्रा भरतेच. आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी एकादशीस फार यात्रा जमते; व त्यावेळेस यात्रेकरूंस कर देऊन जावें लागतें. पांडुरंगाचे बरेच भक्त आषाढीस त्याचे दर्शनास येत असल्यामुळें आषाढीची यात्रा दोन अडीच लाख भरते. ह्या वारीला मोठमोठ्या साधुसंतांच्या पालख्या व दिंड्या येतात. खानदेश, वऱ्हाड, उत्तर हिंदुस्थान, दक्षिण हैद्राबाद, व गोमांतक ह्या भागांतूनही बरीच यात्रा येते. ज्ञानेश्वर महाराजांच्या वेळेपासून ही वारी जोरांत भरत असून ह्यावेळीं गांवांत फार गर्दी जमते. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळें चंद्रभागेस पाणी येऊन यात्रेकरूंना वाळवंटांत उतरण्याची सोय नसते. गांवांत जागा, भाजीपाला, सर्पण व दूध हीं फार महाग होतात. किराणा जिन्नसही पुर-

वळ्यास न येईल असें दिसतांच भलताच महाग होतो. मजुरीचे व वाहनाचे दर वाढतात. अशा तऱ्हेची परिस्थिति असतांही लाखो लोक पांडुरंगाचे दर्शनास सर्व तऱ्हेचे हाल सोसून येतात. त्यांना पांडुरंगाचें दर्शन कसें मिळतें याची हकीकत पुढें सांगण्यांत येईल.

ह्या वारीस आळंदीहून ज्ञानेश्वराची, देहूहून तुकारामाची, त्र्यंबकेश्वराहून निवृत्तीनाथाची, सासवडाहून सोपानदेवाची, पैठणाहून एकनाथाची, दहिठण्याहून दहिगणेकरांची, तेरहून गोरोबाकाकाची (गोरा कुंभार), उत्तर हिंदुस्थानांतून कबिराची अशा मुख्य पालख्या येतात. कबीरबोवांची पांढरी पताका असून इतरांची भगवी असते. ज्ञानेश्वराची पालखी फार जुनी असून तिच्या येण्यांत आजपर्यंत खंड पडला नाहीं. ज्ञानेश्वराची व तुकारामाची पालखी जोडीनें पुण्याहून पुणें पंढरपूर रस्त्यानें येतात. पालखीबरोबर पुष्कळ लोकांचा जमाव असून तो उत्तरोत्तर वाढत जातो. तिला वाट चालण्यास १९ दिवस लागतात. वाटेंत ज्या गांवांजवळ मुक्काम पडतो त्या गांवांचे लोक त्या मंडळीचें उत्तम रीतीनें आगतस्वागत करितात, व त्यांना जेवण घालितात. ह्या पालख्यांचा मुक्काम वाखरीजवळ माळावर नवमीस पडतो. तेथील रंगण पाहण्यास ग्रामस्थ लोक व अगोदर आलेले यात्रेकरू जातात. रंगण प्रेक्षणीय असतें. पूर्वीं ज्ञानेश्वरमहाराजांची पालखी मध्यें ठेवून हत्ती व घोडे फेरा धरून नाचवीत असत. नंतर टाळकरी रंगण धरून नाचत असत. आतां फक्त टाळकरी रंगण धरून पालखीसमोर नाचतात. हें भजन करीत नाचणें बराच वेळ चाललेलें असतें तरी त्यांना शीण आलेला दिसत नाहीं. टाळकरी भक्तियुक्त अंतःकरणानें इतके ओथंबलेले असतात कीं तो सारा जनसमूह भक्तिरस समुद्रांत सुखक्रीडा करीत आहेसें वाटतें.

भक्तिप्रेमाच्या लहरी तेथें उसळत असल्यामुळें एकादा नास्तिक जरी तेथें गेला तरी त्याला आळशावर गंगा लोटून आल्याप्रमाणें होऊन भक्तिसुधेचा एकादा तरी घुटका घ्यावा व पूत व्हावेंसें वाटून त्याची पूर्वीची वृत्ति पालटते.

दशमीस सर्व पालख्या पंढरीस जमतात. त्या दिवसापासून पंढरपूर यात्रेकरूंनीं इतकें गजबजलेलें असतें कीं, गांवांतील रस्त्यांतून जिकडे पाहावें तिकडे माणसांचा घोळका चाललेला आहे. त्यांतून वाट मिळण्यास मारामार. एकादशीस रथ निघतो. त्यांत पांडुरंग रखमाईच्या सोन्याच्या मूर्ति बसविलेल्या असतात. हा रथ प्रदक्षिणेच्या वाटेनें मिरवितात सर्वांस पांडुरंगाचें दर्शन होणें शक्य नसल्यामुळें रथांतील पांडुरंगाची मूर्ति पाहण्यास सर्व लोक तयार असतात. दर्शन घेतेवेळीं ते पांडुरंगास माळा, बुक्का, खारका व फळें हीं अर्पण करितात. कित्येक भाविक लोक पांडुरंगाचा रथ आपण ओढूं लागतात. पांडुरंगाचा रथ ओढण्यास ज्याला सांपडला तो भाग्यवान् ! रथ दुपारीं बारा वाजल्यानंतर निघतो. तो परत खाजगीवाले यांचे वाड्याजवळ येण्यास त्याला संध्याकाळ होते. यात्रा असेपर्यंत दररोज साधुसंत आपली शिष्यमंडळी घेऊन प्रदक्षिणेस निघतात. कोणाच्या दिंड्या निघतात; कोणी पालखी घेऊन निघतात. कोणाची ठरीव जागेंत भजनें चाललेलीं असतात. एकादशीचे दिवशीं चोपडेकरबुवा व खाजगीवाले ह्यांच्या वाड्यांत संतमाळका उभ्या असतात. संतमाळका म्हणजे निरनिराळ्या ठिकाणचे संत एके ठिकाणीं जमून जें ईशगुणस्तवन करितात त्याला संतमाळका म्हणतात. पांच सहा दिवस जिकडे तिकडे आनंद भरलेला असतो; नवीन प्रेक्षकांस काय

पाहूं व कोठें कोठें पाहूं असें होतें व कितीही पाहिलें तरी त्याची तृप्ति होत नाहीं. पौर्णिमेस गोपाळपुरीं काला होतो. सर्व लोक गोपाळकृष्णाचें दर्शन घेण्यास जातात. त्या दिवशीं दर्शन मिळण्याची मारामार होते. दहिठगफरबोवा व चातुर्मास्यबोवा यांचे काले मोठे होतात. काल्याची हंडी झाडास टांगलेली असते ती कीर्तन झाल्यानंतर फुटते. पहिल्यांचा पागाजवळ ७ ते १० वाजेपर्यंत होतो व दुसऱ्यांचा पाठीमागें चिंचेजवळ १० ते १२ वाजेपर्यंत होतो. काल्याचे वेळीं मुलाचे गळ्यांत माळ घालून त्याला कृष्ण करितात. नंतर चेंडू, टिपऱ्या, फुगड्या वगैरे खेळ खेळतात; ताक घुसळणें वगैरे लीलाही होतात. इतर साधुसंतांचे निरानिराळ्या जागीं काल्याचे अभंग म्हणून काले होतात. यात्रेकरू प्रेमानें एकमेकांच्या तोंडांत लाह्या घालतात. व ‘गोपाळकाला गोड झाला, गोपाळानें गोड केला.’ असें म्हणत परत येतात. काला झाल्यावर मंडळी परत आपापल्या गांवीं जाण्यास निघतात.

आषाढी वारीस आलेल्या यात्रेकरूंस चंद्रभागास्नान, प्रदक्षिणा, इतर सर्व देवांचें दर्शन, पालख्यांचें दर्शन, रथस्थ विठ्ठलमूर्तींचें दर्शन, कीर्तनश्रवण व इतर प्रेक्षणीय गोष्टींचें अवलोकन हीं सर्व थोड्या श्रमानें करितां येतात. परंतु मुख्य पंढरीनाथाचें दर्शन होणें दुरापास्त होतें. प्रत्येकाला दररोज पांडुरंगाचें दर्शन व्हावें अशी इच्छा असते खरी. परंतु एक वेळ दर्शन होणेंच कित्येकांना जड जातें. कामगार लोक, वशिल्याची मंडळी व श्रीमंत लोक ह्यांना कांहींना कांहीं युक्ति लढवून दर्शन घेतां येते. परंतु पांडुरंगाचे अनन्य भक्त म्हणून आलेल्या यात्रेकरू मंडळींना बारीनें दर्शन घ्यावें लागतें. बारीनें दर्शन घेण्याची व्यवस्था सरकारी कामगारांकडून होते. ह्यामुळें हें

काम बरेंच शिस्तीनें व व्यवस्थित होतें. बंदोबस्ताकरितां पोलिस शिपाई व त्यांचे वरिष्ठ अमलदार, तसेंच मे. मामलेदार किंवा डेप्युटी कलेक्टर तेथें हजर असतात. यात्रेच्या वेळीं देवदर्शनार्थ आलेल्या लोकांची देवळांत गर्दी होऊं नये म्हणून देवळाजवळचे कित्येक वाडे पाडण्यांत आले आहेत व जागा खुली करण्यांत आली आहे. देवळाच्या बाहेरच पूर्व अंगास पुरुषांची बारी व पश्चिम अंगास बायकांची बारी बसावी म्हणून प्रशस्त जागा खालीं फरशा घालून व वर पत्र्याचें छत करून व सभोंवार लाकडी फळ्यांचे कंपांऊंड करून जागा बंदिस्त करण्यांत आली आहे. यात्रेच्या वेळीं देवालयाचे आठ दरवाज्यांपैकीं सहा बंद असून दोन फक्त उघडे असतात. एक दरवाजा ( तरटी दरवाजा ) पासाचे लोक आंत घेण्यासाठीं व रुक्मिणीकडील दरवाजा दर्शन घेतलेल्या माणसांस बाहेर जाण्यासाठीं फक्त मोकळा असतो. पुरुषांनीं एकीकडे जमावानें बसणें व बायकांनीं दुसरीकडे तसेंच बसणें, दर्शनासाठीं आळीपाळीनें एकेकांनीं ( एकदां पुरुषांचा जमाव व एकदां बायकांचा जमाव ) जाणें त्यास बारी असें म्हणतात. बारींत बसलें म्हणजे तीन चार तासांत दर्शन होतें. आषाढी व कार्तिकी एकादशीस प्रतिष्ठित लोक पास घेऊन येत असल्यामुळें व जग हें भीड धरणारें असल्यामुळें बारीच्या लोकांस सहा सहा तास दर्शन होत नाहीं. पासवाले लोकांचीच कांहीं वेळ बारी सुरू असते. पहाटपासून येऊन बसलेल्या अडाणी, अनोळखी वारकऱ्यांनीं तीन चार टप्पे चढून यावें तो पासवाल्यांची टोळी! बसले वाट पहात अथवा राहिले उभे तसेच. परंतु ह्या दर्शनेच्छु वारकऱ्यांची चिकाटी फार तारीफ करण्यासारखी असते व ते कसल्याही शारीरिक किंवा मानसिक तापाची पर्वा न करतां

'देह जावो अथवा राहो । पांडुरंगीं दृढ भावो ।' असा मनाचा निर्धार करून दर्शन घेतल्याशिवाय परत जात नाहींत. अशा स्थितींत जेव्हां ते चौखांबी मंडपांत येतात व त्यांना पांडुरंग दिसूं लागतो त्यावेळीं अष्टभाव दाटून येऊन त्यांना भक्तिप्रेमाचें भरतें येतें. पांडुरंगाच्या चरणांवर मस्तक ठेवतांना त्यांना जो आनंद होतो तो पुसूं नये. ह्या लाभापुढें त्यांना स्वर्ग तुच्छ वाटतो. पांडुरंगदर्शनानें त्यांचा सर्व शीण जाऊन त्यांना असें वाटूं लागतें कीं, सर्व प्रकारचे ताप शमविणारे हे चरण सोडूं नयेत. चरणांवर मस्तक ठेवावें, मुखाकडे पहावें, पुन्हा चरणांवर मस्तक ठेवावें असें त्यांना वाटतें. छेः ! पण दरिद्रांचे मनोरथ कोठून पुरे होणार ! 'चल, दूर हो' म्हणून पहारेकरी शिपाई त्याला दूर लोटीत असतात. तेव्हां 'पांडुरंगा ! पुन्हा लवकर भेट दे.' असें म्हणत भक्त परततो. भक्ताचें असें महिन्या सहा महिन्यांनीं होणारें दर्शन दररोज दिवसांतून चारचार वेळां होणाऱ्या भिडेच्या दर्शनापेक्षां अधिक प्रेमाचें व श्रेयस्कर आहे. त्याला तुलना नाहीं असें म्हटलें तरी चालेल.

आषाढीच्या खालोखाल कार्तिकी वारी भरते. साधु भानुदासबोवा पैठणकर यांनीं विजयनगराहून पांडुरंगमूर्ति आणिली; तेव्हांपासून ही वारी जोरांत भरत आहे. ह्या वारीच्या एकादशीसही पांडुरंगाचा रथ निघतो व काला होतो. चैत्री व माघी यात्रा मध्यमपणें भरतात. आषाढी व कार्तिकी वारीस दशमीच्या रात्रीच्या बारा वाजल्यापासून चौदा दिवस यात्रेकरूंना कर द्यावा लागतो. चैत्री व माघी वारीस आठ दिवस कर असतो. अधिकी वारीलाही अलीकडे कर घेण्यांत येतो. दर माणसी चार आणे कर या चार यात्रांच्या वेळीं द्यावा लागतो व त्याबद्दल थोडासा त्रासही सोसावा लागतो.

परंतु नाशीक वगैरे ठिकाणापेक्षां पंढरपूरचा त्रास कमी व त्या मानानें सोईही बऱ्या केल्या जातात.

पंढरपुरास येणाऱ्या यात्रेकरूंचे दोन वर्ग करितां येतात. कांहीं नियामित कालानें येणारे यात्रेकरू व कांहीं अनियमित कालानें म्हणजे मध्येंच केव्हां तरी येऊन यात्रा करून जाणारे यात्रेकरू. पहिल्यांना वारकरी असें म्हणतात. हे वारकरी दरमहिन्याच्या वारीस अथवा मोठ्या वाऱ्यांस येतात. पंढरपुरास येणाऱ्या लोकांत वारकऱ्यांचा मोठा भरणा आहे. त्यांच्या पंथाविषयीं थोडी कल्पना यावी म्हणून थोडी माहिती पुढें देत आहों.

कलियुगांत वर्णाश्रमधर्मावर लोकांची श्रद्धा न राहून तो हळुहळू लोपत जाणार व तेणेंकरून भगवत्प्राप्तीचा मार्ग खुंटून असंख्य जन जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडून बुडणार ही गोष्ट न व्हावी म्हणून भगवंतांनीं दयाळू होऊन ' जे माझी भक्ति अनन्यपणें करितील ते कोणीही असोत मला येऊन मिळतील व त्यांना भवसमुद्राचें भय राहणार नाहीं. ' असें सर्वांस आश्वासन दिलें व माझें नामोच्चारण मात्र करा म्हणजे तुम्ही मुक्त व्हाल असा उपदेश केला. भगवंतांनीं हें गीतेंत व श्रीमद्भागवतांत गीर्वाण वाणींत सांगितलें. पण तें सामान्य जनसमूहाला कळणार नाहीं म्हणून ज्ञानेश्वर महाराजांचा व एकनाथ महाराजांचा अवतार त्यांनीं स्वतः घेऊन गीता व भागवत हीं प्राकृत भाषेंत लिहून भोळ्याभाळ्या लोकांस कळण्यास सोपीं केलीं व आपल्या या अवतारांत परमार्थप्राप्ति कशी करून घ्यावी हें उदाहरणानें लोकांना समजावून दिलें. अशा रीतीनें त्यांनीं जो धर्म स्थापिला त्याला भागवत धर्म असें म्हणतात. ह्याची गुरुपरंपरा अशी आहे कीं, भगवान् विष्णूंनीं शिवास उपदेश

केला, शिवापासून मत्स्येंद्रनाथास झाला, त्यापासून गोरक्षनाथास झाला, गोरक्षापासून गहिनीनाथास, गहिनीपासून निवृत्तिनाथास व त्यांच्यापासून ज्ञानेश्वरमहाराजास उपदेश झाला. ज्ञानेश्वरमहाराजांनीं सर्व भाविक जनांस भावार्थदीपिकेच्या द्वारें ज्ञानामृत पाजिलें. ज्ञानदेवाचे समकालीन साधु नामदेव यांनींही या पंथास मदत केली. पुढें एकनाथ महाराजांनीं भागवताच्या एकादश स्कंधावर टीका करून भगवद्भक्ति कशी करावी व तिचें रहस्य काय आहे तें लोकांस समजावून दिलें. पुढें भगवद्भक्त तुकाराम महाराज यांनीं गीता व भागवत ह्यांतील विषय आपल्या अभंग वाणीनें पूर्वीं पेक्षांही सोपा करून दीन व अज्ञ जनांस परमार्थ लाभ जोडून दिला. तुकाराममहाराजांचे कारकीर्दींत भागवत धर्म चांगल्या रीतीनें स्थापित झाला व त्या वेळेपासून शिष्यशाखा चालत आहेत. तुकाराममहाराजांच्या दोन शिष्यशाखा प्रसिद्ध आहेत. एक देहूकर व दुसरे वासकर. तुकाराममहाराजांचें जन्मस्थान देहूगांव आहे; तेथें राहणारे ते देहूकर व मोगलाईत वाशी नांवाचें गांव आहे तेथें राहणारे ते वासकर. वासकरांपैकीं मल्हाप्पा वासकर प्रसिद्ध पुरुष होऊन गेले; त्यांची समाधि आळंदी येथें आहे. हे दोघेही पंढरीस यात्रेला येतात. दोघांच्याही वाड्यांत देवासमोर विण्याचा पहारा अहोरात्र असतो. अगदीं अलीकडे वारकरी पंथ वाढविण्याचें काम साधु गंगुकाका शिरवळकर यांनीं केलें. गंगुकाका हे प्रासादिक पुरुष होऊन गेले व साधूला योग्य अशा भक्तिरसपरिप्लुत, अद्भुत व उपदेशकारक गोष्टींनीं त्यांचें जीवनचरित्र फार रमणीय झालेलें आहे. तुकाराममहाराजांची गाथा पांडुरंग प्रसादानें त्यांना मिळाली होती व आज ज्या गाथ्याच्या प्रती घरोघरीं सांपडतात, त्यांचें मूळ

गंगूकाकांची उदार देणगी होय. अभंग पुस्तक रूपानें प्रकाशित होण्यास जर कां त्यांची अनुज्ञा नसती तर आजमितीस तुकारामाचे सर्व अभंग दीड रुपाया इतक्या स्वस्त किंमतीस कधींच मिळाले नसते. एकेक अभंग मिळविण्याकरितां पूर्वीं काय खटपटी कराव्या लागत याचा इतिहास ऐकिला म्हणजे गंगुकाकांनीं जी अमूल्य देणगी मराठी वाचकांस दिली तिजबद्दल त्यांचे किती उतराई व्हावें हेंच कळत नाहीं. गंगुकाकांचे वाडे पंढरपुरास असून एका वाड्यांत त्यांना मिळालेला प्रासादिक गाथा मोठ्या समारंभानें ठेविलेला आहे. दुसऱ्या वाड्यांत त्यांचे वंशज रहात असून तेथें विण्याचा पहारा आहे. विण्याचा अखंड पहारा पंढरपुरास गंगुकाकांनींच सुरू केला. ज्ञानेश्वर महाराजांपासून गंगुकाका शिरवळकर ह्यांच्या कालापर्यंत मध्यंतरीं जे अनेक लहान मोठे साधु होऊन गेले त्यांची वारकरी पंथ वाढविण्यास बरीच मदत झाली. या सर्व गोष्टींचा तपशीलवार इतिहास लिहावयास स्वतंत्र ग्रंथ हातीं धरिला पाहिजे.

वारकरी पंथांत शिरणाऱ्या लोकांस पुढील गोष्टी अवश्य पाळाव्या लागतात. वारकऱ्यानें दर वारीस निदान मोठ्या वारीस पंढरीस गेलें पाहिजे. त्यानें दशमीस पंढरपुरीं येऊन पापविनाशिनी चंद्र-भागेचें स्नान केलें पाहिजे. नंतर आपली पताका गंगेंत बुडवून तिचें तीर्थ प्राशन केलें पाहिजे. नंतर त्यानें पांडुरंगरायाचें दर्शन घेऊन प्रदक्षिणा केली पाहिजे. रात्रीं कोणाच्या तरी फडावर जाऊन भजन किंवा कीर्तन ऐकिलें पाहिजे. वारकऱ्यांत जातिभेदाचें बंड नाहीं. शूद्र ब्राह्मणाचे पायां पडण्यास उत्सुकतेनें जसे तयार असतात त्याप्रमाणें ब्राह्मणही शूद्राचे पायां पडण्यास उत्सुक असतात. वारकऱ्यांस गुरुपदेश साध्या रीतीनें मिळतो. ज्याला उप-

देश घ्यावयाचा तो कोणच्या तरी एका संताच्या फडाच्या मुख्या-कडे जातो व आपली इच्छा कळवितो. एकादशी व्यतिरिक्त केव्हांही गुरुपदेश मिळतो. उपदेश घेणारा एक तुळशीची माळ व पताका घेऊन आलेला असतो. फडाचा मुख्य त्याला ती माळ, आपल्या मठांत पूज्यतेनें ठेविलेल्या ज्ञानेश्वरीच्या पोथीवर ठेवण्यास व जराशा वेळानें गळ्यांत घालण्यास सांगतो. नंतर त्याला उपदेश देतो. त्या-नंतर त्याला दुसरा गुरु करण्यास परवानगी नाहीं; व पांडुरंगाशिवाय अन्य देवाची सेवा करण्याची जरूरी नाहीं. तो आजारी पडला असतां चंद्रभागेचें तीर्थ व तुलसीदल ह्यांशिवाय दुसरें औषध त्यानें घेऊं नये. पांडुरंगाचें चरणतीर्थ अथवा चंद्रभागेचें तीर्थ प्राशन केल्या-शिवाय त्यानें कोणताही पदार्थ सेवन करूं नये. कोणच्याही जातीचा असला तरी त्याला मांससेवन करण्याची मनाई आहे. कशाही स्थितींत एकादशीचा उपवास त्यानें केलाच पाहिजे, व त्या दिवशीं हरिनामस्मरणांत रात्रभर जागर केला पाहिजे. वारकऱ्यांतही शैव, वैष्णव, रामानुज व कबीरपंथी असे मोठे सांप्रदाय आहेत. वारकरी लोकांचे आवडते ग्रंथ म्हटले म्हणजे विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, अमृतानुभव, भावार्थरामायण, रुक्मिणीस्वयंवर व ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ व तुकाराम यांचे गाथे हे होत.

वारकरी लोकांशिवाय पंढरपुरची यात्रा करण्यास पुष्कळ लोक येतात. मनुष्य सडा आल्यास चंद्रभागेचें स्नान, पांडुरंग दर्शन, गांवांतील प्रेक्षणीय स्थानांचें अवलोकन व पांडुरंगास नैवेद्य हीं केल्याशिवाय तो जात नाहीं. बरोबर कुटुंबांतील मंडळी आणि-ल्यास सौभाग्यवाण, सूपवाण, गोप्रदान इत्यादि दानें व वरील गोष्टी तो शक्त्यनुसार करितो. ज्यांना विशेष ऐपत आहे व दानधर्म

करण्याची इच्छा आहे ते महिषीदान, सुवर्णदान, भूमिदान, कन्यादान, तिळदान, गजदान इत्यादि अनेक दानें देतात व ब्राह्मण-भोजनें घालितात. वैदिक, शास्त्री व पुराणीक ह्यांची त्यांच्या योग्य-तेप्रमाणें संभावना करितात. पंढरींत आल्यावर अमुक विधि झालाच पाहिजे असें नाहीं. चंद्रभागास्नान व पांडुरंगदर्शन ह्या मुख्य सारभूत गोष्टी होत व इतर गोष्टी आपल्या इतमामास व उदार-शीलतेस अनुसरून करावयाच्या असतात. पंढरीची यात्रा ह्याच गोष्टीमुळें सुलभ आहे. जो भाव धरून आला नाहीं त्याला मात्र पंढ-रीच्या यात्रेचें फल नाहीं.

जे श्रीमंत लोक नानाप्रकारचीं दानें देतात व ब्राह्मण–भोजनें घालितात ते पांडुरंगाची व रुक्मिणीची महापूजा केल्याशिवाय रहात नाहींत. महापूजेला पंचामृतपूजा असेंही म्हणतात. ही पूजा पुढील प्रमाणें होते. पूजेचे अगोदर यजमान व बडव्यासह सर्व सेवा-धारी सोवळ्यानें सर्व सामान घेऊन येतात. यजमानाला देवळांत चौखांबी मंडपांत बसवून त्याकडून गणपतीचें पूजन करवितात. नंतर पृथ्वी, वरुण, कलश, शंख व घंटा यांची पूजा करून गाभा-ऱ्यांत जातात. पांडुरंगाचा पूर्वीचा पोषाख काढितात. मग रीती-प्रमाणें दूध, दही, लोणी, मध व शर्करा ह्यांचीं स्नानें घालून शुध्दो-दक स्नान घालितात. कोणी पंचामृताचे वेळीं देवास केळाची शिक-रण किंवा आमरस घालितात. दही, शिकरण व आमरस ह्यांच्या आवरणांत विठोबाची मूर्ति फार चांगली दिसते. शुध्दोदक स्नाना-नंतर देवास कोरडें करितात. त्यावेळीं पांडुरंगास गंध लावून व फुलें वाहून त्याच्या अंगावरील खुणा यजमानास दाखवितात. नंतर देवास पोषाख केल्यावर दागिने घालण्याचा संकेत ठरला असल्यास त्याप्रमाणें

दागिने घालितात. नंतर धूप, दीप, नैवेद्य व आरती होते. देवापुढें जी दक्षिणा ठेवावी ती बडव्यास मिळते व जी दक्षिणा ओवाळावी ती पुजाऱ्यास मिळते. महापूजेस ती कनिष्ठ प्रकारें केली तरी वीस एक रुपये खर्च लागतो. सर्व पूजा झाल्यानंतर यजमानास सेवाधाऱ्यांसह बडवे घरापर्यंत वाजत गाजत आणून पोचवितात. सकाळपासून तिसरा प्रहरची पूजा होईपर्यंत महापूजा केव्हांही करवितां येते. ही पूजा करविणें झाल्यास मॅजिस्ट्रेटची परवानगी आणावी लागते व बंदोबस्तास पोलिस शिपाई आल्यानंतर पूजा सुरू होत असते. पूजा पूर्ण होईपर्यंत यजमान व सेवाधारी यांशिवाय इतरांस गाभाऱ्यांत येऊं देत नाहींत.

महापूजेपेक्षां साधी व सर्वांना करितां येण्यास सोयीची पाद्यपूजा आहे. पाद्यपूजा मोठ्या यात्रेच्या दिवसा खेरीज केव्हांही करितां येते. यात्रेच्या दिवसांत रात्रीची मोकळीक असते. पाद्यपूजा म्हणजे देवाचे पाय धुणें, नंतर स्वच्छ पुसणें, गंधाक्षता वाहणें, देवास माळा घालणें, धूप, दीप व मेवामिठाईचा नैवेद्य दाखविणें इत्यादि गोष्टी करणें हें होय. पाद्यपूजेस खर्च थोडा येतो.

पांडुरंगाप्रमाणें रुक्मिणीकडेही ह्या पूजा होतात.



# प्रकरण आठवें.

## पंढरीमाहात्म्य.

दुधाप्रमाणें उत्तम पेय, मातृप्रेमासारखें खरें प्रेम, साधुवचनांसारखा उत्तम सल्ला, परोपकारासारखें दुसरें पुण्य व भक्तीसारखा परमेश्वर-प्राप्तीचा सुगम उपाय या गोष्टींच्या तोडीच्या दुसऱ्या गोष्टी ज्याप्रमाणें जगांत सांपडावयाच्या नाहींत; त्याप्रमाणें पंढरी क्षेत्राच्या तोडीचें दुसरें क्षेत्र भरतखंडांत सांपडावयाचें नाहीं. महाभारतांत जें नाहीं तें या जगांत नाहीं व जगांत आहे तें महाभारतांत आहे. या प्रमाणेंच पंढरींत जें नाहीं तें इतर क्षेत्रांत नाहीं व इतर क्षेत्रांत जें आहे तें या पंढरी क्षेत्रांत आहे. हिंदु लोकांचीं अनेक उपास्य दैवतें, ज्योतिर्लिंगें व तीर्थें येथें आहेत. इतर क्षेत्रें पाहिलीं तर कांहीं विशेष गोष्टीनें तीं प्रसिद्ध आहेत. पण पंढरींत त्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव असून त्या सर्वांना पांडुरंगरायाच्या वास्तव्यानें जास्त महत्त्व आलें आहे. पंढरींत आल्यानें काय होतें व तिचा महिमा काय आहे हें आपण थोडक्यांत पाहूं.

आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक तापांपैकीं एकानें अथवा तिहीनेंही जो पिडिला असेल त्यानें तो ताप दूर होण्यास पंढरीस यावें; म्हणजे त्याच्या सर्व दुःखांचा परिहार येथें होईल. जे संसारतापानें तापलेले असतील त्यांचा ताप पंढरीस आल्यावर

नाहींसा होऊन त्यांला विश्रांति मिळेल. याचें कारण श्रीपंढरीनाथ होय. हा सर्व दीनजनांचा सोयरा असून भाविक लोकांचा मायबाप आहे; हा साधु लोकांच्या विश्रांतीचें स्थान असून मूर्तिमंत आनंद आहे. सूर्याच्या गावास गेल्यावर ज्याप्रमाणें अंधार औषधासही मिळावयाचा नाहीं; त्याप्रमाणें पाडुरंगाच्या गावास आल्यावर दुःखलेशही मिळावयाचा नाहीं. 'चंद्राहूनि शीतळ व रवीहून सोज्वल' अशा पांडुरंगाला पाहून नेत्रांचें पारणें फिटतें. करद्वयांस त्याला आलिंगन द्यावेंसें वाटतें. वाणीस त्याचेंच गुणवर्णन करण्याचा छंद लागतो. कर्णास त्याच्या गुणवर्णनाशिवाय एकही शब्द ऐकणें पसंत वाटत नाहीं. सर्व ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें त्याच्या रूपाकडे लागतात. भक्ताची ही स्वस्वरूपीं तल्लीनता पाहून पांडुरंगालाही त्या भक्ताच्या सर्व दुःखांचा व कृताकृतांचा भार वहावा लागतो. भक्त आजारी असेल तर त्याची शुश्रूषा तो स्वतः येऊन करतो. आपल्या दासांवर कांहीं संकट पडलें असतां तें तो स्वतः दूर करतो. केव्हांही भक्ताला सोडून तो जात नाहीं; आपण पांडुरंगभक्त मात्र बनलें पाहिजे म्हणजे मग कांहीं कमी नाहीं. 'भक्तपणा सान नव्हेरे भाई, भक्ताचे पाय देवाचे हृदयीं' हें साधुवचन असत्य नव्हे. ध्रुवाचे कोड पुरविणारा, प्रल्हादाच्या भावाकरितां स्तंभामध्यें अवतरणारा व इतर लाखों भक्तांकरितां त्या त्या वेळेस योग्य अशीं रूपें धारण करणारा पांडुरंग विटेवर उभा राहून व कंबरेवर हात ठेवून भक्तांची वाट पहात आहे. हाच पांडुरंग नामदेवाच्या भक्तिभावासाठीं नैवेद्य जेवला, जनाबाईस हाच दळूं लागे, दामाजीपंतासाठीं महाराचें रूप घेऊन यानेंच बादशहाचे दरबारीं रुपयांचा भरणा केला. ह्याच्या किती गोष्टींचें वर्णन करावें ? त्याच्या प्रत्येक लीलेचें वर्णन करण्यास

ग्रंथच्या ग्रंथ पुरावयाचे नाहींत. त्यांचे सार एवढेंच ध्यावयाचें कीं पांडुरंग ही दु:खितांची माऊली आहे. त्याला आपण आपला शिणभाग मात्र सांगावा कीं तो तो सर्व निरसून टाकतो. एवढ्याच करितां आम्ही विनवणी करितों कीं, ज्याचे हातपाय धड असतील, इंद्रियें शाबूत असतील व ज्यांना परब्रम्हमूर्ति पांडुरंग भेटावा अशी इच्छा असेल त्यानें अवश्य पंढरीस यावें व पांडुरंगाचें दर्शन घेऊन आपलें कल्याण करून घ्यावें.

पंढरीस आल्यावर पांडुरंगाच्या दर्शनाचा महालाभ तर सर्वांसच होतो. परंतु त्या पूर्वी पांडुरंगाच्या कृपेला पात्र होण्याजोगें अंत:-करण प्रत्येकाचें झालें पाहिजे. त्याची भट्टीही पंढरीस आहे. संत-जनांचें वास्तव्य, त्यांची हरिगुणवर्णनपर कीर्तनें व हरिनामाचा गजर हीं पंढरीस आहेत त्यांच्या योगेंही पंढरीस येणाऱ्या लोकांच्या अंत:करणांत भक्तीचें बीज पेरिलें जातें.

अनुभविक लोक नवशिक्यास ज्याप्रमाणें उपयोगी पडतात त्या-प्रमाणें पंढरींत नवीन येणाऱ्या लोकांस संत मार्गदर्शक होतात. संतांचा जन्म परोपकारार्थ असतो हें सर्वांस ठाऊक आहेच. त्यांना सर्व जग हें आपलें कुटुंब वाटतें; व कुटुंबांतील मुख्याचें लक्ष ज्या-प्रमाणें मुलांकडे व दु:खी माणसांकडे असतें, त्याप्रमाणें संतांना जगांतील अज्ञ लोकांची काळजी असते. ते त्यांचीं दु:खें जाणून त्यांना सुख मिळण्याचा मार्ग सांगतात. अज्ञ लोक जेव्हां चांगल्या मार्गापासून जाणून, बुजून अथवा चुकून वाईट मार्गाकडे जात अस-तील तेव्हां त्यांची समजूत घालून त्यांना पुन्हा सन्मार्गाला ते लावि-तात. ते आपल्या गोड वाणीनें न समजणारे असे विषय सोपे करून सांगतात. ते नीतिमार्गाला अनुसरून वागत असल्यामुळें व आपपरभेद

त्यांच्यांत नसल्यामुळें तसेंच ते परम दयाळू असल्यामुळें त्यांचीं वसतीस्थानें पवित्र होतात. कोणीही पापी मनुष्य त्यांच्या पुण्यभूमींत आला असतां त्याच्या दुर्वासना मावळतात व अंतःकरणांत सद्वासनांचा उदय होतो. केवळ त्यांच्या वास्तव्यानें जर जागा पावन होतात तर त्यांच्या दर्शनाचा परिणाम किती तरी मोठा असला पाहिजे ? तसाच तो मोठा आहे ही ! त्यांच्या आश्रमांत पाय ठेवल्याबरोबर अंतःकरणशुद्धि होऊं लागते. त्यानंतर दर्शनानें परमेश्वराविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन हळुहळु परमात्म्याचें स्वरूप कळूं लागतें. ज्या अंतःकरणांत दुर्वासनेचे खडक होते व भक्तिप्रेमरूपीं जलाचा थेंबही नव्हता तेथें साधूची दृष्टि पडतांच भक्तिप्रेमाचे झरे पाझरूं लागतात. संसार तापानें तप्त राहणारें त्याचें शरीर त्या दाह शमविणाऱ्या भक्तिप्रेमाच्या लहरींनीं गार होतें व जिकडे तिकडे आनंदी आनंद वाटूं लागतो. साधूचा महिमा वर्णन करण्याचें सामर्थ्य कोणामध्यें आहे. त्यांचा महिमा वर्णनातीत आहे. असे साधु लोक पंढरींत अनेक होऊन गेले, आहेत व होतीलही. पंढरीस येणाऱ्या लोकांस पंढरपुरचे साधु पहावयास तर मिळतीलच परंतु लोकोपकारार्थ पंढरीहून अन्यस्थलीं वास करणारे साधुही पंढरीत येत असतात त्यांचेंही दर्शन होईल. पेठेंत ज्याप्रमाणें लहान मोठा व्यापारी येऊन गेल्याशिवाय राहावयाचा नाहीं त्याप्रमाणें वैकुंठपेठ म्हणून गाजलेल्या पंढरींत कोठलाही साधु येऊन चार दिवस तळ दिल्याशिवाय रहावयाचा नाहीं. पंढरी हें संतांचें मुख्य पीठ आहे; येथें सर्व साधुसंत यावयाचेच व ज्यांना त्यांच्या दर्शनाचा लाभ घडावयाचा ते पावन व्हावयाचेच.

साधूंच्या दर्शनानें अंत:करण शुद्ध झाल्यावर व भक्तिप्रेम ऊद्भवल्यावर प्रत्येकाला हरिनामस्मरणाचा छंद लागतो. 'विठ्ठल विठ्ठल' या शब्दानें पांडुरंगास अनेकवार हाका माराव्याशें वाटतें. भक्तिप्रेमानें प्रसन्न झालेलें अंत:करण व कायावाचामनेंकरून चाललेलें विठ्ठलनाम संकीर्तन या दोन गोष्टींनीं मनुष्य परमात्म्याशीं एकरूप होण्यास किती उशीर लागणार! 'गोविंद गोविंद, मना लागलिया छंद। गोविंद ते काया, भेद नाहीं देवा तया ॥' हरिनामस्मरण करून देह भगवद्रूप करण्याचा केवढा हा सुलभ मार्ग! अनेक सायास करून, जप करून, तप करून जो साध्य होत नाहीं; तो केवळ नामस्मरणानें प्राप्त होतो. व मी तूं पणाचाही तेथें भेद रहात नाहीं; हें सर्व कशाचें फळ? संतसंगतीचें! व ही संतसंगति तरी सहज कशानें मिळते? पंढरीस आल्यानें!

पंढरीस गेल्यावर अभिमान उरत नाहीं, तेथें मागील सर्व दु:खाचा परिहार होतो व पुढें कसलाही शीण रहात नाहीं. सर्व प्रकारचें कोड तेथें पुरतें; इंद्रियांचें समाधान होतें; मनाला शांति मिळते, संत व महंत यांची भेट होते. आधिव्याधींचें शुष्ककाष्ठ सुटतें; पापपुण्याचा झाडा होतो; जन्ममरणाची येरझार रहात नाहीं. पंढरीस गेल्यानें एक का दोन गोष्टींचा लाभ होतो! पंढरीस आल्यावर ज्या दुर्मिळ वस्तूचा लाभ होतो तिजमुळें फिरून दुसरा लाभ जोडून घ्यावा अशी इच्छा रहात नाहीं. नरदेहास येऊन आणखी काय जोडावयाचें? प्रभुप्राप्ति! ती पंढरीस फार सुलभ रीतीनें मिळते. तिजकारितां शरीरास फारसे कष्ट घ्यावे लागत नाहींत. पैशाच्या राशी ओताव्या लागत नाहींत. जप, तप, होम, हवन हीं करावीं

लागत नाहींत. एक भक्तियुक्त अंतःकरण करावें आणि पंढरीचें सुख लुटावें.

भक्तीची कास सर्व तऱ्हेच्या लोकांना धरितां येत असल्यामुळें दीन दुबळे, अविद्वान्, भाळेभोळे लोक, मूढ म्हणून गणल्या जाणाऱ्या स्त्रिया, हीन वर्णाचे लोक पंढरीस येऊन आपल्या देहाचें सार्थक करून घेतात. पंढरी या रीतीनें सर्वांवर उपकार करणारी असल्यामुळें तिला भवसागरांतून अज्ञ जनांना परतीरास नेऊन पोचविणारें तारूं असें कोणी म्हणतात. ह्या तारवाचा कर्णधार पंढरीनाथ आहे व तो मोलेंविण केवळ एक भक्तिभाव पाहून लोकांस त्यांत बसवून घेतो. इतर तारवांत श्रीमंत, विद्वान् व गरीब ह्यांच्या मानानें पहिला दुसरा व तिसरा असे वर्ग केलेले असतात पण पंढरीक्षेत्ररूपीं तारवांत तो भेदाभेद नाहीं. सर्वांचाच पहिल्या वर्गांत समावेश. पंढरीच्या अप्रतिमतेवरून तिला कामधेनूचीही उपमा देतात पंढरी कामधेनु संतजनाला पाहून पान्हावते व प्रेमामृतरूपी दूध दुभते. ज्या नराला हें दूध पिण्यास मिळालें तो खरा भाग्यवान् !

पंढरीचें महात्म्य अशा प्रकारचें आहे. तें जाणण्यालाही भक्तियुक्त अंतःकरण पाहिजे. पंढरीच्या महात्म्यावर ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम, एकनाथ इत्यादि साधुसंतांनीं स्फुट अभंग लिहिलेले आहेत. ते एकवार तरी वाचावे. त्यांच्यांत त्यांनीं पंढरीचें माहात्म्य किती रसाळवाणीनें वर्णिलें आहे म्हणून सांगावें एक एक अभंग म्हणजे पंढरीमहिमासुधेचा एकेक प्याला आहे. आम्ही एकच अभंग पुढें देतों. हा एकनाथ महाराजांचा असून पंढरीचा सर्व महिमा साररूपानें त्यांत वर्णिला आहे;—

मृत्यु लोकीं एक नगर त्याचें नांव पंढरपुर ।
तेथील मोकाशी उभा असे विटेवर ।
पुंडलीक भक्तराज शोभे चंद्रभागा तीर ।
बोलती साधुजन जावा वाट हुरहुर गा ॥ १ ॥
तुम्ही संतमायबाप एवढा उपकार करा ।
न्या मज तेथवरी दाखवा दीनांचा सोयरा ॥ ध्रु० ॥
मज नाहीं हातपाय डोळा पडली झापड ।
कर्ण हे बधिर झाले वाचा बोले बोबड ।
नाक मुख गळूं लागलें लाळ आणि शेंबुड ।
श्वानाची परि झाली अवघे करिती हाडहाड ॥२॥ तुम्ही०
साधुसंत दयावंत थोर जे कृपेचे सागर ।
भावाचें मुख्यस्थान भक्तीचें माहेर ।
तिहीं केलें कृपादान मस्तकीं ठेविला कर ।
मायामोह विसरले शुद्ध जाहलें कलेवर ॥३॥ तुम्ही संत०
बोध दिला मज सांगातें मार्ग दाविला नीट ।
भ्रांति हे समूळ गेली दिसूं लागली वाट ।
नाचत प्रेमछंदें चालूं लागलों सपाट ।
एका जनार्दनीं पावलों पंढरी पेठ ॥ ४ ॥ तुम्ही संत०

समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २५७...
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# परिशिष्ट.

म्युन्सिपल कमेटी स्थापन तारीख–१२ आक्टोबर १८५५.

लोकसंख्या २५,२०९ ( १९२१ खा. सु. ) १२,६४३ पु० १२,५६६ स्त्रि०

कमेटीची जमा—१६७५९०–१२–८

,, खर्च—१६६८०६– ८–६

दवाखाना खर्च— ८४२७–१२–०

गुरांचा दवाखाना— ३०० ग्रँट

देवीखाते— ८११–१०

व्ही. जे. हायस्कूल खर्च—१०७१९ ( ६ बी. ए. ३ अंडर ग्रॅ. ३ मॅ. )

प्राथमिक शाळा–उर्दू–मुलें १८० शिक्षक ५

मराठी——...

खर्च—२७०९६–११–६

उद्योगशाळा–खर्च—२२८१– १–७

| यात्रांचे उत्पन्न | १९२१–२२ | १९२२–२३ |
|---|---|---|
| चैत्री | ७३१७–१२ | २०५८०– ८ |
| आषाढी | ३२१९९– ८ | ३५४२४–१२ |
| कार्तिकी | २०७८६–१२ | २११६१–१२ |
| माघी | ११२९६– ८ | १०१४४–१२ |
| | ७१६००– ८ | ८७३११–१२ |
| यात्रे प्रीत्यर्थ खर्च | ५९८७९– १–७ | ५९७६६– ४–३ |

---

पंढरपूर येथें रा. आपटे यांचें अंग्लो व्हर्नाक्युलर स्कूल असून तेथेंही अभ्यास बरा चालतो.

**चोखामेळा**—विठोबाचे देवालयानजीक नामदेव पायरीचे समोर ईशान्य कोपऱ्यांत अंत्यज साधुवर्य चोखामेळा याची समाधि आहे. तेथें चोखामेळाचे अनुयायी भजन–पूजन करीत असतात.

REFBK-0002642

REFBK-0002642